
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १२३८
REFBK-0010853

# महाराष्ट्राचे मन




लेखक—

## पु. रा. बेहेरे

प्रस्तावना—

**ना. यशवंतराव चव्हाण**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

# महाराष्ट्राचें मन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 2८3e२ वि: [illegible]
क्रमांक 723८ नों: दि: 2-५-८-२-१
५,०८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
बा. क्र. 7०८५3

लेखक :

श्री. पु. रा. बेहेरे

प्रस्तावना :

श्री. यशवंतराव चव्हाण
( महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री )

REFBK-0010853

बलवन्त प्रकाशन

बलवन्त पुस्तक भांडार
गिरगांव नाका, मुंबई नं. ४.

क्रमाङ्क ६७

प्रकाशक :
**त्रिंबक विष्णु परचुरे,**
बलवन्त पुस्तक भाण्डार,
गिरगांव नाका, मुंबई ४

मुखपृष्ठ :
**वसंत विटणकर,**
१५९ ललितानिवास,
लेडी जमशेटजी रोड, मुंबई १६

ब्लॉक :
**मेसर्स गुप्ता ब्रदर्स,**
परळ, मुंबई १२

मुद्रक :
**र. भ. निगुडकर,**
प्रकाश मुद्रणालय,
३९५/४ सदाशिव, पुणें २

**आवृत्ति पहिली**

प्रकाशन-दिन :
**स्वातंत्र्यदिन**
१५ ऑगस्ट १९६०

किंमत :
**दोन रुपये**

# प्रस्तावना

श्री. पु. रा. बेहेरे यांनीं लिहिलेल्या महाराष्ट्रविषयक लेखसंग्रहाला प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहितांना मला आनंद होत आहे. श्री. बेहेरे हे एक अभ्यासु लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. संयुक्त महाराष्ट्रासंबंधींचा प्रश्न हा प्रत्येक मराठी माणसाच्या जिव्हाळ्याचा व भावनेचा प्रश्न होता. त्यासंबंधीं जेवढें विचारमंथन झालें तेवढें महाराष्ट्राच्या इतिहासांत अलिकडल्या काळांत कोणत्याहि प्रश्नावर झालें नसेल. तेव्हां या प्रश्नासंबंधींची ऐतिहासिक, सांस्कृतिक, सांप्रदायिक, राजकीय व व्यक्तिविषयक माहिती एकत्रित करून ती सुसंगत रूपानें वाचकांच्या हातीं देण्याचें महत्त्वाचें कार्य श्री. बेहेरे यांनीं या लेखमालेच्या रूपानें केलें आहे. त्यांच्या लेखांत त्यांची या विषयासंबंधींची तळमळ, एकरूपता व चिकित्सक बुद्धि आपणांस दिसून येते विवेचनाच्या ओघांत लेखकानें मांडलेलीं मतें व काढलेले निष्कर्ष हे विचाराला चालना देणारे आहेत; परंतु त्यासंबंधींची जबाबदारी सर्वस्वी लेखकाची आहे हें मला येथें स्पष्ट केलें पाहिजे. कारण माझा या लेखमालेकडे बघण्याचा दृष्टिकोण वेगळा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या आपण इतक्या जवळ आहोंत कीं, त्या प्रश्नाचें सिंहावलोकन किंवा मूल्यमापन कालांतरानेंच करणें योग्य होईल. तेव्हां यासंबंधीं प्रसिद्ध होणारे लेख व इतर साहित्य यांच्याकडे इतिहासाचीं साधनें किंवा वैयक्तिक दृष्टिकोण म्हणून बघणेंच श्रेयस्कर होईल असें मला वाटतें. या दृष्टीनें श्री. बेहेरे यांनीं ही एक अभ्यासपूर्ण व विवेचनात्मक लेखमाला लिहून बहुमोल कामगिरी केली आहे.

स्थूलमानानें या लेखांसंबंधीं माझा दृष्टिकोण मांडल्यावर, या लेखांच्या तपशिलांत जाण्याची वास्तविक मला आवश्यकता नाहीं; परंतु "बेळगांव-कारवारचा सीमाप्रश्न" या लेखांत आलेल्या कांहीं उल्लेखांसंबंधीं मला माझें मत स्पष्टपणें नमूद केलें पाहिजे. या प्रश्नासंबंधीं प्रथमपासून शेवटपर्यंत एक कारस्थान रचण्यांत आलें आहे असा जो लेखकाचा दावा आहे तो मला मान्य नाहीं. या प्रश्नासंबंधीं ज्या घटना घडत गेल्या त्यांच्याकडे

केवळ ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ दृष्टिकोणांतूनच पाहणें योग्य होईल असें मला वाटतें. या प्रश्नाशीं निगडित असलेल्या व्यक्तींचा जो उल्लेख लेखकानें केलेला आहे त्या वेगवेगळ्या काळांत व वेगवेगळ्या परिस्थितींत वावरत होत्या हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. या प्रश्नासंबंधीं अधिक कटुता व गैरसमज वाढूं नयेत या हेतूनेंच या गोष्टींचा मीं ओझरता उल्लेख केला आहे.

या लेखसंग्रहांत श्री. बेहेरे यांनीं प्रामुख्यानें पश्चिम महाराष्ट्रांतील घटनांचाच विशेष समाचार घेतला आहे. संयुक्त महाराष्ट्राचें स्वप्न साकार व्हावें म्हणून मराठवाडा व विदर्भ येथील आपल्या बांधवांनीं जी कामगिरी केली त्याचा उल्लेख श्री. बेहेरे यांच्या या समालोचनांत आला असता तर या लेखमालेला त्या दृष्टीनें पूर्णता प्राप्त झाली असती. ही सुधारणा आपल्या पुढील आवृत्तींत श्री. बेहेरे घडवून आणतील अशी आशा मी प्रकट करतों.

महाराष्ट्राची भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा इतिहास, सीमाप्रश्न व या प्रश्नाशीं संबंधित असलेल्या व्यक्तींच्या कार्याचें मूल्यमापन करतांना श्री. बेहेरे यांची ठसठशीत मांडणी, तर्कशुद्ध विचारसरणी व भाषासौष्ठव प्रकर्षानें नजरेंत भरतें. त्यांच्या लेखमालेंतील या वाङ्मयीन गुणांबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों व त्यांच्या हातून अशीच उत्तरोत्तर वाङ्मयसेवा घडो अशी अपेक्षा बाळगतों.

सचिवालय, मुंबई ३२
२० जुलै १९६०
२९ आषाढ १८८२

यशवंतराव चव्हाण

# चार शब्द

'महाराष्ट्राचें मन' म्हणून येथें संग्रहित केलेल्या लेखांचें भाग्य विशेषच आहे. हे लेख 'श्रीदीपलक्ष्मी' मासिकाच्या विशेष अंकांतील विशेष लेख म्हणून प्रथम प्रसिद्ध झाले त्या वेळींहि त्यांचें कौतुक झालें होतें आणि आतां हे लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत असतांना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. **यशवंतराव चव्हाण** यांच्याकडून प्रस्तावनारूपानें जाहीर कौतुक करून घेण्याचें भाग्य त्यांना लाभत आहे.

हे लेख प्रसिद्ध झाल्यानंतरहि त्यांचा संग्रह पुस्तकरूपानें निघेल असें मला वाटलें नव्हतें. ती कल्पना श्री. पु. रा. लेले यांनीं माझ्या मनांत भरविली. माझें नियतकालिकांतील लेखन वाचण्याइतकी सहनशीलता आणि त्यांचें मनमोकळें कौतुक करण्याची उदारता ते नेहमींच दाखवितात. या लेखांत विशिष्ट दृष्टिकोण आहे आणि म्हणून त्यांचा संग्रह प्रसिद्ध केला पाहिजे असें त्यांनीं सुचविलें.

या लेखांचा संग्रह काढायचा तर त्याला ना. यशवंतराव चव्हाण यांची प्रस्तावना असावी असें मला वाटलें. लेखांचें स्वरूप पाहतां त्यांच्याकडे प्रस्तावना मागणें हें एक धाडसच होतें. पण माझ्या विनंतींतील औद्धत्य मनावर न घेतां त्यांनीं दिलखुलास पण मार्मिक प्रस्तावना लिहिली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

'श्रीदीपलक्ष्मी'चे संपादक श्री. ग. का. रायकर यांनीं मागणी केली नसती तर हे लेख मुळांतच लिहिले गेले नसते. म्हणून या लेखांचें श्रेय त्यांनाहि दिलें पाहिजे. अखेर पुस्तक प्रसिद्ध करण्याचें श्री. अण्णासाहेब परचुरे यांनीं मनावर घेतलें म्हणूनच तें या वेळीं प्रसिद्ध होत आहे इतकें सांगितलें म्हणजे पुरे.

—पु. रा. बेहेरे

वृत्तपत्रांनीं आणि विद्वानांनीं एकमुखानें नांवाजलेलें
श्रीगणेश देवतेसंबंधीं मराठी भाषेंतील
अपूर्व पुस्तक—

# मंगलमूर्ति श्रीगणेश

(लेखक : पु. [illegible] ढेरे)

प्रा. वा. ल. कुलकर्णी, मराठी विभागाचे प्रमुख, मराठवाडा विद्यापीठ, म्हणतात : “ पुस्तक वाचतांना मी अगदीं रंगून गेलों. हें पुस्तक लिहून तुम्हीं सांस्कृतिक-दृष्ट्या लक्षांत घेण्याजोगी कामगिरी केली आहे.”

✯

किंमत २ रु. १० न. पैसे. ट. ख. निराळा.

* एकमेव विक्रेते *

## बलवन्त पुस्तक भाण्डार

गिरगांव नाका, मुंबई ४

ती. अप्पा आणि ती. सौ. आई यांस—

भक्तिपूर्वक समर्पण

—बापू

# अनुक्रमणिका

एक महाराष्ट्र देश हा...  १
संयुक्त महाराष्ट्राचें विराट् पर्व  ३६
बेळगांव-कारवारचा सीमा-प्रश्न  ६८
यशवंतरावांचें नेतृत्व
(एक परीक्षण)  ९०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम ............... वि:
क्रमांक ............... नों: दि: ....
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 70643

# महाराष्ट्राचें मन

## एक महाराष्ट्र देश हा.... :

महाराष्ट्राचें राज्य झालें. गेलीं चार वर्षे चालू असलेलें महाभारत संपलें. महाराष्ट्राचा स्वाभिमान जिवंत झाला. त्याच्या अस्मितेचा पुनर्जन्म झाला. विग्रह संपला आणि भारतीय राष्ट्रवाद सतेज झाला. महाराष्ट्राच्या असंतोषानें भारत बलवान होऊं शकत नाहीं. संतुष्ट महाराष्ट्रानें भारताचें सामर्थ्य वाढलें आहे. कारण महाराष्ट्र हा महाराष्ट्रासाठीं नसून तो भारतासाठीं आहे. असा महाराष्ट्राचा इतिहास आहे. महाराष्ट्रानें प्रत्येक भारतीय विचार आत्मसात् केला आणि तो भारतांत प्रभावी बनविला. महाराष्ट्राला जें स्फुरलें तें भारतासाठीं त्यानें प्रकट केलें. महाराष्ट्रानें जें निर्मिलें त्यानें भारताला भूषविलें. महाराष्ट्रानें जें वाढविलें त्यानें भारताला संपन्न केलें. जें घेतलें त्याच्या शतपट दिलें. जें जें भारतीय आहे त्या सर्वांचा महाराष्ट्रानें आदर केला. म्हणून हा महाराष्ट्र आहे.

### महाराष्ट्राचा साक्षात्कार

मराठी भाषेनें प्रथम ओंवी म्हटली असेल तेव्हांपासून आज प्रथमच महाराष्ट्राचें राज्य झालें आहे. अशा वेळीं महाराष्ट्राच्या महत्तमतेचा साक्षात्कार झाला पाहिजे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचें दर्शन घडलें पाहिजे. महाराष्ट्राचा इतिहास समोर उभा राहिला पाहिजे. पंडितांची प्रज्ञा, कलावंतांची स्फूर्ति, कवींची प्रतिभा, वीरांचें शौर्य, रमणींचें शील, पुरुषांचा उद्योग, सामान्य माणसाचें हृदय, ऋषींचा साक्षात्कार आणि संतांची कृपा यांनीं मराठी जीवन घडविलें आहे. त्यामुळें त्या जीवनांत सत्य, शिव आणि सौंदर्य उमटलें आहे. मराठी जीवनांतले हे सर्व मंगल

संस्कार आज उचंबळून आले पाहिजेत. द्वेष-मत्सर जळून गेले पाहिजेत. कर्तृत्वाला आव्हान मिळालें पाहिजे आणि त्या कर्तृत्वानें भारत उजळून निघाला पाहिजे. महाराष्ट्रदर्शनानें भारत डोळ्यांसमोर उभा राहिला पाहिजे. कारण महाराष्ट्र तसाच आहे.

महाराष्ट्र भारताला सोडून नाहीं. पण महाराष्ट्राचें वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्राला स्वतःचें व्यक्तित्व आहे. त्याचें स्वतःचें रूप आहे, रंग आहे. म्हणूनच त्याची अस्मिता आहे. आणि महाराष्ट्राचें हें वैशिष्ट्य कशांत नाहीं ? त्याचें स्थानमाहात्म्य आहे. त्याची माती, त्याचा दगड, त्याचे डोंगर, दऱ्या, पर्वत, शिखरें, त्याच्या नद्या, तलाव, वृक्ष, वेली यासुद्धां वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मग इथलीं माणसेंच वैशिष्ट्यपूर्ण कशीं नसतील ? त्या माणसांनीं जें घडविलें तें वैशिष्ट्यपूर्ण कसें नसेल ? आहे; त्यांना जें स्फुरलें तेंहि वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचीं भव्य लेणीं, बळकट किल्ले, साधींच देवालयें हीं वैशिष्ट्यपूर्ण आहेत. इथले साधुसंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांच्या उपासना आणि देव वैशिष्ट्यपूर्ण आहेत. इथल्या जाती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. इथले राजे, वीर, मुत्सद्दी वैशिष्ट्यपूर्ण आहेत; पंडित, कवि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आणि इथला सामान्य माणूसहि वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्रांत एकात्मता आहे, तशीच खच्चून भरलेली विविधता आहे. भारतानें आपलें प्रतिबिंब महाराष्ट्रांत पहावें आणि तटस्थ व्हावें. असा हा महाराष्ट्र आहे.

## ‘मध्ये महाभारतम्’ : महाराष्ट्र

महाराष्ट्राचें स्थान. ‘मध्ये महाभारतम्’ असें त्याचें स्थानमाहात्म्य आहे ! तो भारताच्या केंद्रस्थानीं आहे. समुद्र पांचशें फूट वर चढला तर भारतांत हिमाचल आणि महाराष्ट्र एवढाच भाग अवशिष्ट राहील ! पण त्यांतहि हिमालयापेक्षां सह्याद्रि अधिक पुरातन आहे. जो मध्यभागीं रहातो तो इतरांना जोडतो किंवा तोडतो. महाराष्ट्रानें अन्य भारतीयांना एक-मेकांशीं जोडलें आहे. आणि तो स्वतःसुद्धां इतरांशीं संबंध जोडून आहे. गुजरात आणि मध्यप्रदेश, ओरिसा आणि आंध्र-कर्नाटक यांच्याशीं तो पुरातन संबंध जोडून आहे. या शेजाऱ्यांच्या संस्कृतीवर त्यानें प्रभाव

पाडला आहे आणि त्यांचें ऋण घेऊन स्वतःची संस्कृतीहि संपन्न केली आहे. संस्कृतीची देवाणघेवाण हा एक मंगल व्यवहार आहे. तेथें देणारा आणि घेणारा दोघेहि कृतार्थ होतात.

महाराष्ट्राच्या तीन सीमा अचल आहेत. दक्षिण-सीमा नैसर्गिक नाहीं. महाराष्ट्राच्या दक्षिणेला आंध्र-कर्नाटक आहे. पण महाराष्ट्राला आणि आंध्र-कर्नाटकाला विभागणारी नदी नाहीं किंवा डोंगरांची रांगहि नाहीं. त्यामुळें महाराष्ट्र कुठें संपतो आणि आंध्र-कर्नाटक कुठें सुरू होतो हें रेषा आंखून सांगतां येत नाहीं. इतिहासांत ही सीमारेषा मागेंपुढें सरकलेली दिसते. नाहीं तर श्रवण-बेळगोळ येथील प्रचंड गोमटेश्वराच्या मूर्तीखालीं पहिला ज्ञात मराठी शिलालेख सांपडला नसता. चल पावणाऱ्या या दक्षिण सीमेवर आजहि ओढाताण चालू आहे.

## पश्चिम सीमा : रत्नाकर

महाराष्ट्राची दक्षिण सीमा संस्कृतिसंपन्न अशा आंध्र-कर्नाटकाला भिडली आहे तर पश्चिम सीमा रत्नाकराला भिडली आहे. प्राचीन सोपारा-चौल आणि आजच्या मुंबईपासून गोव्यापर्यंत अनेक बंदरांतून प्राचीन काला-पासून महाराष्ट्राचे जगाशीं संबंध आले. संस्कृतीची देवाण-घेवाण झाली. मध्यें सह्याद्रि होता. पण तो ओलांडून, बंदरांत जें आलें तें देशावर पोंचलें. नाणेघाटापासून अंबोली घाटापर्यंत असे अनेक मार्ग प्राचीन कालापासून असले पाहिजेत.

उत्तरेला विंध्य, सातपुडा आणि पूर्वेला बस्तरचें अरण्य आहे. महा-राष्ट्राच्या तीन सीमा निसर्गनिर्मित आहेत. म्हणून रेखीव आणि स्पष्टहि आहेत. या सीमांच्या मर्यादारेषेंतच मराठी संस्कृति नेहमीं अडून राहिली असें नव्हे. तिच्या लाटा त्यापुढेंहि गेल्या. महाराष्ट्राच्या उत्तर सीमेनें, विंध्यपर्वतानें, उत्तर-दक्षिण भारताचा संबंध तोडला होता. गंगा-यमुनेच्या सुपीक प्रदेशांत आर्यसंस्कृति बहरली होती, तिला दक्षिणेंत पसरण्याला विंध्यपर्वताची अडचण होती. विंध्यपर्वताला नमविणारा पहिला अगस्त्य-ऋषि. अगस्त्य दक्षिणेंत आला. विदर्भांत त्यानें लोपामुद्रेशीं विवाह केला. तो कायमचाच दक्षिणेंत राहिला. तेव्हांपासून उत्तर-दक्षिणेचा अखंड

संबंध सुरू झाला. दक्षिणेला उत्तरेशीं जोडणारे सारे मार्ग कुठून ना कुठून महाराष्ट्रांतून गेले आहेत. महाराष्ट्रांत पूर्व भारतांतूनहि मार्ग आले आणि समुद्राशीं जोडणारे पश्चिमेकडचे मार्गहि तयार झाले. हे मार्ग आज आहेत तसेच प्राचीन काळींहि ते होते. त्यांनीं महाराष्ट्राचें स्वरूप घडविलें तसेंच भारताचें स्वरूप बदललें.

### कृष्णप्रस्तराचा प्रदेश

महाराष्ट्राच्या सीमा निश्चित आहेत. म्हणजे त्या केवळ नकाशावर रेषा ओढून झालेल्या नाहींत. महाराष्ट्राचा मनःपिंड ज्या भूमीनें बनविला ती भूमीहि निश्चित आहे; एकसंध आहे. भूस्तरशास्त्राच्या दृष्टीनेंहि महाराष्ट्र एकसंध आहे. हा चमत्कार तर खराच; पण त्याचा अर्थ असा कीं, महाराष्ट्राची कोणीं स्थापना करण्यापूर्वींपासूनच तो होता. महाराष्ट्र स्वयंभू आहे. तो भारताचा नैसर्गिक विभाग आहे. ज्याला शास्त्रज्ञांनीं कृष्ण-प्रस्तराचा भाग म्हटलें तें भारताचें दख्खनचें पठार म्हणजे महाराष्ट्र.

कोट्यवधि वर्षांपूर्वीं पृथ्वीच्या उष्ण निःश्वसितांनीं हा प्रदेश बनला. महाराष्ट्र-भूमीची निर्मिति सहस्रावधि, लक्षावधि वर्षें होत होती. ज्वालामुखी जागृत होऊन त्यांतून तप्त शिलारस सर्वत्र पसरून जाई; हा रस थंड होई; त्यावर पाऊस पडे; पुन्हा शिलारसाचा उद्रेक होई, पुन्हा तो थंड होई. असे थरावर थर चढले. थरावर थर जमून झालेली महाराष्ट्र-भूमीची रचना आजहि डोंगरकड्यांकडे पाहिलें तर उघड्या डोळ्यांनाहि दिसूं शकते. काळ्या फत्तराचा सह्याद्रि आणि दख्खन पठार यांच्यावर मराठी माणूस घडला. त्याला या भूमीचे गुण लागले आणि आपलें व्यक्तित्व त्यानें या फत्तरांवर उमटविलें आहे.

महाराष्ट्राची मान ज्यानें ताठ ठेवली तो सह्याद्रि म्हणजे महाराष्ट्राचा कणा आहे. भूगर्भांतील ज्या उद्रेकांनीं महाराष्ट्राची भूमि बनली त्याच उद्रेकांची ही उच्च निर्मिति आहे. सह्याद्रि आहे म्हणून महाराष्ट्र आहे. सह्याद्रीनें महाराष्ट्राला नद्या दिल्या, महाराष्ट्राचें हवामान निश्चित केलें; सह्याद्रीनेंच महाराष्ट्राला कोंकण दिलें. सह्याद्रीनें महाराष्ट्राचा जसा भूगोल घडविला तसाच इतिहासहि घडविला आहे. सह्याद्रीच्याच शाखा इतरत्र

पसरल्या आणि त्यांना सातपुडा, सातमाळ, बालाघाट आणि महादेव अशीं नांवें मिळालीं. असा महाराष्ट्र हा सह्याद्रीचा विस्तार आहे.

## सह्याद्रींतील अमृत-कल्लोळ

सह्याद्रीची छाती काळ्या फत्तराची असली तरी त्याच्या हृदयांतून अमृताचे कल्लोळ बाहेर पडतात. त्यांनींच महाराष्ट्र-भूमीला जीवन दिलें. महाराष्ट्राची भूमि जेथें जशी असेल त्या मानानें हें जीवन टिकलें. सह्याद्रींतून हे अमृत-कल्लोळ बाहेर पडले त्याच नद्या झाल्या. ज्या कोंकणांत उतरल्या त्यांना समुद्राला मिळण्याची घाई झाली, त्यामुळें त्या नुसता खळखळाट करीत गेल्या. पण ज्या पूर्वेला उतरल्या त्या शेंकडों मैल संथ गेल्या. कांहीं पूर्वेला गेल्या, कांहीं दक्षिणेला गेल्या. पश्चिमेला गेल्या त्यांत सर्वांत मोठी ती तापी. सातपुड्यांत उगम पावून खानदेशांतून गुजरातेंत जाणारी ही सूर्यकन्या तपती नदी. गोदावरी, भीमा आणि कृष्णा या सर्वांत मोठ्या नद्या. विदर्भांत वर्धा आणि वैनगंगा दक्षिणेला जातात.

या नद्यांच्या तीरावर महाराष्ट्र-संस्कृति वाढली. भौतिक संस्कृति वाढली तशीच आध्यात्मिक संस्कृतिसुद्धां. नदी म्हटली कीं ती ज्या प्रदेशांतून वाहील तें खोरें झालें. या नद्यांना लहानमोठ्या शेंकडों नद्या येऊन मिळाल्या आहेत. तापी-पूर्णेनें खानदेश आणि वर्धा-वैनगंगेनें विदर्भाला संपन्न बनविलें. पण तेवढी समृद्धि गोदा, भीमा, कृष्णा यांनीं यापूर्वीं दिली नव्हती. त्या माहेराहून सासरीं जातांना आपल्याबरोबर भूमीचें सत्त्व नेत होत्या. ती परिस्थिति यापुढें पालटेल, आज थोडी पालटत आहे. कारण त्या नद्यांचा अधिक उपयोग आतां समजत आहे नद्या वहात असून कांहीं जिल्हे दुष्काळी होते. कालवे काढूं नका असें कांहीं त्या म्हणाल्या नव्हत्या! कालवे निघतांच या नद्यांचें पाणी आणि दुष्काळी जमिनीचा कस दोन्हीहि दिसूं लागलीं. सोनें पिकूं लागलें.

पण ही अलिकडची गोष्ट. गोदावरी त्र्यंबकेश्वराच्या जटेंतून आणि भीमा ही भीमाशंकराच्या जटेंतून उगम पावली. गोदावरी ही महाराष्ट्राची मध्यरेषा आणि संस्कृतीचा गाभा आहे. भीमेच्या कांठीं भक्तीचा मळा पिकला. कृष्णेच्या कांठीं संस्कृतिसंगम झाला. कारण तिनें पुढें महाराष्ट्र-

संस्कृतीची सीमा दाखविली. या प्रमुख नद्यांना ठिकठिकाणीं ज्या अनेक नद्या मिळाल्या त्यांनीं या नद्यांना पुष्ट केलें, यांचें माहात्म्य वाढविलें. त्या छोट्या नद्यांचें महत्त्व आणि माहात्म्य त्यांच्या स्थानानें मर्यादित झालें. गोदा, कृष्णा, भीमेचें माहात्म्य हें कीं त्यांनीं महाराष्ट्र-संस्कृतीप्रमाणेंच अन्य संस्कृतींच्या समृद्धीलाहि हातभार लावला.

## महाराष्ट्र-भूमि

महाराष्ट्राची मातीहि विशिष्ट प्रकारची आहे. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं तांबडी माती सांपडते. महाराष्ट्र-भूमि ज्वालामुखींतून बाहेर आलेल्या भूगर्भांतील उद्रेकानें बनली असली तरी या काळ्या दगडांतूनच तांबडी माती निर्माण झालेली आहे. काळ्या दगडांतूनच तांबडा दगड निर्माण झाला. काळ्या दगडावर नैसर्गिकरीत्या विशिष्ट रासायनिक क्रिया होऊन हा तांबडा दगड आणि तांबडी माती निर्माण झाली आहे. पण त्याच्या-खालीं काळा फत्तरच आहे. भूगर्भांतील उद्रेकानें ही भूमि बनली म्हणून आजहि तिच्या पोटांत अनेक धातूंचे खजिने आहेत. लोखंड आहे, ॲल्युमिनिअम आहे, सिलिका, सोडियम, कॅल्शिअम, पोटॅशिअम, मॅंगनीज असे हे अनेक धातू आहेत. अशीं अनेक द्रव्यें आज स्वतःच्या उद्धाराची वाट पहात आहेत. त्यांचा उद्धार होईल तेव्हां महाराष्ट्राचाहि तीं उद्धार करतील. महाराष्ट्र-भूमीवर नद्यांची सुप्त शक्ति आणि खालीं गुप्त धन आहे. तें आज मराठी कर्तृत्वाला आवाहन करीत आहे.

महाराष्ट्राची भूमि सर्वत्र सारखी नाहीं. तिच्यामध्यें विविधता आहे आणि त्यामुळें त्या भूमीवर जें उगवतें तेंहि विविध आहे. महाराष्ट्र हें पूर्वी सगळेंच दंडकारण्य होतें. जसजसा महाराष्ट्र वसूं लागला तसतसें अरण्य हटूं लागलें. तरीहि आज महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं वनें आणि अरण्यें आहेत. सह्याद्रि जुना असला तरी तो हिमालयाइतका उंच नाहीं. त्यामुळें हिमालयाइतका वृक्ष-संपत्तीनें समृद्ध नाहीं आणि वनश्रीनें सुंदरहि नाहीं. महाराष्ट्रांत सृष्टीचें सौंदर्य नाहीं असें नाहीं. पण तें बेताचें आहे. राकट, कणखर देशाला शोभेल इतकें आहे. अपवाद गोमांतकाचा आहे. म्हणून त्याला गौरवानें महाराष्ट्राचें काश्मीर म्हणतात. पण त्यांत काश्मीरबद्दलचें

कौतुकच अधिक आहे. वृक्षलतांची, फळाफुलांच्या झाडांची, कांटेरी आणि औषधी झुडपांची यादीच केली तर ती कांहीं लहान भरणार नाहीं. खैर, शिसव, साग, आंबे, फणस, बकुळ, प्राजक्त, केळी, अंजन, कंचन, करवंदी, नारळी, पोफळी अशा वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती मराठी भूमींतून आहेत. त्याचें सौंदर्य आणि वैशिष्ट्य विविधतेंत आहे.

महाराष्ट्राची विभागणी नैसर्गिकच आहे. त्यामुळें त्याचीं नांवें बदलत आलीं तरी प्रदेश तोच राहिला. आज महाराष्ट्राचे विभाग देश आणि कोंकण असे केले तर देशावर विदर्भ-मराठवाड्याचाहि समावेश होतोच. घाटमाथ्यावरून पूर्वेकडे ज्या नद्या गेल्या त्यांच्या खोऱ्यांनीं बारा मावळें आणि बारा नेरें तयार झालीं. अंदर, नाणें, पवन, घोटण, पौड, मोसें, मुळें, गुंजण, वेळवंड, भोर, शिवतर, हिरडस हीं बारा मावळें आणि जुन्नर, शिवनेर, मोन्नेर, घोडनेर, भीमनेर, पारनेर, संगमनेर, जामनेर, पिंपळनेर, आकोळनेर आणि सिन्नेर हीं बारा नेरें मध्य महाराष्ट्राच्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्राच्या आजच्या विभागांचीं जुनीं नावेंहि आहेत. अपरान्त हें कोंकणाचें, त्याच्या एका भागाचें नांव. विदर्भ हें जुनेंच नांव अजूनहि आहे. त्याशिवाय अश्मक, मूलक आणि कुंतल अशीं तीन नांवें आहेत. मूलक म्हणजे आजचा खानदेश; अश्मक हें प्राचीन नांव पैठण प्रदेशाचें आहे आणि कृष्णा खोरें म्हणजे कुंतल. नांवें नवीं रूढ झालीं तरी सगळींच जुनीं नांवें नामशेष झालीं नाहींत. नामशेष झालीं त्यांनींहि एक परंपरा जोडून दिली.

## सह्याद्रीची देणगी : किल्ले

महाराष्ट्रांत कुठेंहि गेलें तरी तेथें किल्ला नाहीं असें होणारच नाहीं. मग समुद्रांत जा, नाहीं तर डोंगराच्या शिखरावर जा. तेथें किल्ला भेटणारच. किल्ला ही त्या प्रदेशाची किल्लीच होती. राजकीय सत्तेचें द्वार खोलणारी किल्ली म्हणजे किल्ला. तो तसाच मोक्याच्या जागीं असणार. आज किल्ल्याचें हें महत्त्व संपुष्टांत आलें. राजकीय दृष्टीनें शून्य ठरलेले किल्ले आज शून्यवत् झाले आहेत. तथापि, ते पूज्य आहेत. कारण तीं सांस्कृतिक

केंद्रें आणि स्फूर्तिस्थानें बनलीं आहेत. महाराष्ट्रीय वास्तुशास्त्राचें तें एक वैशिष्ट्य आहे.

भारतांत इतरत्रहि किल्ले आहेत. आणि दुर्गांची रचना प्राचीन कालापासून इतरत्रहि होत आलेली आहे. केवळ भारतांतच नव्हे, तर अन्य देशांतहि दुर्ग आहेत. महाराष्ट्रांतले दुर्ग, कोट, गड, किल्ले वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मग ते गिरी दुर्ग असोत किंवा सिंधु दुर्ग असोत. महाराष्ट्राच्या मनाला प्रथम दुर्गांची कल्पना सुचली असेल ती सह्यगिरीकडे पाहूनच. थराथरांनीं रचलेल्या काळ्या फत्तरांमुळें सह्याद्रीवर जीं उंच आणि दुर्गम स्थळें निर्माण झालीं तीं पाहूनच दुर्गाच्या कल्पनेनें मराठी मनांत आकार घेतला असेल.

थराथरानें रचलेले हे काळ्या फत्तरांचे डोंगर माथ्यावर सपाट, चौकोनी असतात आणि त्यांना आपोआपच बांधीव किल्ल्याचा आकार आलेला असतो. कडे तुटून आपोआप तटबंदी होते. कातळाच्या भेगांतून पाणी झिरपून झरे होतात आणि ते बांधून काढले म्हणजे गडावर पाण्याची सोय होते. डोंगराच्या प्रत्येक टोंकावर नैसर्गिकच किल्ला होता, तो हेरून बांधून त्याला आपल्या राजकीय सत्तेचें केंद्र आणि रक्षणाचें स्थान बनविलें. मग असेच गड, कोट, दुर्ग, समुद्रांत बांधले, किनाऱ्यावर उभारले, सिध्या मैदानावरहि तयार केले. पण दुर्गम आणि अजिंक्य दुर्ग म्हणून डोंगरावरच्या किल्ल्यांचें महत्त्व असाधारणच राहिलें.

## किल्ल्यांचें कौतुक आणि कार्य

महाराष्ट्राच्या राजांनीं किल्ल्यांचें कौतुक फार पूर्वीपासून केलें आहे. कारण किल्ले दुर्गम असत आणि त्याच्यावर शत्रूनें टक्कर घेतली तर त्याचा कपाळमोक्ष होईल असा तट असे किंवा सैनिकांचा तट उभारून शत्रूंचा निःपात करतां येत असे. म्हणून शत्रूची सांवली न पडेल अशा ठिकाणींच म्हणजे किल्ल्यावर राज्यासनाची स्थापना होत असे. राष्ट्रकूटांनीं चंद्रादित्यपूर ( चांदूर ) येथें आपलें सिंहासन ठेवलें होतें. चालुक्यांनीं वातापिपूर म्हणजे बदामी ही राजधानी केली होती.

यादवांची देवगिरी तर प्रसिद्धच आहे. सामन्त शिलाहाराचें राज्यासन पन्हाळ्यावर होतें.

मुसलमानांचें आक्रमण झाल्यानंतरहि किल्ल्यांचें महत्त्व हटलें नाहीं. तें वाढतच गेलें आणि शिवकालांत कळसाला पोंइलें. सह्याद्रि आणि त्याच्यावरील किल्ले यांना परिस्थितीला अनुरूप अशा गनिमीकाव्याची जोड देऊन शिवछत्रपतींनीं जें लष्करी डावपेंचांचें राजकारण घुमवलें त्यामुळें महाराष्ट्रांतील किल्ले इतिहासांत अमर झाले. तसे किल्ले तर महाराष्ट्रांत प्राचीन काळापासून होते. पण शिवछत्रपतींनीं जुन्या किल्ल्यांचा जीर्णोद्धार केला, नवे गड बांधले आणि दुर्ग वसविले. शिवछत्रपतींचें किल्ल्यांवर कांहीं विशेष प्रेम होतें. सह्याद्रीच्या शिखरावर, रायगडावर त्यांनीं आपली राजधानी ठेवली ती लष्करी कारणांमुळेंच. पण किल्ल्या-गडांना त्यांनीं दिलेलीं विशालगड, अजिंक्यतारा, प्रतापगड, रायगड, सिंधुदुर्ग हीं नांवें शिवरायाची काव्यमय दृष्टि आणि दुर्गांवरचें प्रेमच दाखवितात. नव्या महाराष्ट्रांत या किल्ल्यांचा उद्धार झाला पाहिजे.

## वैभवाचा राजमुकुट : लेणीं

आणि महाराष्ट्राचीं कोरीव लेणीं हा तर महाराष्ट्राच्या ऐतिहासिक प्रतिष्ठेचा आणि वैभवाचा राजमुकुटच आहे. भारतांत जेवढीं कोरीव लेणीं आहेत त्यांपैकीं नव्वद टक्के लेणीं खुद्द महाराष्ट्रांत आहेत. केवळ प्राचीन महाराष्ट्रांत नव्हेत, तर आजहि संपूर्णपणें मराठी असलेल्या प्रदेशांत आहेत. पण आपल्यापैकींच, आत्मविस्मृतीनें झपाटलेल्या, कांहीं जणांना या लेण्यांचा मराठी संस्कृतीशीं, मराठी कर्तृत्वाशीं संबंधच नाहीं असें वाटत होतें. आतां या लेण्यांचें महाराष्ट्रीयत्व पूर्णपणें सिद्ध झालें आहे.

काळेथर, एकसंध आणि कठीण दगड हें महाराष्ट्राचें वैशिष्ट्य आणि तेंच या लेण्यांचें माध्यम. भारतांत इतरत्र असा दगडच नाहीं. महाराष्ट्राला ही देणगी मिळाली आणि सोन्यावर करावें तेवढ्या सहजतेनें सूक्ष्म नक्षीचें काम करून, महाराष्ट्राला जी देणगी निसर्गानें दिली त्याच्यावर, मराठी माणसानें आपल्या कलेचे अलंकार चढविले. ही लेण्यांच्या शिल्पाची भव्य आणि दिव्य परंपरा बाराव्या शतकानंतर तुटली हें खरें. हा इतिहासांतील

अपघात आहे. असे अपघात जगाच्या इतिहासांत इतरत्रहि घडलेले आहेत. पण परंपरा तुटली तरी ती नव्हती असें म्हणतां येत नाहीं. तसें म्हटलें तर यादवांच्या पूर्वी शातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्यांची परंपराच महाराष्ट्राला नव्हती असें म्हणावें लागेल. महाराष्ट्राला या राज्यकर्त्यांची जी परंपरा आहे तीच परंपरा या लेण्यांतील शिल्पाला आहे.

अशोकाच्या धर्माज्ञांपासून महाराष्ट्रांतील शिलाखंडांवर शिल्पाचे प्रयोग सुरू झाले आणि ते अकराव्या शतकांत कोरण्यांत आलेल्या कान्हेरीच्या लेण्यांपर्यंत चालू होते. म्हणजे एक सहस्र वर्षांपेक्षांहि दीर्घ अशी ही शिल्पाची परंपरा आहे. एवढीं अनेक शिल्पें सहस्र वर्षांच्या दीर्घ कालांत उमलत होतीं. इ. स. ४०० ते ८०० या चारशें वर्षांत या शिल्पकलेनें वैभवाचा परमोच्च बिंदु गांठला होता. वेरूळ, घारापुरी, अजंठा येथील शिल्पें हीं कलाविकासाचें आणि विलासाचें शिखर गांठून बसलीं आहेत. या शिल्पांच्या सौंदर्यानें बुद्धि गुंग होते, मन चकित होतें आणि त्यांच्या भव्यतेनें आदराची भावना एवढी वाढते कीं प्रेक्षक आपोआप नत-मस्तक होतो.

हीं लेणीं म्हणजे बुद्धीचा, प्रतिभेचा आणि कारागिरीचा एक चमत्कार आहे. त्यांतील नाजुक कलाकुसर आणि भव्य खोदकाम दोन्हीहि आश्चर्य-चकित करणारीं आहेत. ज्या पुरुषांच्या बुद्धींत हीं शिल्पें प्रथम कोरलीं गेलीं असतील ती केवढी भव्य असेल! कारण आधीं कोणातरी प्रचंड बुद्धीच्या शिल्पकाराच्या मनांत आकार घेतल्याशिवाय हीं शिल्पें शिला-खंडांत उमटणें शक्यच नव्हतें. आणि हें एवढें अवाढव्य कार्य पुरें करण्या-साठीं त्याला किती कारागीर लागले असतील! त्यांचें काम तरी किती दीर्घकाल चाललें असेल! एवढ्या लोकांकडून दीर्घकाल अविच्छिन्नपणें हें काम पुरें होण्याइतकी सुबत्ता आणि शांतता त्या काळांत महाराष्ट्रांत होती. आणि कलेचें कौतुक आणि अभिजात रसिकता तर होतीच!

### पुनरुत्थानाचे साक्षीदार

आणि म्हणतात कीं, एक वेरूळसारखें लेणें पुरें व्हायला शंभर वर्षेंहि पुरलीं नसतील. शिल्पकारांच्या चार पिढ्यांनीं आपलें सर्वस्व ओतून या

कलाकृती निर्माण केल्या. या महाराष्ट्राच्या लेण्यांत बौद्ध लेणीं आहेत, तशींच हिंदु लेणींहि आहेत. याचा अर्थ महाराष्ट्रांत त्या वेळीं बौद्ध धर्माचा-हि प्रसार झाला. पुढें राष्ट्रकूटांच्या वेळीं वैदिक धर्माचें पुनरुत्थान झालें. वैदिक धर्माचें हें पुनरुत्थान किती भव्य, वैभवशाली असेल, त्या वेळच्या मराठी हिंदूंची जीवनदृष्टि किती रसरशीत असेल, याचा प्रत्यय या लेण्यांत येतो. आणि या शिल्पांसाठीं त्या वेळच्या राजांनीं, राण्यांनीं तर धनराशी ओतल्याच, पण व्यापाऱ्यांनींहि पैसे दिले. पण हें कांहींच नाहीं. बुरूड, तांबट, तेली, कोष्टी, सुतार, गवंडी अशा लोकांनींहि देणग्यांचा वर्षाव केला अशी शिलालेखांची साक्ष आहे. राजांची आणि धनिकांचीच नव्हे तर सामान्य जनांची कलेला आश्रय देण्याची ही महाराष्ट्रीय परंपरा आहे !

लेण्यांतील शिल्पाच्या आपल्या या भव्य परंपरेची जाणीव यादव काला-पर्यंत होती. खुद्द ज्ञानदेवांनीं उपमेसाठीं लेण्यांचा उल्लेख केला आहे. पण यादवांबरोबर महाराष्ट्राचा उत्कर्ष संपला आणि मुसलमानी आक्रमणाबरोबर त्याचा सर्वांगीण अधःपात सुरू झाला. त्यांत केवळ ही शिल्पाची परंपराच तुटली असें नाहीं तर त्या धर्मवेड्यांनीं या शिल्पांतील मूर्तींचाहि विध्वंस केला. या विध्वंसांतून उरलें तें सुद्धां आज जगत्श्रेष्ठ ठरलें आहे.

## मराठी देवतांचें वैशिष्ट्य

सह्याद्रीवर जसे किल्ले आणि लेणीं आहेत तसेच देव आहेत. सह्याद्रीहि तसा हिमालयासारखाच देवतात्मा आहे. हिमालयावर कैलास आहे तसाच सह्याद्रीवरहि कैलास आहे. तो कैलास निसर्गानें निर्माण केला, हा कैलास लेण्यांत माणसानें कोरला. कारण महादेव जेव्हां सह्याद्रीवर राहण्यास आले तेव्हां त्याच्या भक्तांना त्याच्यासाठीं कैलासाची प्रतिसृष्टि निर्माण करणें भागच होतें. भावबळानें महादेव आणि बुद्धिबळानें कैलास आणला. तेव्हांपासून तो महादेव अनंत रूपांनीं सह्याद्रीच्या शिखरांवर राहिला आहे.

सह्याद्रीवर तो राहिला हें आश्चर्य नव्हे. तो प्रत्येक गांवांत आणि गांवाबाहेरहि राहिला. तो गांवाबाहेर राहिला तेथूनच गांवाची शीव सुरू होते. आणि गांवागांवांत तर तो स्वयंभू होऊन राहिला आहे. पण सह्याद्रि त्याला विशेष आवडला. कारण शंकराचीं ज्योतिर्लिंगें उभ्या

भारतांत बारा आहेत तर एकट्या महाराष्ट्रांत त्यांतलीं पांच आहेत. भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, अवंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ आणि घृष्णेश्वर. जसें प्रत्येक मराठी गांव त्यानें पावन केलें, तसेंच प्रत्येक गिरिशिखर पवित्र केलें. येथें डोंगराचेंच नांव महादेव आहे! शिखर शिंगणापूरचा महादेव तर महाराष्ट्राचा कुलदेव आहे. हिमालयावर केदार आहे आणि तो महाराष्ट्रांतहि आहे. रत्नासुराला मारण्यासाठीं तो महालक्ष्मीला साह्य होऊन दक्षिणेंत आला आणि 'दक्षिण काशी' जें करवीर त्याच्या शेजारीं रत्नागिरीच्या डोंगरावर ज्योतिबा होऊन राहिला. हाच दक्षिण केदार. तो केवळ रत्नागिरीवरच ज्योतिबा होऊन राहिला नाहीं तर रवळनाथ होऊन त्यानें मलबारपर्यंत सबंध दक्षिण कोंकण व्यापून टाकलें आहे.

## महादेवाचा परिवार

शंकर हा महाराष्ट्राचा कुलदेव आहे आणि त्यामुळें त्याचें सगळें कुटुंब आणि परिवार महाराष्ट्रांत मोठ्या प्रेमानें स्थायिक झालेला आहे. शंकराचा ज्येष्ठ पुत्र स्कंद. तो खंडोबा होऊन राहिला आहे. पण हा स्कंद मातेचेंहि मुखावलोकन न करण्याची शपथ वहाणारा स्त्रीद्वेष्टा नव्हे. हा तर लग्नें करून बसला आहे. पण खंडोबानेंच लग्नें केलीं असें नाहीं. तिकडे दक्षिणेंतल्या सुब्रह्मण्यमूर्नेहि असेच विवाह केले आहेत. हा खंडोबा मूळ आदिवासींचा देव आहे असें संशोधक म्हणतात. पण तो आज अनेक जातींच्या कुटुंबांचा कुलदेव झालेला आहे. खंडोबा एकट्या जेजुरीलाच नाहीं. पाली, निंबगांव, मनसुळी, पेमपूर अशा अनेक ठिकाणीं तो आहे.

जसा स्कंद तसा गणपति. गणेशाची महाराष्ट्रावर विशेषच कृपा. अष्टविनायकांचीं सारीं स्थानें महाराष्ट्रांतच आहेत. आणि त्यांच्याशिवाय अनेक गणेशक्षेत्रें महाराष्ट्रांत आहेत. गणेशपुराणांतील अनेक कथा तर विदर्भांतच घडल्या असें सांगितलेलें आहे. नागपूर जिल्ह्यांत आदासा ऊर्फ अदोषक्षेत्र येथें चिंतामणीची प्रचंड मूर्ति आहे. गणेशपुराणांतील कदंब आणि सिद्धक्षेत्र म्हणजेच आजच्या विदर्भांतील कळंब आणि सिंदखेड. त्रिपुरी म्हणजे तिवरी. आणि या ठिकाणीं गणेशाचीं प्राचीन मंदिरें आहेत. 'गणानां त्वा...' मंत्राचा द्रष्टा वैदिक ऋषि गृत्समद हा विदर्भांतील कळंबचा.

चिंचवडच्या मोरया गोसाव्यांपासून गणपतिपुळ्याच्या हरभट पटवर्धनांपर्यंत गाणपत्यांची ही परंपरा आहे. पेशवे गणपतीचे उपासक होते. पण बहुजनांत गणेशाची भक्ति त्यापूर्वींपासूनच होती. सार्वजनिक गणेशोत्सवाला लोकमान्य टिळकांनीं राष्ट्रीय स्वरूप आणलें. सार्वजनिक गणेशोत्सवांत उत्साहाचा पूर येतो. हा उत्सव हें महाराष्ट्राचेंच वैशिष्ट्य आहे. भैरव हा शिवाच्या परिवारांतलाच आहे आणि त्याचीं मंदिरें महाराष्ट्रांत सर्वत्र आहेत. तो बहिरोबा म्हणूनहि सर्वत्र परिचित आहे.

## दत्तात्रेय आणि परशुराम

सह्याद्रीवरचा दुसरा देव दत्त. ज्या अत्रिऋषींचा हा पुत्र त्यांचा आश्रम पूर्वीं महाराष्ट्रांत नसेल. पण दत्तात्रेयाचा सह्याद्रीवर निवास आहे. तो एका ठिकाणीं स्नान, दुसऱ्या ठिकाणीं भोजन, तिसऱ्या ठिकाणीं विश्रांति घेतो. त्याची त्रिस्थळी सह्याद्रीवरच आहे. माहूर, करवीर हीं दत्ताचीं प्राचीन क्षेत्रें. या सह्याद्रीवर राहूनच त्यानें अलर्काला आणि सहस्रार्जुनाला गुरूपदेश दिला. गोरक्षाचें गर्वहरण करून त्याच्याशीं संवादहि येथेंच केला. महाराष्ट्रांत दत्तसंप्रदाय फार मोठा आहे. त्यांत कडक सोंवळ्याचा पंथ आहे तसाच सोंवळें न मानणारा पंथ आहे. श्रीनरसिंहसरस्वतींना गुरु दत्ताचे अवतार मानतात. त्याचें जन्मस्थान विदर्भांत कारंजा येथें, तर त्याची कर्मभूमि औदुंबर, नरसोबा वाडी आणि गाणगापूर येथें. दत्तसंप्रदायांतले कितीतरी सत्पुरुष महाराष्ट्रांत झाले. कारण सह्याद्रीवर तो अजून आहे.

आणि सह्याद्रीवरचा मोठा देव परशुराम. त्याचा जन्महि सह्याद्रीवरच झाला असला पाहिजे. कारण भृगुकच्छ म्हणजे आजचें भडोच हाच भृगूंचा आश्रम होता. उन्मत्त राजांनीं परशुरामाच्या पित्याला आणि मातेलाहि मारलें. त्याचा सूड म्हणून त्यानें त्यांचा फार नाश केला. पण सूडबुद्धीनें जो रक्तपात झाला त्यामुळें त्याला अपरान्तांत निघून यावें लागलें. त्या वेळचें तें निर्जन अरण्य तेथेंहि अर्जुन वृक्ष तोडले, धरती मातेला फाळलें आणि पर्जन्य पडल्यानंतर ती त्याची माता जिवंतहि झाली. शेतें पिकलीं. सह्याद्रीवर उभें राहून त्यानें बाण मारून समुद्र मागें हटविला आणि

कोंकण निर्माण झालें. कोंकण हें परशुरामक्षेत्रच आहे. साल्हेरच्या डोंगरावर परशुरामाचें मंदिर आहे. येथूनच परशुरामानें समुद्रावर बाण मारला म्हणतात. येथून तीन कोस अंतरावर एका डोंगराच्या तटाला आरपार भोंक पडलें आहे. हें भोंक परशुरामाच्या बाणानेंच पडलें अशी दंतकथा आहे. सह्याद्रीच्या शिखरावरून परशुरामानें परशु फेंकला आणि शूर्पारक प्रदेश निर्माण झाला. अजूनहि परशुराम महेंद्र पर्वतावर आहे. हा महेंद्र पर्वत म्हणजे सह्याद्रीचा केरळांतील भाग. सह्याद्रीच्या कोंकणांतल्या परशुराम येथील डोंगरालाहि महेंद्र हेंच स्थानिक नांव आहे. कोंकणांत ब्राह्मणांपासून कोळ्यांपर्यंत परशुरामाशीं संबंध सांगणाऱ्या कितीतरी जाती आहेत.

## महाराष्ट्राच्या कुलदेवता

परशुरामाप्रमाणेंच त्याची क्षत्रिय माता रेणुका ही सुद्धां सह्याद्रीवरची देवता होऊन बसली आहे. कान्यकुब्जाहून परशुरामानें आपल्या पित्याचा मृतदेह आणि मरणोन्मुख माता यांना कावडींतून माहूर येथें आणलें आणि दत्तात्रेयाच्या साक्षीनें त्यांचा तेथें अग्निसंस्कार केला. रेणुकेचें परशुरामावर अत्यंत प्रेम होतें. ती प्रेमळ माता आज अनेक वन्य जमातींची माताच बनली आहे. निरनिराळ्या नांवांनीं ती सह्याद्रीवर निरनिराळ्या ठिकाणीं देवतास्वरूप होऊन राहिली आहे.

आणि भवानी माता ही तर महाराष्ट्राची कुलदेवता आहे. महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यदात्या शिवप्रभूला तिचें वरदान होतें. ती तुळजापूरची भवानी रामवरदायिनी आहे. ती ज्याला वर देईल तो यशस्वीच होतो. दंडकारण्यांत सीतेसाठीं शोक करणाऱ्या रामचंद्राची परीक्षा घेण्यासाठीं ती सीतेचें रूप घेऊन आली होती. पण रामचंद्रानें त्या पार्वती मातेला ओळखलें. रामाला वरदान देऊन ती तेथेंच राहिली.

तशीच कोल्हापूरची अंबाबाई. ती कोल्हासुराचा पुत्र करवीर याचा वध करून तेथें राहिली आहे. ही करवीरवासिनी महालक्ष्मी अनेक राज-कुलांची कुलदेवता होती. चालुक्यांची ती कुलदेवता होती. शिलाहार तर स्वतःला महालक्ष्मीलब्धवरप्रसादच मानीत होते. तिच्यामुळें कोल्हापूर हें पुण्यक्षेत्र दक्षिण काशी बनलें. उत्तर काशीपेक्षांहि यवाधिक एवढें तिचें

महत्त्व आहे. हे देव आणि देवता एकट्या महाराष्ट्राच्या नाहींत. उत्तरेंतून, क्वचित् दक्षिणेंतून त्या महाराष्ट्रांत आल्या. पण महाराष्ट्रांत त्या मराठी बनल्या. त्यांचें स्वरूप येथें वैशिष्ट्यपूर्ण बनलें. या सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण आहे तो 'पति लक्ष्मीचा' पांडुरंग.

## 'पति लक्षुमीचा' : विठ्ठल

उत्तरेला बदरी नारायणापासून दक्षिणेला अनंतशयनमूपर्यंत आणि पश्चिमेला द्वारकाधीश कृष्णापासून पुरीच्या जगन्नाथापर्यंत विष्णुभक्ति भारतांत सर्वत्र पसरली आहे. पण कटीवर हात ठेवून भक्तापुढें 'अठ्ठावीस युगें' विटेवर उभा राहिलेला हा विठ्ठल वेगळाच आहे. तो विष्णूहून वेगळा नाहीं; पण अस्सल मराठी आहे. द्वारकेच्या कृष्णानें विदर्भकन्या रुक्मिणीला वरलें. पण त्या रुक्मिणीसाठींच तो द्वारकाधीश दिंडीरवनांत आला. हा विठ्ठल मूळचा कृष्णच आहे. पण रणछोड नव्हे; तर रुक्मिणीपति.

तसा एक विष्णूचा अवतार महाराष्ट्रांत राहिलाच आहे. विठ्ठला-प्रमाणेंच तोहि काळा आहे. काळा राम. तो येथें राहिला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पित्याचा शब्द खरा करण्यासाठीं तो पूर्वीं चौदा वर्षें या दंडकारण्यांत राहिलाच होता. तेथेंच आतां राहिला आहे. पण राम हा सर्वत्र रामच राहिला. तसें कृष्णाचें नाहीं. तो नाटकी आहे. जेथें जाईल तेथें वेगळें सोंग घेतो. तसाच त्यानें येथें दिंडीरवनांत आल्यावर पूर्वीचा गोकुळींच्या गुराख्याचा वेष घेतला आहे. तो इथें आला तो रुक्मिणीला शोधीत.

गोकुळांतले ढंग जेव्हां त्या कृष्णानें द्वारकेंत सुरू केले, जेव्हां त्याच्या अंकावर राधा बसलेली रुक्मिणीला दिसली, तेव्हां ती रागावून दिंडीरवनांत आली. आणि तिला शोधीत कृष्ण येथें आला. इथें आल्यानंतर तो पुंडलिकाच्या भक्तीवर प्रसन्न झाला आणि त्यानें फेंकलेल्या विटेवर त्याची वाट पहात उभा राहिला. अजूनहि तो तेथें भक्तांची वाट पहात उभाच आहे. रुक्मिणी त्याच्याजवळ उभी नाहीं. तिचें देऊळ वेगळेंच आहे.

'गुजराती' कृष्णाचा मराठी विठ्ठल झाला. पण तो कसा? तर 'विठ्ठल कानडें बोलूं जाणे। त्याची भाषा पुंडलिक नेणे' असा! असा हा

कानडा विठ्ठल आहे. कारण तो देवगिरीचा पाडाव होऊन मुसलमानी धुमाकूळ सुरू झाल्यानंतर मुळीं कर्नाटकांत, विजयानगरला गेला होता. तेथें तो कानडी शिकला! तेथून त्याला भानुदासानें परत आणलें. हा विठ्ठल विशिष्टांचा देव नाहीं, तो सर्वांचा आहे. त्यानें जमीनजुमले जमवून आणि धनसंपदा एकत्र करून स्वतःचें संस्थान थाटलेलें नाहीं. अजूनहि तो गोपाळांनीं सोडलेल्या शिदोऱ्यांवरच काला करीत आहे. आणि त्याची ही प्रथा आजची नाहीं. महाराष्ट्रांतील वैष्णवांचें हें आद्यपीठ प्रथमपासूनच तसें आहे. यादवांच्या काळांत त्याचें आजचें मंदिर प्रथम उभारलें गेलें तेव्हांहि रामदेराव यादव, हेमाडपंत यांच्यापासून कोंकणी शेतकऱ्यांपर्यंत सर्वांनीं पैसे जमवून तें उभारलें. एकटा यादव राजा किंवा त्याचा प्रधानहि तें बांधूं शकला असता; पण या 'समाज'वादी देवाला तसें नको होतें.

महाराष्ट्राचें हें वैशिष्ट्य आहे कीं इथलीं लेणीं असोत किंवा मंदिरें असोत तीं सर्वांनीं बांधायचीं. पांडुरंगाच्या देवळांत चौऱ्यांयशींचा दगड आहे. त्या शिलालेखावर या देवळाला वर्गणी देणाऱ्यांचीं नांवें कोरलेलीं आहेत. सगळ्या समाजाला धरून, समाजाकडून महाकार्यें करवावयाची ही महाराष्ट्रांतील दगडावरची रेघ आहे!

## बौद्ध आणि जैन परंपरा

आणि महाराष्ट्राचा हा स्वभाव महाराष्ट्रभूमीवर जे धर्मपंथ रुजले आणि वाढले त्यांनीं घडविला आहे. अनेक धर्मपंथ कालसागरांत लुप्त झाले असले तरी त्यांनीं महाराष्ट्राचा स्वभाव बनविला नाहीं असें कसें म्हणतां येईल! त्या धर्मपंथांच्या खुणा अजूनहि आहेत. ते धर्मपंथ मूळस्वरूपांत नसले तरी महाराष्ट्र संस्कृतींत विलीन होऊन कित्येकदां नव्या स्वरूपांतहि प्रगट झालेले आहेत. आर्यांची वैदिक परंपरा जशी येथें अविच्छिन्न आहे तशीच त्या परंपरेंत द्राविड परंपराहि मिसळून गेली आहे.

नव-बौद्ध पंथाचें पुनरुज्जीवन आज महाराष्ट्रांतच होत आहे. पण ही बौद्धपरंपरा येथें नवी नाहीं. मध्यंतरीं ती लुप्त झाली होती. पण त्यापूर्वीं बौद्ध धर्म येथें मोठ्या वैभवांत असला पाहिजे हें बौद्धांचीं जीं भव्योदात्त लेणीं महाराष्ट्रांत कोरलेलीं आहेत त्यांवरूनच सिद्ध होतें. तो बौद्ध धर्म

येथें कसा वाढला, त्यानें भाषेची आणि वाङ्मयाची कशी सेवा केली, तो येथें लुप्त कसा झाला, हा एक संशोधनाचा विषय आहे. नव्या महाराष्ट्रांत हें संशोधन होईल यांत शंका नाहीं. कारण येथें आतां बौद्ध धर्माचा पुनरवतारच झाला आहे. महाराष्ट्राच्या भाषेनें मराठी रूप धारण केलें तेव्हां येथें बौद्ध धर्म नसेल, पण प्राकृत, अपभ्रंश, महाराष्ट्री हीं तिचीं पूर्वरूपें घडत असतांना येथें बौद्ध धर्मांचा प्रभाव होता. बौद्ध पंडित नागार्जुन हा सातवाहन हालाचा मित्र आणि हितोपदेशक होता.

महाराष्ट्रांत जैनांचा धर्मप्रसार फारच जोरदार झाला. चालुक्य आणि राष्ट्रकूट हे जैनमताचे अनुयायी होते. या राजांच्या आश्रयानें जैनांचे अनेक धर्मग्रंथ महाराष्ट्रामध्यें लिहिले गेले. आजहि कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या महाराष्ट्राच्या दक्षिण आणि पूर्व सीमांवर जैनांची वस्ती आहे. महाराष्ट्री भाषा घेऊन जैन धर्म कर्नाटकाच्या गाभ्यापर्यंत पोंचला होता; आणि हें कार्य त्यानें दोन हजार वर्षांपूर्वींच केलें. कर्नाटकांतील जैनांचा धर्मपंथ बसवाच्या लिंगायत संप्रदायानें हटवून टाकला. जसा जैनपंथ हटला तशीच कर्नाटकांतील मराठी भाषाहि हटली. कारण लिंगायत संप्रदायानें कानडीचा पुरस्कार केला होता. पण आजहि म्हैसूरला श्रवणबेळगोळा येथें मराठी जैनांची संघटित वस्ती आहे. याच ठिकाणीं गोमतेश्वराच्या प्रचंड मूर्तीच्या पायांशीं पहिला मराठी शिलालेख आहे. जैनांनीं केलेल्या मराठी भाषेच्या सेवेचें तें प्रतीकच आहे.

## नाथपंथ आणि महानुभाव

महाराष्ट्रांत नाथपंथ निर्माण झाला नसला तरी तो येथें वाढला होता. त्र्यंबकेश्वरला गोरक्ष गुहा आहे. गोरक्षांची समाधि नेवाशाच्या डोंगरांत तर मत्स्येंद्रनाथांची मत्स्येंद्रगडावर आहे. डवरी गोसावी आणि नाथपंथी जोगी या जाती होऊन आज महाराष्ट्रांत उरल्या आहेत. महाराष्ट्राच्या वारकरी पंथाच्या गुरुस्थानींच हा नाथपंथ आहे. कारण ज्या ज्ञानदेवांनीं वारकरी पंथाचा 'पाया रचिला' त्यांचे गुरु निवृत्तिनाथ यांना गैनीनाथांनीं कृतार्थ केलें होतें. नाथांचें तत्त्वज्ञान वारकरी पंथांत विरून गेलें आणि तो संप्रदाय जातीच्या रूपानें शिल्लक उरला आहे.

वारकरी पंथानें केलेलें कार्य भाषेच्या दृष्टीनें तसेंच सामाजिक आणि राजकीय दृष्टीनेंहि ऐतिहासिक स्वरूपाचें होऊन राहिलें आहे. पण मराठी भाषेच्या पायावर महाराष्ट्राचें एकीकरण साधण्याचा पहिला प्रयत्न महानुभावांनीं केला. महानुभाव पंथ हा पहिला शुद्ध मराठी धर्मपंथ. त्याचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी गुजरातेंतून महाराष्ट्रांत आले. विदर्भांत ऋद्धिपूर येथें श्रीगोविंदस्वामींचे ते शिष्य झाले. सालबर्डीच्या डोंगरावर तपश्चर्या करून साक्षात्कार झाल्यानंतर त्यांनीं महानुभाव पंथ स्थापन केला. यांनीं कृष्णोपासना वाढविली. महानुभाव हे एकेश्वरी आणि अवतारवादी. श्रीदत्तात्रेय, श्रीकृष्ण चक्रवर्ति, श्रीचक्रपाणी, श्रीगोविंदप्रभु आणि श्रीचक्रधर यांना महानुभाव ‘पंचकृष्ण’ मानतात. महानुभाव चातुर्वर्ण्य आणि वेदप्रामाण्य मानीत नाहींत.

महानुभावांनीं आपला पंथ पंजाब, सरहद्द प्रांत, काश्मीर या ठिकाणीं नेला; आणि त्याबरोबर धर्मभाषा म्हणून मराठीलाहि उत्तरेंत नेलें. त्यांचा तो ‘जयकृष्णी’ पंथ अजूनहि उत्तर हिंदुस्थानांत आहे. महानुभावांचा महाराष्ट्राबद्दलचा अभिमान अत्यंत जाज्वल्य. ‘महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र । महंत म्हणजे थोर’ ही त्यांची गर्जना. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचा विस्तार आणि व्याख्या महानुभावांनीं स्पष्ट सांगून ठेवल्या आहेत. ते म्हणतात : ‘देश भणिजे खंडमंडळ : जैसें फलेठाणापासौनि दक्षिणेसी : **मऱ्हाठी भाषा जेतुला ठायीं वर्ते तेतुलें एक मंडळ** : तयासि उत्तरे बालेघाटाचा सेवट : ऐसें एक खंडमंडळ : मग उभें गंगातीर तेंहि एक खंडमंडळ : आणि तयापासौनि मेघंकर घाट तें एक खंडमंडळ : तयापासौनि आवघें वराड तें एक खंडमंडळ : परि **आवघीं मिळौनि महाराष्ट्रचि बोलिजे** : किंचित् किंचित् भाषेचा पालट : भणोनि खंडमंडळें भणावीं :’

## वारकरी भागवत संप्रदाय

महानुभावांनंतर वारकऱ्यांचा भागवत संप्रदाय महाराष्ट्रांत बहरला असला तरी अद्वैत तत्त्वज्ञानानें परिपुष्ट झालेला हा भक्तिमार्ग महाराष्ट्रांत महानुभावांपेक्षां प्राचीन आहे. ‘पुंडलिकाच्या भेटी परब्रह्म आलें’ तेव्हां-

पासून हा संप्रदाय निर्माण झाला असला पाहिजे. ज्ञानदेव-नामदेवांनीं तो परिपुष्ट केला. ज्ञानदेवानें ज्ञानदेवी सांगून त्याचा पाया रचला. नामदेवानें ‘ कीर्नतरंगीं नाचून ’ त्याचा विस्तार केला. एका जनार्दनीं तो आणखी वाढला आणि तुका त्याचा कळस झाला. पण ती पताका खांद्यावर टाकून आजहि लाखों लोक पंढरीला प्रयाण करतात. भक्ति आणि ज्ञान यांची ध्वजा या संप्रदायानें पूर्वीं फडकविली. आजहि ती ध्वजा उंच आहे. या संप्रदायाचें कार्य भव्य आणि प्रचंड आहे. आणि हा संप्रदाय निर्माण झाला म्हणूनच महाराष्ट्र शिल्लक उरला.

यादवांचें राज्य संपून मुसलमानी राजवट आली आणि महाराष्ट्रावर प्रचंड संकट कोसळलें. या संकटांतून या पंथानें त्याला तारलें. देवाधर्माचा, भाषेचा, संस्कृतीचा अभिमान या पंथानें जिवंत केला आणि वाढविला; इतकेंच नव्हे तर तो हिंदुस्थानांत पसरविला. ज्ञानदेवांबरोबर नामदेवानें जी तीर्थावळी केली ती आज जशी अभंगरूपानें आहे तसाच नामदेवांचा भक्तिपंथ त्यांच्या नांवासह पंजाबांत अभंग आहे. नामदेवांची वाणी शिखांच्या आदिग्रंथांत आहे. वारकरी पंथाचा प्रसार आणि माहात्म्य महाराष्ट्रांतून उत्तरेला आणि दक्षिणेला पसरलें आहे.

### सामाजिक क्रांतीचे अग्रदूत

या वारकरी वैष्णव पंथानें जी सामाजिक क्रांति केली तिला तर तोडच नाहीं. अमृतातेंहि पैजा जिंकणाऱ्या भाषेंत ज्ञानदेव ज्या वेळीं ब्रह्मविद्या सुलभ सोपी करून सांगत होते त्या वेळीं ‘ सकलकला निवासु ’ रामदेव-रावाचा हेमाद्री प्रधान ‘ चतुर्वर्ग चिंतामणी ’ हा प्रचंड ग्रंथ लिहून व्रतखंड सांगत होता. वर्षाच्या ३६५ दिवसांचीं दोन हजार व्रतें त्यानें सांगितलीं आहेत; आणि पक्वान्नें आणि व्रतें यांची फारकत कुठेंहि केलेली नाहीं. या वेळीं जातिनिष्ठता आणि सुखपरायणता कळसाला पोंचली होती. वारकरी पंथानें त्याला उत्तर दिलें. ‘ वेदाचा तो अर्थ आम्हांसिची ठावा ’ अशा आत्मविश्वासानें त्यांनीं जें धर्मकार्य सुरू केलें त्यांत ब्राह्मण पण संन्याशाचा पुत्र ज्ञानदेव, शिंपी नामदेव, सोनार नरहरी, न्हावी सेना, गोरा कुंभार, सांवता माळी, रोहिदास चांभार आणि चोखामेळा महार अशा सर्व

जातीजमातींतून साक्षात्कारी संत निर्माण झाले. उच्चनीचतेला तिलांजलि देऊन ते पांडुरंगाच्या दर्शनासाठीं पंढरीला जात होते. त्यामुळें वृथा अभिमानाचा उच्छेद झाला, समता प्रत्यक्ष अवतरली, धर्माभिमान तरारला आणि ऐक्य दृढ झालें. म्हणूनच मुसलमानांच्या त्या भयानक राजवटींत मराठी संस्कृति टिकून राहिली. या पंथानें जी समाजक्रांति केली त्यामुळें राज्यक्रांतीचा मार्ग मोकळा झाला.

वारकरी पंथ दुबळा नाहीं. तो तेजस्वी आहे. कडक आहे. तसाच पवित्र आहे. महाराष्ट्रीय संतांनीं भक्तिप्रेम शिकविलें तें मातृप्रेम होतें; ती प्रियावल्लभाची मधुराभक्ति नव्हती. त्यामुळें उत्तरेंत जें मधुराभक्तीच्या आवरणाखालीं अधःपतित जीवन निर्माण झालें ते भ्रष्टाचार या धर्मपंथांत शिरले नाहींत. परस्त्रीबद्दल मातृभाव आणि कडक पावित्र्य पाळण्याचा उपदेश हें मराठी पंथाचें वैशिष्ट्यच आहे. दत्तसंप्रदाय जसा सोंवळा, तसाच रामदासी संप्रदायहि सोंवळा. त्यानें महाराष्ट्र-धर्माचा अभिमान चेतविला. तसाच बलोपासनेचा प्रचार केला. हनुमंताचें पूजन तर तो रामसखा असल्यामुळें उभ्या भारतांतच होतें. पण मारुतीचीं स्वतंत्र देवळें फक्त महाराष्ट्रांतच आहेत आणि तीं गांवोगांव आहेत. रामदासांनीं अकरा हनुमंतांची स्थापना केली तशीच मारुतीची उपासनाहि फैलाविली. महाराष्ट्राचें हें वैशिष्ट्य आहे.

## महाराष्ट्राची पुराण संस्कृति

महाराष्ट्राचा इतिहास फार प्राचीन आहे. दोन सहस्र वर्षांपूर्वीच्या कालासंबंधीं संगतवार माहिती मिळत नाहीं; त्या वेळच्या संस्कृतीचें तपशीलवार वर्णन करतां येत नाहीं. पण जें थोडेंफार उत्खनन कांहीं ठिकाणीं झालें आहे त्यावरून येथें समृद्ध अशी नागरी संस्कृति फार प्राचीन कालापासून नांदत होती असा निष्कर्ष निघाला आहे. पुराणांतील कथाहि या निष्कर्षाला पाठिंबा देतात. आपल्या प्राचीन ग्रंथांतील कथांवरून इतिहासपूर्वकालांतील महाराष्ट्राच्या कांहीं परंपरा निश्चित करतां येतात. हा प्रदेश दक्षिणापथांत मोडत होता त्या पूर्वीपासून हें दंडकारण्य म्हणून ज्ञात आहे. दंडकारण्याशीं इक्ष्वाकूचा पुत्र दंड याचें नांव जोडलेलें

ग्रा. क्र. ९०८५३

आहे. याच वंशांतील कल्माषपादाच्या पुत्रानें अश्मक हा प्रदेश स्थापन केला आणि त्याच्या मूलक नांवाच्या मुलानें मूलक प्रदेशाची स्थापना केली. असें हें पुराण आहे.

पश्चिम समुद्रपट्टींत परशुराम तसा पूर्व समुद्रकिनाऱ्याला अगस्ति ऋषि प्रसिद्ध आहे. अगस्ति प्रथम विदर्भात उतरला. विदर्भाचे उल्लेख पुराणांत विस्तारानें सांपडतात. काव्याची वैदर्भीरीति जितकी भारतविख्यात आहे तितक्याच विदर्भाच्या कन्यका इतिहासांत अमर आहेत. विदर्भ राजावरून विदर्भ हें प्रदेशाचें नांव पडलें असें म्हणतात. अगस्त्याची पत्नी लोपामुद्रा, नलाची दमयंती, अज राजाची इंदुमती, सगराची केशिनी आणि श्रीकृष्णाची रुक्मिणी प्रसिद्ध आहे.

## सातवाहन राजवंशाचें कार्य

सातवाहन महाराष्ट्राचें एकीकरण करणारे पहिले ज्ञात राजे होत. भारतांतील हा एक अग्रगण्य राजवंश असून त्याला पुराणांतील वंशावळींत-हि स्थान मिळालें आहे. आणि यांचे शिलालेख, नाणीं इत्यादि इतर साधनें उपलब्ध झाल्यामुळें यांचा इतिहास साधार दाखवितां येतो. याच राजवंशांतील शालिवाहनानें शक-क्षत्रपांचा पराभव करून त्यांना नर्मदा-पार हांकून दिलें. मातीच्या घोडेस्वारांचें सैन्य तयार करून यानें शत्रूंशीं मुकाबला केला ही याची दंतकथा मातीमोल माणसांतून वीरपुरुष निर्माण करण्याची किमया दाखवीत आहे. हाच शालिवाहन शककर्ता झाला आणि त्याचा विजयोत्सव गुढी उभारून वर्षारंभीं अजूनहि महाराष्ट्रांत साजरा केला जातो.

सातवाहनांच्या राजवंशांत अठ्ठावीस राजे झाले. वासिष्ठीपुत्र आनंद, गौतमीपुत्र सातकर्णी, वासिष्ठीपुत्र पुळुमावि, गौतमीपुत्र यज्ञश्री हे यांच्या-पैकीं विशेष प्रसिद्ध आहेत. या राजवंशाचा राज्यकाल आणि राज्यविस्तार दोन्हींहि मोठीं होतीं. बौद्ध धर्माप्रमाणें वैदिक धर्मालाहि यांनीं आश्रय दिला. यांची कारकीर्द वैभवशाली होती. सांचीचें दक्षिण तोरण हें आद्य सातवाहन कालांतील असून त्याच्यावर वासिष्ठीपुत्र आनंदाचे दानलेख कोरलेले आहेत. यांच्या कालांतच कोरीव लेणीं खोदण्यास सुरुवात झाली.

प्राकृत महाराष्ट्रीचे पुरस्कर्ते म्हणून सातवाहनांचें कार्य फार मोठें आहे. प्राकृताचा पुरस्कार केल्याबद्दल भारतांतील इतर राजांनीं आणि कित्येकदां खुद्द त्यांच्या राण्यांनींहि या सातवाहनांचा उपहास केला. पण यांनीं महाराष्ट्रीवरची आपली निष्ठा ढळूं दिली नाहीं. यांच्या काळांत महाराष्ट्री प्राकृत वैभवाच्या शिखरावर चढली. हाल सातवाहनानें रचिलेली गाथा सप्तशति हा ललित काव्यग्रंथ आहे. हा काव्यग्रंथ राजकीर्ति वर्णन करीत नाहीं तर लोकजीवन चित्रित करतो हा त्याचा अस्सल मराठी विशेष म्हणतां येईल.

विदर्भांत इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत अडीचशें वर्षें वाकाटकांचें राज्य होतें. यांच्या काळांत धर्म, विद्या व स्थापत्य, चित्र आणि शिल्प या कला उत्कर्षाला पावल्या. अजंठ्यांतील सोळा, सतरा आणि एकोणीस हीं उत्कृष्ट लेणीं यांच्या काळांत कोरलीं गेलीं. चालुक्य आणि राष्ट्रकूट या राजवंशांच्या काळांतहि महाराष्ट्राचें वैभव वाढतच गेलें. राष्ट्रकूटांच्या कारकीर्दींत वेरूळचीं आश्चर्यकारक लेणीं तयार झालीं. पश्चिम किनाऱ्यावर कदंब आणि चालुक्य हे राजवंश प्रसिद्धि पावले. चालुक्यांचीं दक्षिण कोंकण, ठाणें आणि कऱ्हाड या तीन ठिकाणीं राज्यें होतीं. महालक्ष्मी ही यांची कुलदेवता. अंबरनाथचें शिवमंदिर आणि कोल्हापूरचें अंबाबाईचें मंदिर हीं यांच्या आमदानींतलीं आहेत. मुसलमान पूर्वकाळांतला अखेरचा मराठी राजवंश यादवांचा. मराठीप्रमाणेंच गुजराती, कानडी, तेलुगु भाषेचा प्रदेश यांच्या अंमलाखालीं होता.

## हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत

रामदेवराव यादवाचा ‘ श्रीकरणाधिप ’ मुख्य कारभारी हेमाडपंत ऊर्फ हेमाद्रि हा मोठा ग्रंथकर्ता होता. त्यानें बिनचुन्याच्या इमारती बांधण्याची वास्तुपद्धति महाराष्ट्रांत आणली. ती हेमाडपंती बांधणी म्हणून प्रसिद्ध आहे. बाजरी हें धान्य यानेंच महाराष्ट्रांत आणलें. महाराष्ट्राचें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल अशा मोडी लिपीशीं हेमाडपंताचें नांव संबद्ध आहे. ही लिपि त्यानें लंकेतून आणली अशी दंतकथा आहे. पण ‘ हे लिपी विद्या सरस्वती । अगा झाली कैसी प्राप्ती । कृपा करूनी हेमाडपंतीं । जगा भातुकें दीधली । ’ असेंहि कौतुक केलेलें आहेच. मोडी ही खास महा-

राष्ट्राची लिपि आणि देवगिरीचा प्रसिद्ध कागद या दोन गोष्टींवरून या काळांतील लेखनकलेचा उत्कर्ष दिसून येतो. हेमाद्रीचा आश्रित बोपदेव हाहि प्रचंड विद्वान् होता. यानें व्याकरणावर दहा, वैद्यकावर नऊ, ज्योतिषावर एक, साहित्यशास्त्रावर तीन आणि भागवत तत्त्वावर तीन असे सव्वीस ग्रंथ लिहिले. यादवांच्या कारकीर्दीतच महानुभाव आणि वारकरी भागवत संप्रदाय यांना तेज चढूं लागलें

## 'आनंदवनभुवना' ची निर्मिति

यादवांच्या अस्तापासून शिवछत्रपतींच्या उदयापर्यंतचा महाराष्ट्राच्या इतिहासांतील मुसलमानी सत्तेचा काळ हा महाराष्ट्राच्या दुर्दशेचा फेरा होता. दिल्लीच्या खिलजीचें साम्राज्य महाराष्ट्रावर फार काळ राहिलें नाहीं. १२९४ सालीं देवगिरीचें राज्य नष्ट झालें आणि १३४७ सालीं खिलजीचा दक्षिणेंतील सुभेदार बहामनी नांव धारण करून स्वतंत्र सुलतान झाला. बहामनी सुलतान क्रूर आणि हिंदूंचे द्वेष्टे होते. त्यांनीं प्रजेचा अत्यंत छळ केला. यांच्या काळांत बारा वर्षांचा दुर्गादेवीचा दुष्काळ पडून मोठा नाश झाला. शंभर वर्षांत बहामनी राज्य मोडून वऱ्हाडची इमादशाही, बेदरची बरीदशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, अहमदनगरची आदिल-शाही आणि विजापूरची आदिलशाही अशा पांच शाह्या निर्माण झाल्या. विजापूरची आदिलशाही त्यांत बलिष्ठ होती सर्व सुलतान क्रूरच होते. पण त्यांच्या आपसांतील स्पर्धेमुळें हिंदु सरदारांना महत्त्व आलें; आणि तेहि हळूहळू बलिष्ठ झाले. पण या मराठा सरदारांतहि स्पर्धा आणि स्वार्थ होता. ध्येयवाद आणि दूरदृष्टि नव्हती. पण क्षीण होत चाललेल्या मुसलमानी सत्तेला उलथून स्वतंत्र मराठी राज्य स्थापणारा आणि हिंदवी राज्याचें ध्येय ठेवणारा शिवछत्रपतींसारखा युगंधर पुरुष पुढें निर्माण झाला. त्यानें महाराष्ट्राचा पुनरुद्धार केला आणि दिल्लीची पातशाही हलविली. शिव-राज्याभिषेकानें महाराष्ट्रांत सातवाहनानंतर दुसरा शककर्ता राजा झाला. 'बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावलें । अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवनभुवनीं ।' असे धन्योद्गार समर्थ रामदासांनीं काढले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ...
अनुक्रम ... ... ... वि. ...

## तो भीम-पराक्रम

शिवछत्रपतींनंतर शंभूराजाला औरंगजेबानें विश्वासघातानें पकडलें आणि हालहाल करून ठार मारलें. महाराष्ट्राचा राजा मारला गेला तेव्हां महाराष्ट्र चिरडून टाकूं असें म्हणत औरंगजेब स्वतः दक्षिणेंत आला. मराठ्यांना नेता नव्हता. तरीहि धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांच्या नेतृत्वाखालीं औरंगजेबाला सतरा वर्षें महाराष्ट्रानें तोंड दिलें. मराठ्यांना मारण्यासाठीं आलेला औरंगजेब निराशेनें खंगून मेला आणि औरंगाबाद येथें मराठी भूमींतच गाडला गेला. महाराष्ट्राचा हा अपूर्व पराक्रम शिवछत्रपतींच्या पुण्याईचा आणि त्यांनीं निर्माण केलेल्या ध्येयवादाचा परिपाक होता. याच ध्येयवादावर मराठ्यांनीं अटकेपार झेंडे लावले. पण शिवछत्रपति वारंवार जन्माला येत नसतात. इंग्रज हिंदुस्थान गिळीत होते. पण त्यांच्याशीं अखेरपर्यंत मुकाबला करीत राहिला तो महाराष्ट्रच. ब्रिटिश राजवटीविरुद्ध बंड करणाऱ्यांत महाराष्ट्रच अग्रेसर राहिला. क्रांतिकारकांपासून प्रज्ञावंत क्रांतदर्शी नेत्यांपर्यंत सर्व तऱ्हेचें नेतृत्व भारताला महाराष्ट्रानें दिलें. न्या. रानडे, गोखले, लोकमान्य टिळक हीं नांवें राष्ट्रपुरुष म्हणून भारतमान्य झालीं. नवीं ध्येयें, नवे विचार आकलन करून ते आपल्या कर्तृत्वाच्या मुशींत घालून परंपरेशीं जुळणारें असें त्यांचें बावनकशी सुवर्ण बनवावयाचें ही महाराष्ट्राची विद्या आहे.

आजची मराठी भाषा साधारणतः अकराव्या शतकापासून वेगळी अशी ओळखण्यांत येत आहे. मराठी भाषेचें मूळ शोधीत जायचें तर तें पूर्ववैदिक संस्कृतांत शोधलें पाहिजे. या पूर्ववैदिक संस्कृतपासून एकीकडे वैदिक संस्कृत, पौराणिक संस्कृत असें संस्कृताचें रूप पालटत गेलें तर दुसरीकडे प्राकृतभाषा, महाराष्ट्री, अपभ्रंश महाराष्ट्री आणि मराठी अशी भाषा विकसत गेली असें विद्वानांनीं ठरविलें आहे. सामान्य लोकांच्या बोलण्यांत भाषेचें जें रूप येतें तेंच अखेर प्रभावी ठरतें आणि तेंच शेवटीं शिष्टसमत ठरून तिला व्याकरणबद्ध, नियमबद्ध करण्यांत येतें. पुन्हा लोकभाषेनें हें व्याकरण आणि नियम मागें पडतात. भाषा नुसती तोंडांतच राहिली

तर तिचें स्वरूप सारखेंच बदलत जाईल. पण ती ग्रंथनिविष्ट झाल्यानें तिला बरेंच स्थिर स्वरूप येतें.

## मराठी भाषेची पाळेंमुळें

मराठी भाषा संस्कृतापासून निघाली आहे म्हणजे ती आर्यांनीं येथें आणली. विदर्भ, देश आणि कोंकण या महाराष्ट्राच्या तीन प्रदेशांत अगस्त्य, गौतम आणि भार्गव या कुलांतील लोक प्रथम आले. त्यांच्या पूर्वीच्या दंडकारण्यांत कोणती भाषा असेल हें आज सांगतां येत नाहीं. पण येथें पूर्वी अनेक वंशांचे लोक होते. द्राविडांची मोठी संपन्न संस्कृति दक्षिणेंत होती. प्राकृत, महाराष्ट्री या भाषा बनतांना संस्कृत भाषेवर या भिन्न वंशांच्या मूळ भाषांचे संस्कार झालेच असले पाहिजेत. आई, बाप, डोळा, पोट, वाट, हाड, दोरी, थेंब, गवत असे अनेक शब्द मराठींत रूढ आहेत आणि त्यांचें मूळ संस्कृतांत कुठेंहि सांपडत नाहीं. तेव्हां हे शब्द महाराष्ट्र भूमीवरच्या प्राचीन वंशांच्या बोलभाषांतून मराठींत आले असले पाहिजेत असा विद्वानांचा सिद्धान्त आहे. ओवी, दिंडी हे छंदहि अस्सल मराठी आहेत.

महाराष्ट्री प्राकृताला सातवाहनांनीं प्रतिष्ठा आणून दिली आणि तिच्यामध्यें ग्रंथरचना होऊं लागली. हाल सातवाहनाची गाथा सप्तशती हा ग्रंथ या महाराष्ट्रीच्या सामर्थ्याचा एक नमुना आहे. महाराष्ट्री ग्रंथरचनेनें समृद्ध झाली. सातवाहनांनीं महाराष्ट्रीला दिलेला आश्रय पुढें चालुक्य आणि राष्ट्रकूट यांच्या काळांतहि कायम होता. अनेक जैन धर्मग्रंथ महाराष्ट्रींत लिहिले गेले. अशा समृद्ध महाराष्ट्रींतूनच मराठी जन्माला आली.

बौद्ध, जैन धर्मांच्या प्रसारामुळें पाली-अर्धमागधी या संस्कृतोद्भव भाषांनीं महाराष्ट्रीवर संस्कार केले. त्या मानानें द्राविडी भाषांचे संस्कार मराठीवर खोल झाले नाहींत. तथापि अनेक कानडी शब्द चपखलपणें मराठींत बसून गेले आहेत. मुसलमानी अमदानींत अरबी, फारशी शब्द मराठींत रूढ झाले. एकनाथांच्या मराठीवर या यावनी भाषांचा संस्कार दिसतो. अरबी-फारशी शब्द वेंचून काढून मराठीला तिच्या संस्कृताच्या मुळांतून जीवनरस मिळवून देण्याचा उद्योग करण्यास शिवछत्रपतींचाच

अवतार व्हावा लागला. भाषेच्या प्रकृतीशीं न जुळणारे परकी शब्द एकदां भाषेंत घुसले म्हणजे ते बांडगुळासारखे होतात आणि भाषेंतील मूळ शब्दांचा ऱ्हास करतात.

शिवशाहीनंतर भाषेकडे इतक्या शुद्ध शास्त्रीय दृष्टीनें पाहिलें गेलें नाहीं. पेशवाईत पुन्हा अरबी-फारशी शब्दांचें स्तोम माजलें. पुढें इंग्रजी आली. इंग्रजांनीं जी संस्कृति आणि सुधारणा आणली त्याबरोबर इंग्रजी शब्दहि मराठींत आले. पण ते फारशीइतक्या प्रमाणांत आले नाहींत. इंग्रजी भाषेबरोबर संस्कृतच्या अभ्यासालाहि चालना मिळाली. शिक्षणाचा प्रसार होऊं लागला. इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनानें मराठी गद्याचा नवा अवतार झाला; आणि त्यामुळें संस्कृतप्रचुर शब्दांची आणि इंग्रजी वळणाच्या वाक्यरचनेचा परिणाम झालेल्या शैलींतील मराठी भाषा वाढूं लागली.

**छपन्न भाषांचा रस**

कोंकणांतील कोंकणी, खानदेशांतील अहिराणी आणि विदर्भांतील वऱ्हाडी या महाराष्ट्रांतील प्रमुख बोली. या बोलभाषा वैशिष्ट्यपूर्ण आहेत. पण त्या मराठीच आहेत. भाषेचा किंचित् किंचित् पालट म्हणून खंडमंडळ, पण सर्व मिळून महाराष्ट्र हें आठशें वर्षांपूर्वींच महानुभावांनीं सांगून टाकलें आहे. शिक्षितांची भाषा आणि ग्रांथिक भाषा यांच्यापेक्षां खेड्यांतील लोकभाषा थोडी वेगळी असते. लोकभाषेंतील शब्दसंपत्ति आणि बोलींचे विशेष यांच्यामुळें ग्रांथिक भाषा समृद्ध होत असते.

मराठी भाषेला धर्मभाषा म्हणून महानुभावांनीं डोक्यावर घेतलें. त्यांनीं मराठीचा जसा प्रचार केला तशीच मराठींत ग्रंथरचना करून तिला समृद्ध केलें. विशेष म्हणजे त्यांची ग्रंथरचना गद्यांत आहे. पण महानुभावांनीं अनेक तऱ्हेच्या गुप्त लिप्या वापरून आपलें वाङ्मय बंदिस्त ठेवलें. त्यामुळें त्यांच्या पंथाबाहेर बहुजनसमाजावर या ग्रंथाचा परिणाम झाला नाहीं. कै. राजवाडे यांनीं महानुभावांची लिपि शोधून काढून त्यांचे ग्रंथ बाहेर आणल्यामुळें आठशें वर्षांनंतर बहुजनांना खुले झाले.

मराठी भाषेचें श्रेष्ठ सामर्थ्य दाखविणारा ग्रंथ म्हणजे ज्ञानदेवी. ' माझा मऱ्हाठाचि बोल कवतुकें । परी अमृतातेंहि पैजा जिंके ' अशा आत्मविश्वासाच्या प्रतिज्ञेनेंच तो निर्माण झाला. ' जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनाचि धांवें बाहिरें । बोलु भुजांहि आशे भरें । आलिंगावया ' असें भाषेचें सामर्थ्य ज्ञानदेवांनीं हें देशीकार लेणें निर्माण केलें. त्यामुळें महाराष्ट्रांत ब्रह्मविद्येचा तर सुकाळ झालाच पण मराठी भाषेपुढें आकाश ठेंगणें झालें ! जन्माला येतांच सूर्यबिंबाचा ग्रास घेण्यासाठीं उड्डाण करणारें भीम-सामर्थ्य मराठी भाषेनें दाखविलें. आज आठशें वर्षें ज्ञानदेवींतून मराठी भाषेला नवनवोन्मेष प्राप्त होत आहेत आणि पुढेंहि अनंत काल ते प्राप्त होतील.

ज्ञानदेवांनीं ' छपन्न भाषांचे ' रस आणि सौंदर्य एकत्र ओतून मराठी घडविली. आणि यांतच मराठी भाषेची थोरवी आहे याची जाणीव मराठी ग्रंथकारांना सतत होती. पंधराव्या शतकांतला एक ग्रंथकार सांगतो : ' मागां व्यासादिक महामुनी । कथा बोलिले संस्कृत वाणी । तें आतां महाराष्ट्र भाषा करौनी । वानीं जयातें ।। मागधी आणि शौरसेनी । पिशाच अपभ्रंश जाणी । संस्कृत प्राकृत या षट्वाणी । आणिकै छपन्न भाषा ।। या भाषांचे पाकविस्तार । करावेया ' मराठी ' एक चतुर । तियेचेनि प्रसादें जाणिजेत विचार । षट्भाषांचे ।। ' ज्ञानदेवांच्याच मताचा ठसा यानें उमटविला आहे.

## नामदेवांची मुलुखगिरी

ज्ञानदेवांपेक्षां नामदेव वयानें वडील आणि दीर्घायुषी. नामदेवांचे अभंग म्हणजे नामाचा महिमा. वाल्मिकीनें शतकोटी रचना केल्याचें ऐकून नामदेवानें शतकोटी अभंगांची प्रतिज्ञा केली. ही प्रतिज्ञा पुरी करण्यासाठीं विठोबाप्रमाणें रखमाईहि कामाला लागली. आणि त्यांतूनहि जी संख्या अपुरी राहिली ती ' उरले ते शेवटीं लावी तुका ' असें आहे. नामदेवाचे शब्द सोपे, अर्थ खोल, कोमल भाव आणि प्रखर विचार यांनीं नामदेवाचा गाथा अभंग ठरला. ' ज्ञानदेवाची आदि ' आणि तीर्थावळी लिहून त्यानें मराठी भाषेला ज्ञानदेव चरित्राचें लेणें चढविलें. ज्ञानदेवांच्या मुक्ताईची अभंगरचना विद्युल्लतेसारखी, तर नाम-

देवांच्या जनाईची भावमधुर, कोमल आणि नितान्त सुंदर. भावनांनीं ओथंबणाऱ्या तिच्या काव्यपंक्ति उच्चारतांच नेत्रांत अश्रु ओथंबतात. सांवता माळी, गोरा कुंभार, चोखा मेळा, अशा सर्वंच संत मंडळानें त्या वेळीं समाजाचा उद्धार करण्यासाठीं कंबर कसली होती. 'काय भुललासी वरलिया रंगा?' असे ते विचारीत होते आणि त्यांनीं मराठी भाषेंत अमर वाङ्मय निर्माण केलें.

ही नवविचारांची लाट अडीचशें वर्षें होती. ती ओसरतांच एकनाथांनीं त्याच विचारांची दुसरी लाट आणली. एकनाथांनीं 'भागवता'सारखा ग्रंथ निर्माण करून मराठी भाषेचे तत्त्वविचार प्रकट करण्याचें सामर्थ्य पुन्हा एकदां प्रत्ययाला आणलें. त्यांनीं आपल्या भारुडांतून त्या वेळचें लोकजीवन वाङ्मयांत अमर केलें. त्यानंतर त्यांचा नातू मुक्तेश्वर महाकवि झाला. या काळांत कितीतरी ग्रंथकार झाले. पण त्यांच्यावर ज्ञानदेव-एकनाथांचीच छाप दिसून येते.

### संत वाङ्मय आणि मराठी गद्य

त्यानंतर दोन वाङ्मय-प्रभूंचीं नांवें मराठी भाषा आणि महाराष्ट्र उजळणारीं अशीं झालीं. एक समर्थ रामदास आणि दुसरे तुकाराम. 'मराठा तितुका मेळवावा' असें सांगून 'महाराष्ट्र-धर्माचा' उपदेश करणारे समर्थ. त्यांनीं 'दासबोध' सांगितला. त्याची फलश्रुतिच एवढी जबरदस्त आहे कीं, 'श्रवण केलियाचें फळ। क्रिया पालटे तत्काळ' असा अनुभव त्या वेळीं येऊन गेला. आणि तुकोबाराय म्हणजे तर 'तुका झालासे कळस.' हा कळस जसा वारकरी भागवत पंथाचा आहे तसाच मराठी वाङ्मयावरचाहि आहे. तुकोबा जसे मऊ मेणाहूनी आणि वज्रास भेदण्याइतके कठीण आहेत तसेंच त्यांचें वाङ्मय. भावनांनीं तें कमालीचें मृदु आणि विचारांनीं वज्राहून प्रखर. रामदासांची शिष्या वेणाबाई आणि तुकारामांची बहिणाबाई आपल्या गुरूंच्या परंपरेला शोभण्यासारखीच वाङ्मयनिर्मिति त्यांनीं केली. रामदासी पंथानें वाङ्मयरचनेचा कारखानाच उघडला. आणि वारकरीपंथाची वाङ्मयपरंपरा निळोबा-महिपतींनीं चालविली आणि आजहि दासगणूंनीं ती तेवढीच तेजस्वी ठेविली आहे.

संतकवींचें वाङ्मय म्हणजे मराठी भाषा. इतकें संतवाङ्मयाचें अलोट महत्त्व आहे. संतवाङ्मय निर्माण होत होतें तसेंच पंडितांचेंहि वाङ्मय वाढत होतें. वामन पंडितांच्या 'यथार्थदीपिके'पासून मोरोपंतांच्या ' महाभारता'-पर्यंत ही पंडितपंतांच्या काव्याची परंपरा अखंडित आहे. शिवशाहींत शाहिरी आणि लावणी वाङ्मयाची वाढ होऊं लागली ती उत्तरपेशवाईत कळसाला पोंचली. शिवशाहींत मराठी गद्याचीहि निर्मिति होत होती. शिवशाहीपासून पेशवाईच्या अखेरपर्यंत बखर वाङ्मयानें हें कार्य केलें. आणि पेशवाईच्या वकिलांच्या पत्रव्यवहारांतहि मराठी गद्य वाढलें. पुढें इंग्रजी अमदानींत मराठी गद्याचा परमोत्कर्ष झाला. या काळांत केशवसुत-बालकवींसारखे कवि झाले. पण काव्यापेक्षां गद्याची भरारी मोठी ठरली. चिपळूणकर, हरिभाऊ आपटे, टिळक, आगरकर अशा थोर पुरुषांनीं गद्याचें वैभव वाढविलें.

## मराठी समाजाचीं वैशिष्ट्यें

महाराष्ट्राचा समाजहि वैशिष्ट्यपूर्ण आहे. सबंध भारतांतच अनेक वंशांचे मिश्रण झालेलें आढळतें. महाराष्ट्र याला अपवाद नाहीं. पण पंजाब-काश्मीरमध्यें अस्सल आर्यवंश आढळतो आणि तामिळनाडमध्यें शुद्ध द्राविड दिसतात. पंजाब–काश्मीरमध्यें आर्यत्वाचा अभिमान आहे तर तामिळनाडमध्यें द्राविडी चळवळींचें पर्यवसान भारतांतून तो प्रदेश तोडून काढण्यापर्यंत होईल कीं काय अशी भीति वाटण्याइतका तेथें द्राविड अभिमान उचंबळला आहे. महाराष्ट्रांत आर्य आणि द्रवीड यांचा इतका मिलाफ झालेला आहे कीं, एकापासून दुसऱ्याला वेगळें काढायचें म्हटलें तरी तें अशक्य आहे. आर्य-संस्कृतीचे ब्राह्मण हे मोठे अभिमानी. पण महाराष्ट्रीय ब्राह्मणांतच गौड आणि द्रावीड असे भेद आहेत ! म्हणजे ब्राह्मणसुद्धां इथें द्रावीड झाले ! प्राचीन काळीं उत्तरेंतून आर्य आणि दक्षिणेंतून द्रवीड यांनीं महाराष्ट्रांत प्रवेश केला असें विद्वानांचें म्हणणें आहे. कांहीं जातीजमाती पूर्व आणि पश्चिमेकडूनहि आल्या असतील. आर्य-द्रविडांच्या रेट्यानें येथील मूळचे लोक दऱ्याखोऱ्यांत गेले असले

पाहिजेत. त्यांना आदिवासी हा शब्द नव्यानें लावला गेला असला तरी तो अन्वर्थकच ठरतो.

महाराष्ट्रांत असुरहि असले पाहिजेत. पांडवांना मयसभा बांधून देणाऱ्या मयासुराचें स्मरण केलें तर असुरांबद्दलचा दुष्टभाव ओसरेल आणि त्यांच्या संस्कृतीबद्दल मोठ्या मनानें कल्पना करतां येईल. करवीरमाहात्म्यासारख्या स्थानिक पुराणांतील परंपरा पाहिल्या तर महाराष्ट्रांतील असुरांच्या अस्तित्वाबद्दल शंका घेण्याचें कारण उरत नाहीं. तीच गोष्ट नागांची. नागांशीं सर्प शब्दाचा घोंटाळा केला नाहीं तर नागपूरपासून नागोठण्या-पर्यंत पसरलेल्या नागांच्या प्राचीन वसाहतीची कल्पना येऊं शकेल. जनमेजयाच्या सत्रानंतर ते इकडे आले असतील, किंवा त्यापूर्वींपासूनहि येथें असतील. नागवंशाचा संबंध महारांशीं जोडतात आणि तो अगदींच निराधार नाहीं.

### महार आणि महाराष्ट्र

महार ही महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण अशी जमात आहे. इतकी वैशिष्ट्य-पूर्ण आहे कीं, जेथपर्यंत महार गेला तेथपर्यंत महाराष्ट्र आहे असें म्हणतात. ' गांव तेथें महारवाडा ' या म्हणीचा खरा अर्थ महारवाडा नसेल तें खरें म्हणजे गांवच नव्हे असाच असला पाहिजे. इतकी रगेल, चिवट आणि चाणाक्ष अशी दुसरी जातच महाराष्ट्रांत नाहीं. सामाजिक अन्यायाचा राक्षसी अनुभव आणि भौतिक अधःपाताची परमावधि या जमातीइतकी दीर्घकाळ कोणींहि सोसली नसेल. पण तिच्या बौद्धिक आणि मानसिक सामर्थ्याचा प्रत्यय विद्युल्लतेप्रमाणें इतिहासांत आलेला आहे. दामाजीसाठीं ज्या विठ्या महारानें बेदरच्या सुलतानाला आपल्या गांठीची पुंजी दिली तो तर पंढरीच्याच विठोबाचा अवतार आम्ही समजतों. आणि त्याचें वर्णन करतांना ' बोली महाराची थेट मराठी ' अशाच शब्दांनीं कीर्तनकारांनीं आपली वाणी प्रकट केली. आणि ' चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा ' असें बजावणाऱ्या चोखा मेळयाला कोण विसरेल ? आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भीमपराक्रम तर विश्वविख्यात आहे. त्यांनीं बौद्धधर्माचें भारतांत पुनरुज्जीवन केलें.

महाराष्ट्रांत अनेक जातीजमाती आहेत; आणि सामाजिक कर्तृत्वांत प्रत्येक जातीजमातीनें आपला कस दाखविला आहे. कोणत्याहि जातीला बुद्धीच्या, शौर्याच्या, कर्तृत्वाच्या बाबतींत न्यूनगंड असण्याचें कारण नाहीं. असा प्रत्येकीचा इतिहास आहे. विशेषतः वारकरी भागवत संप्रदायानें आत्मविश्वास निर्माण करण्याचें हें अलौकिक कार्य केलेलें आहे. संस्कृति म्हणजे मनावर झालेले उच्च संस्कार; आणि हे उच्च संस्कार कोणत्याहि समाजांत, समाजाच्या कोणत्याहि थरांत तितकेंच सतेज आढळतील. कारण संतांची अभंगवाणी ज्याच्या मुखांतून निघाली नाहीं आणि संतांची अमृतमय ओंवी ज्यांच्या कानांत पडली नाहीं असा मराठी माणूसच नाहीं. जो असेल तो मराठी नाहीं असें खुशाल समजावें. म्हणून सामाजिक विषमता असूनहि महाराष्ट्रांत सांस्कृतिक विषमता नाहीं; आणि तीव्र अशी आर्थिक विषमता नाहीं हें महाराष्ट्राचें वैशिष्ट्य आहे.

## महात्मा फुले यांचें कार्य

महाराष्ट्रांत सामाजिक विषमतेस निर्भयपणें प्रहार करणारे महानुभाव महात्मे येथें सतत निर्माण होत आले. महानुभाव पंथाप्रमाणें वारकरी संप्रदायानें हें कार्य केलें. तसेंच शिवाजी महाराजांनींहि आपल्या पद्धतीनें केलें. राजकारणांत ज्यानें लक्ष घातलें त्यानें सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समानतेचा प्रचार केलाच; आणि महात्मा फुले यांचें क्रांतिकारक कार्य कोण विसरूं शकेल ? मुंबईत १८८५ सालीं भरलेल्या कॉंग्रेसच्या पहिल्याच अधिवेशनासमोर शेतकऱ्याचा पुतळा उभारून शेतकऱ्याकडे राष्ट्रीय सभेचें लक्ष खेंचणाऱ्या ज्योतिबांना उभ्या भारतांत तोड नाहीं. राजकारणाबरोबर समाजकारणाचा उद्घोष करणारे न्यायमूर्ति रानडे म्हणजे महाराष्ट्राचा सर्वंकष आणि समतोल विचारांचा आदर्शच होय.

नवा विचार ग्रहण करण्याची महाराष्ट्राची शक्ति इतिहासांत वारंवार प्रत्ययाला आलेली आहे. नवा विचार ग्रहण करायचा आणि त्याला अनुभवाच्या मुशींत घालून परिस्थितीला अनुरूप आणि परंपरेशीं सुसंगत असें रूप द्यावयाचें हें महाराष्ट्राचें वैशिष्ट्यच आहे. त्यामुळें कोणत्याहि नव्या चळवळीच्या अग्रभागीं मराठी माणूस नेहमींच चमकत आला आहे.

आणि आज असें सांगितलें जातें कीं, महाराष्ट्राची भूमि समाजवादाच्या प्रयोगाला अतिशय योग्य आहे. आणि हें खरें असेल तर त्याचें श्रेय मराठी समाज घडविणाऱ्या महाराष्ट्राच्या इतिहासाला आणि तो इतिहास घडविणाऱ्या मराठी महापुरुषांनाच दिलें पाहिजे. कारण त्यांनीं उच्च विचारांनीं महाराष्ट्राचा मनःपिंड बनविला आहे. वैयक्तिक सुखदुःखांपेक्षां समाजाची चिंता वहाण्याची त्यांनीं शिकवण दिली आणि स्वार्थाकडून मराठी मन परमार्थाकडे वळविलें. त्यांच्या संतत परिश्रमानेंच मराठी समाजांत सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विषमता किमान स्वरूपांत राहिली. त्यामुळेंच नव्या युगाकडे महाराष्ट्र नेहमींच छाती वर करून सामोरा गेला आहे; जाणार आहे. महाराष्ट्रांतील स्त्री वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठी संस्कृतींत स्त्रीचें स्थान माता या वैशिष्ट्याचें आहे. महाराष्ट्रांत मल्याळमधील मातृसत्ताक कुटुंबपद्धति नाहीं. पण समाजशास्त्रज्ञ सांगतात कीं, त्या कुटुंबपद्धतीच्या कांहीं खुणा येथें शिल्लक आहेत. मराठी संतांनीं देवाला माता म्हणून आळवलें आहे. 'तूं माझी माउली मी तुझा तान्हा' असेंच ते म्हणत असतात. येथें विठ्ठलाची विठाई माउली झाली; गुरूची गुरुमाउली झाली आणि आत्मानात्म विचारांतहि 'ते भेटे माउली आत्मा' असेंच ज्ञानेश्वर माउली म्हणाली! विनोबा सांगतात, मराठीशिवाय कोणत्याहि भारतीय भाषेंत आत्म्याला माउली म्हटल्याचें त्यांना आढळलें नाहीं. स्त्री-गीतांतून मातेचें प्रेम ओथंबलेलें आहे. सानेगुरुजी आणि विनोबा यांनीं मातृप्रेमाची महती गाइली, त्याला एवढी दीर्घ मराठी परंपरा आहे.

### महाराष्ट्रीय स्त्री

मराठी स्त्री वाघीण आहे. तिनें राजकीय उलाढाली केल्या आणि क्रांति केली. ध्येयवादी राजकारणाची स्त्री ही प्रेरक शक्ति आहे. सातवाहनांचीं नांवेंच मुळीं गौतमीपुत्र, वासिष्ठीपुत्र अशीं आहेत. त्यांचे शिलालेख त्यांच्या मातांचे, भगिनींचे किंवा राण्यांचे आहेत. ऐहोळेचीं प्रसिद्ध मंदिरें विजयादित्याच्या राण्यांनीं बांधलीं. रामदेवराव यादवाची राणी कामाइसा हिनें महानुभाव पंथ स्वीकारला होता; आणि शिवछत्रपतींप्रमाणेंच जिजाईचें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.



वि: क्रमांक नों: दि:

स्थान आहे. जिजामातेनेंच शिवाजीला स्वराज्याची प्रेरणा दिली. छत्रपति राजारामाची पत्नी ताराबाई हिनें तर कोल्हापूरला स्वतंत्र राज्य निर्माण केलें. अहिल्याबाई होळकरणीला कोण विसरूं शकेल? होळकरांचें कुळ तिच्या दीप्तीनें उजळून गेलें आहे. नवऱ्याला पेशवा करण्यासाठीं जंग जंग पछाडणाऱ्या आनंदीबाईचें कौतुक करणें शक्य नसलें तरी उलाढालीचें तिचें कर्तृत्व कसें नाकारतां येईल? १८५७ सालीं ब्रिटिशांविरुद्ध लढलेली स्त्री झांशीची राणी लक्ष्मीबाईच; आणि मराठी स्त्रियांची ही झुंजार परंपरा परवां पोर्तुगिजांविरुद्ध तुटून पडलेल्या सुधाताईनें आणि इतर मराठी महिलांनींहि उज्ज्वल केलेली नाहीं काय?

मराठी स्त्रीचें वाङ्मयकर्तृत्वहि असेंच मोठें आहे. ओंव्या, स्त्रीगीतें आणि लोकगीतें हें बहुंशीं अपौरुषेय वाङ्मयच आहे. संतवाङ्मयांतहि तेजस्वी मुक्ताबाई, भावार्त जनाई आहे. वेणाबाई आहे आणि बहिणाबाईहि आहे. आधुनिक साहित्यांत काव्यकथेप्रमाणें शास्त्रीय वाङ्मय निर्माण करणाऱ्याहि मराठी स्त्रिया आहेत आणि त्यांचें स्थान पुरुषांच्या बरोबरीचें आहे.

## महाराष्ट्राचें नाममाहात्म्य

आणि सर्वांत महाराष्ट्राचें नाममाहात्म्य मोठें आहे. तो महाराष्ट्र आहे. महाराष्ट्राच्या 'महा'चा मत्सर अलीकडे झालेला दिसतो. महाराष्ट्रांत 'महा' आहे म्हणून आपल्या प्रदेशाच्या नांवामागेंहि त्यांनीं 'महा' चिकटवून पाहिलें. पण तें अखेर गळून पडलें आहे. भारत हें एक राष्ट्र तर मराठी प्रदेश महाराष्ट्र कसा असें विचारतात! पण मग सौराष्ट्र तरी सु-राष्ट्र कां असें त्यांना कोणी विचारीत नाहीं? आमच्या पूर्वजांनीं आमचें नांव मोठें ठेवलें आणि इतरांच्या पूर्वजांना तसें सुचलें नाहीं हा कांहीं आमचा दोष नव्हे. महाराष्ट्र ढोंगी युक्तिवाद ऐकणारा नाहीं. नांवासाठीं तो प्राण देईल. महाराष्ट्र म्हणजे महाराष्ट्र!

अर्थात् महाराष्ट्र प्रथमपासून महाराष्ट्र नव्हता. उत्तरेला आर्यावर्त होतें तेव्हां दक्षिणेकडे जाण्याचा तो 'दक्षिणपथ' होता. दक्षिणापथापूर्वी हें 'दंडकारण्य' होतें आणि बुंदेलखंडापासून कृष्णानदीपर्यंत तें पसरलें होतें. दंडकारण्याचा दक्षिणापथ झाला आणि त्यांत कुंतल, अश्मक, मूलक,

अपरान्त यांचा समावेश होऊं लागला. मग याचा महाराष्ट्र कसा झाला ? महाराष्ट्र शब्दानें विद्वानांना खूप सतावलें आहे. महान् राष्ट्र तें महाराष्ट्र अशी सोपी व्युत्पत्ति एकानें दिली, तर 'मल्लराष्ट्रा' पासून महाराष्ट्र झालें असें दुसऱ्यानें सांगितलें. जेथपर्यंत महार आहे तेथपर्यंत महाराष्ट्र ही महाराष्ट्राची मर्यादा इतिहाससिद्ध आहे. म्हणूनच 'महारांचें राष्ट्र तें महाराष्ट्र' अशा व्युत्पत्तीचीहि स्फूर्ति एका विद्वानाला झाली. 'मरता तब हटता' मरतो तेव्हांच हटतो, ही व्युत्पत्ति तर सरळच आत्मगौरवांत जन्म पावली आहे.

## महाराष्ट्राचें पहिलें एकीकरण

महाराष्ट्राचा राष्ट्रिक, महाराष्ट्रिक या शब्दांशीं असलेला संबंध स्पष्टच आहे. रास्टिक याचें रूप राष्ट्रिक. हे राष्ट्रिक पुढें स्वतःला महारठ्ठी म्हणवूं लागले. त्यावरून महाराष्ट्रांत मराठे आणि आंध्रांत रेड्डी हीं नांवें आलीं. महाराष्ट्री प्राकृत ही महाराष्ट्रियांची मूळ भाषा. जेथें महाराष्ट्री बोलली जाते तो महाराष्ट्र. महाराष्ट्राच्या आद्य विकासाचा काळ इ. स. पूर्वी एक हजार वर्षें हा आहे. वररुचि हा आजचा ज्ञात असा आद्य प्राकृत व्याकरणकार. त्यानें पैशाची, मागधी, शौरसेनी या स्थानिक प्राकृतांचीं वैशिष्ट्यें सांगून शेवटीं 'शेषम् महाराष्ट्रीवत्' असें म्हटलें. महाराष्ट्रीला इतकें महत्त्व होतें. पण महाराष्ट्री भाषेवरून देशाला महाराष्ट्र हें नांव पडलें, कीं महाराष्ट्रांत बोलली जात होती म्हणून तिला महाराष्ट्री हें नांव पडलें हें कोडें अजून सुटलेलें नाहीं. पण दक्षिणापथांतील वेगवेगळ्या देशांना जसें सातवाहन राजसत्तेनें एकत्र आणलें तसेंच भाषेनेंहि त्याला एक केलें असलें पाहिजे.

मराठी भाषेच्या आधारावर महाराष्ट्राचें पहिलें एकीकरण महानुभावांनीं केलें. महानुभाव पंथाचा प्रवर्तक चक्रधर हा गुजरातेंतून महाराष्ट्रांत आला आणि येथें पंथसंस्थापक महंत बनला. पण त्याचा महाराष्ट्राचा अभिमान केवढा दांडगा आहे ! महानुभावांनीं सांगितलें कीं, 'महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र । म्हणोन महाराष्ट्र । महंत म्हणजे थोर ।'

आणि या महाराष्ट्राचीं वर्णनें वेळोवेळीं केलीं गेलेलीं आहेत. 'साक्षी लक्ष देश महाराष्ट्र । तेथींचे राये शहाणे सुभट्ट । वेदशास्त्र चातुर्याची पेठू । भरैली तिथे देशीं ।। पाश्चिमे त्र्यंबकू पूर्वे सागर वेन्हीं । द्वादश

योजनें उभय गंगातीरीं । ऐसें तें गंगातीर महाराष्ट्रीं । वसिजे पुण्यातन ॥' असें हें महाराष्ट्राचें प्राचीन वर्णन आहे.

## महाराष्ट्राची दिल्लीवर झेंप

असा हा महाराष्ट्र आहे; असा त्याचा इतिहास आणि परंपरा आहे. त्याला अभिमान आहे; पण स्वतःचा अहंकार नाहीं. त्याच्याकडे विद्वत्ता आहे, शौर्य आहे आणि शहाणपणाहि आहे. आणि मुख्य म्हणजे त्याला आपल्या भारतीयतेचा पीळ आहे. त्यानें उत्तर-दक्षिण भारताला जोडलें आहे. त्याच्या ठिकाणीं भारतीय वैशिष्ट्यांचा संगम झालेला आहे. त्यामुळें त्याच्या ठिकाणीं भारतीय समतोल आहे. उत्तरेचा अतिरेक आणि दक्षिणेचा अविवेक नाहीं. महाराष्ट्र दिल्लीला कधीं विसरलेला नाहीं. महाराष्ट्र भारताच्या केंद्रस्थानीं असला तरी धर्मराजाच्या इंद्रप्रस्थाला त्यानें महाराष्ट्रांत खेंचण्याचा कधीं प्रयत्न केला नाहीं. तोच दिल्लीकडे गेला. जें पूर्वी सातवाहनांनीं केलें तेंच शिवछत्रपतींनीं आग्र्यावर गरुडझेंप टाकून दाखविलें. दिल्लीची राजधानी देवगिरीला आणणाऱ्या तुघलकाला इतिहासानें वेडा ठरविलें. कारण त्यानें महाराष्ट्राचें मध्यवर्ती स्थान पाहिलें. पण भारताचा इतिहास पाहिला नाहीं.

भौगोलिकदृष्ट्या भारताच्या केन्द्रस्थानीं असलेल्या महाराष्ट्रानें भारताचा इतिहास आत्मसात् केला आहे आणि घडविलाहि आहे. म्हणूनच महाराष्ट्राच्या कोणत्याहि लहानमोठ्या राजधानीचा मोहरा उत्तरेला दिल्लीकडे वळलेला असतो; आणि त्याला आम्ही अभिमानानें दिल्ली-दरवाजा म्हणतों. 'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' असें म्हणत असतांनाहि त्याची नजर दिल्लीवर असते, त्याची झेंप दिल्लीवर असते. दिल्लीचें रक्षण करणें, दिल्लीचें वैभव वाढविणें, दिल्लीसाठीं प्राणार्पण करणें हें महाराष्ट्राचें ब्रीदच आहे. कारण दिल्लीचें महत्त्व तो ओळखतो. तो भारताचें माहात्म्य जाणतो; आणि आपण भारताचे आहोंत आणि भारतासाठीं आहोंत हें तो कधीं विसरत नाहीं. म्हणून सर्वस्व हातांत घेऊन महाराष्ट्र नेहमींच भारतासाठीं उभा असतो. त्याच्या मुखांत एकच घोष असतो—जय हिंद ! वन्दे मातरम् ! !

* * *

# संयुक्त महाराष्ट्राचें विराट् पर्व : : २

जयजयकार ! संयुक्त महाराष्ट्राचा अरुणोदय झाला आहे. म्हणून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रांत त्याचा एकच जयजयकार चालू आहे. हा जयजयकार गेलीं चार वर्षें अव्याहत चालू आहे. पण त्या वेळीं ' झालाच पाहिजे ' असा सह्याद्रीसारखा अढळ निर्णय त्या जयजयकारांत होता. त्वेष होता; आवेश होता. आज संयुक्त महाराष्ट्राचा जयजयकार चालू आहे. त्यांत आनंद आहे, उत्साह आहे. कारण आतां तो 'झालाच आहे.' तांबडें फुटल्यानंतर सूर्य उगवणार याबद्दल शंका उरत नाहीं; तशीच संयुक्त महाराष्ट्राबद्दल आतां शंका नाहीं. संयुक्त महाराष्ट्राचा अरुणोदय झाला आहे. म्हणून त्याचा जयजयकार करून त्याच्या स्वागताला आपण सिद्ध होत आहोंत.

## ध्येयसिद्धीचा आनंद

आतां ध्येयसिद्धीचा अवर्णनीय आनंद मिळणार आहे. मराठी जनतेची दीर्घकालीन आकांक्षा पुरी होणार आहे. या आनंदाला बेळगांव-कारवारच्या सीमा प्रदेशाच्या दुराव्याचेंच तेवढें गालबोट उरलें आहे. पण तो दुरावाहि नाहींसा होईल. कारण गालबोट कायमचें उरत नाहीं. तें केवळ आनंदाला, उत्साहाला दृष्ट लागूं नये म्हणून असतें. बेळगांव-कारवारबाबत अशी भावना आपण बाळगीत आहोंत. कारण बेळगांव-कारवारची जिम्मेदारी संयुक्त महाराष्ट्रानें घेतली आहे. आतां गेल्या चार-पांच वर्षांतील तो अपमान धुऊन निघाला; उपमर्द पुसून गेला. घोर अन्याय नाहींसा झाला; आणि त्याबरोबरच त्वेष, आवेश आणि आक्रोशहि संपला. द्वेषाचें तर त्या वेळींहि कारण नव्हतें. पण गंगेचा लोंढा आला म्हणजे त्यांत गढूळ प्रवाहहि येणार; त्याचप्रमाणें द्वेषाचे गढूळ प्रवाह आले तेहि आतां सागराला मिळाले आणि गडप झाले असें आपण समजूं. आतां नव्या महाराष्ट्राचा नवा इतिहास घडवावयाचा आहे. म्हणून संयुक्त महाराष्ट्राचा जयजयकार !

संयुक्त महाराष्ट्राचा जयजयकार गेलीं चार वर्षें चालू आहे. या जयजयकाराचे सादपडसाद मनामध्यें घोळवीतच नव्या महाराष्ट्राच्या

उभारणीला लागलें पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राचा अर्थ लक्षांत घेतला पाहिजे. गेल्या चार वर्षांत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचें महाभारत घडलें असें कांहीं लोक म्हणतात. महाभारत म्हणजे सत्पक्षाचा विजय असें असेल तर महाभारत घडलें. कोणी म्हणतात, हें एक समुद्रमंथन होतें. संयुक्त महाराष्ट्राचा अमृतकलश मिळविण्यासाठीं हें समुद्रमंथन झालें. सुरासुर म्हटले तरी ते बांधवच होते. आणि या समुद्रमंथनांतूनहि चौदा रत्नें निघालीं, आणि तसेंच हलाहलहि निघालें ! जनशक्तीचा धन्वंतरी अमृतकुंभ घेऊन उभा ठाकला. लोकशाहीला अखेर न्यायाचा कौस्तुभ मिळाला; मुंबईची लक्ष्मी स्थिर झाली; प्रतिष्ठेच्या पारिजातकाचा सुगंध पसरला. अनेक पुढाऱ्यांना अर्धचन्द्र मिळाला; तशीच नव्या नेतृत्वाची गजगति दिसूं लागली; सौख्याची कामधेनु आतां पुढें उभी आहे. अभद्र शब्दांची सुरा निघाली आणि विद्वेषाचें हलाहल निघालें. सुरेचा त्याग करून हलाहल पचविणारा महादेव अमूर्त आहे. पण तो शिवशक्तींतूनच मूर्त झाला पाहिजे. जनतारूपी शिवशक्तीनेंच हें विद्वेषाचें हलाहल पचवून दाखविलें पाहिजे; तरच संयुक्त महाराष्ट्राच्या अमृताचें सार्थक होईल. असें हें समुद्रमंथन आहे. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राच्या जयजयकाराचे साद पडसाद उमटले पाहिजेत.

## चळवळ ही क्रान्तिच

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही एक क्रान्ति होती. भावनेच्या लाटांवर ती आरूढ झाली होती. पण तिला विचारांची कोणती बैठक होती ? जनसागराच्या अन्तःकरणाला भूकंपाचे धक्के बसले आणि भावनांच्या वादळाचें थैमान झालें. पण सागराची मर्यादा सुटत नाहीं. म्हणूनच भरतीच्या मर्यादारेषाहि पाहिल्या पाहिजेत. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही क्रान्ति होती तर तिचें लक्षण काय ? क्रान्तीमध्यें जुनें मोडतें व नवें उभारलें जातें. या क्रान्तींत पूर्वींचें दौर्बल्य गेलें, असूया नष्ट झाली, न्यूनगंड नाहींसा झाला आणि आत्मविश्वास आला, सामर्थ्याची जाणीव झाली. आतां उदारता हवी आहे आणि अहंगंडाचा स्पर्श होतां कामा नये. पूर्वीं जें नव्हतें असें वाटत होतें त्याचा साक्षात्कार झाला. त्या साक्षात्कारांतूनच

क्रान्ति सिद्ध झाली. महाराष्ट्राला नेतृत्व नाहीं, त्याला अखिल भारतीय राजकारणांत कोणी विचारीत नाहीं, असें पूर्वीं वाटत होतें; तसा अनुभवच आला होता. पण आतां मराठी नेतृत्व उफाळून आलें आहे, त्याला मान्यता मिळाली आहे. त्या नेतृत्वांत ओज आहे, निष्ठा आहे, धीर आहे, गांभीर्य आहे, संयम आहे, मुत्सद्दीपणा आणि मार्दवहि आहे. या क्रान्तीचें स्वरूप पाहिलें पाहिजे.

ही क्रान्ति आहे; पण तिचें स्वरूप केवळ राजकीय आहे. या क्रान्तींत विचार असेल, जागृति असेल, तर ती केवळ राजकारणापुरतीच राहिली आहे. महाराष्ट्रीय जीवनाच्या इतर क्षेत्रांत ही क्रांति उमटलेली नाहीं. ही क्रान्ति खरी असेल तर राजकीय क्षेत्राप्रमाणें इतर क्षेत्रांतहि ती व्यक्त झाली पाहिजे. पण त्यासाठीं या क्रान्तीचें स्वरूप आणि त्यामागचा विचार लक्षांत घेतला पाहिजे; तिच्याबद्दल गैरसमज असतां कामा नये. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही राष्ट्रीय आहे काय? म्हणजे ही भारतीय राष्ट्रवादाशीं सुसंगत आहे कीं त्याला मारक आहे? ही चळवळ लोकशाहीशीं सुसंगत होती काय? लोकशाहीचा दुहेरी अर्थ घेतला पाहिजे. ज्या घटनेच्या चौकटींत आपण लोकशाहीला व्यावहारिक स्वरूप आणलें आहे ती लोकशाही आणि सर्वांचा अविरोध, सर्वांचें सौहार्द घेऊन आपला हेतु साध्य करणें ही लोकशाही. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ भारतीय राष्ट्रवाद म्हणजेच भारतनिष्ठा आणि लोकशाहीनिष्ठा या दोन कसोट्यांवर उतरली पाहिजे. तरच तिचें स्वरूप ग्राह्य होऊं शकतें. आणि या दोन कसोट्यांवर जेथें ती उतरत नसेल तेथें भावनांचा केवढाहि कल्लोळ दिसला तरी तो आत्मघाताकडे नेणारा आहे, त्याज्य आहे, असेंच समजलें पाहिजे.

## चळवळीचा चमत्कार

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ हा एक चमत्कारच आहे. वस्तुतः हा एक साधा आणि सोपा असा प्रश्न होता. साध्या प्रश्नाला जटिल समस्येचें स्वरूप आलें. सोपा प्रश्न कठीण करण्याची ही किमया आपल्या राष्ट्रीय नेत्यांच्या अदूरदर्शित्वांतून आणि पूर्वग्रहांतून निर्माण झाली. ज्यांनीं प्रथम समजुतदारपणा दाखवावयाचा त्यांच्याकडेच हेकटपणा दिसून आला. ज्या

मराठी नेत्यांनीं हा प्रश्न प्रथम धसाला लावला त्यांना आपण काय करतों आहोंत हेंच समजलें नाहीं. त्यांना आपल्या दुर्बलतेची आणि राष्ट्रीय नेत्यांच्या सामर्थ्याचीहि कल्पना आली नाहीं. आपले मार्ग त्यांना निश्चित करतां आले नाहींत. त्यामुळें वैचारिक ठामपणाहि ठेवतां आला नाहीं. या नेत्यांवर पुढें कित्येकांनीं अप्रामाणिकपणाचा आरोप केला. पण ते अप्रामाणिक नव्हते. ते फक्त कच्चे ठरले. त्यांनीं जें कार्य उचललें होतें तें पेलण्याचें बौद्धिक आणि नैतिक सामर्थ्य त्यांना दाखवितां आलें नाहीं. म्हणून भारतीय नेत्यांचा अदूरदर्शीपणा व हेकटपणा आणि मराठी नेत्यांचा कमकुवतपणा यांचा संगम झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाला भावनेच्या कल्लोळाचें विशाल आणि विकाळ स्वरूप आलें. त्यांतून ज्यांनीं मार्ग काढला त्यांनीं नवें नेतृत्व दिलें आणि क्रान्ति सिद्ध केली.

## भाषावार प्रांतांची पीठिका

भाषावार प्रांतांची रचना ही भारतीय राजकारणांत नवी नाहीं. भारतीय राष्ट्रवादाचा नवावतार झाला आणि तो ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं दोन हात करूं लागला तेव्हांपासूनच भाषावार प्रांतांचा विचार स्फुरत होता. भारतीय राष्ट्रवादाचें स्वरूप पाहिलें तर हा भाषिक राज्यांचा विचार त्या राष्ट्रवादाचेंच एक अंग होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. भारतांतील एकभाषिक लोक वेगवेगळ्या शासनांत विभागले गेले होते. त्यामुळें शासनाच्या दृष्टीनेंहि एकभाषिक लोकांत विषमता आणि दुरावाहि निर्माण झाला होता. राज्यकारभार हा लोकांच्या भाषेंत झाला पाहिजे तरच तो लोकशाहीला अनुकूल ठरेल आणि राज्यकारभार लोकभाषेंत व्हावयाचा असेल तर एकभाषा बोलणारे लोक एका शासनांत आले पाहिजेत. भाषिक राज्यांचा प्रश्न हा स्वातंत्र्यासारखा जीवनमरणाचा प्रश्न नव्हे; पण महत्त्वाचा प्रश्न होता. म्हणून स्वातंत्र्य लढ्याबरोबरच भाषावार प्रांतांची कल्पना विकसित होत गेली.

१९०५ सालीं बंगालची फाळणी रद्द करण्याची मागणी झाली. तेव्हां-पासून कॉंग्रेसनें या दृष्टीनें स्पष्ट विचार करण्यास सुरुवात केली. १९०८ सालीं बिहार कॉंग्रेस कमिटी निर्माण झाली. सिंध, ओरिसा, आंध्र यांच्या

काँग्रेस कमिट्या झाल्या. १९२० सालीं काँग्रेस संघटनेचीच मुळीं भाषावार पुनर्रचना झाली. सायमन कमिशनची नेमणूक झाली त्या वेळीं काँग्रेसनें आंध्र, उत्कल, सिंध, कर्नाटक हे प्रांत निर्माण करण्याची मागणी केली होती. ओरिसा आणि सिंध हे प्रांत तर ब्रिटिशांनींच निर्माण केले. दक्षिण भारतांत अशीं भाषावार राज्यें निर्माण करणें ब्रिटिशांना कठीणच होतें. कारण निजामाचें राज्य मोडणें त्यांना शक्य नव्हतें. आणि तें राज्य मोडल्याशिवाय दक्षिण भारतांत किंवा इतरत्रहि पुरी भाषावार प्रांतरचना करणेंच शक्य नव्हतें. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत थांबणें आवश्यक होतें.

## काँग्रेसनेते व भाषावार प्रांतरचना

स्वातंत्र्य दृष्टिपथांत येऊं लागतांच भाषावार प्रांतांची मागणी जोरानें होऊं लागली. पण त्याचबरोबर वरिष्ठ काँग्रेस नेत्यांचा भाषिक प्रांतांबद्दलचा उत्साह ओसरल्यासारखा दिसूं लागला. देशापुढें अनेक बिकट समस्या आहेत असें सांगून ते कालहरण करूं लागले. देशापुढें अनेक बिकट समस्या होत्याहि. पण त्यामुळें भाषावार प्रांत करण्यास विलंब लागण्याचें कांहीं कारण नव्हतें; कारण वरिष्ठ काँग्रेस नेते जरी कालहरण करीत होते तरी प्रांतिक काँग्रेसनेते या प्रश्नावर चळवळ करीतच होते, लोकमत संघटित करीत होते; आणि त्यामुळें असंतोषहि निर्माण होत होता. अशा परिस्थितींत वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनीं कालहरण करण्याचें धोरण कां पत्करलें ? याचीं दोन कारणें दिसतात. पं. नेहरू आणि सरदार पटेल हेच काँग्रेसचे खरे श्रेष्ठ नेते होते. आणि कालहरणाचीं त्यांचीं कारणें भिन्न असण्याची शक्यता आहे. पं. नेहरूंपुरतीं हीं कारणें काय असतील ? पं. नेहरूंना प्रांतिक पातळीवरच्या नेत्यांचें मन जाणतां येत नाहीं. नाहीं तर त्यांनीं या प्रांतिक नेत्यांच्या मताची तीव्रता जाणली असती. भाषिक प्रांतांचा प्रश्न उत्तर भारतांत मुळींच तीव्र नव्हता. त्यामुळेंहि दाक्षिणात्यांचें त्या प्रश्नावरील दुःख त्यांना आकलन झालें नसेल. तिसरी गोष्ट भाषिक प्रांतांची मागणी करणारे प्रांतिक नेते आपल्या प्रांतापुरताच विचार करून अतिरिक्त स्वरूपाच्या भाषिक मागण्या करीत होते; आणि यामुळें फुटीर वृत्ति बळावेल असा नेहरूंचा समज झाला असला तर तो योग्यच होता.

## मुंबईच्या कलहाचें बीज

भाषिक प्रांतांची मागणी करणाऱ्यांनीं अतिरिक्त मागण्या केल्यामुळें फुटीर वृत्ति वाढेल ही भीति खरी असली तरी हा प्रश्न लोंबकळत ठेवल्या-मुळें ती भीति नाहींशी होत नव्हती. पण हें वरिष्ठ कॉंग्रेस नेत्यांच्या लक्षांत आलें नाहीं. सरदार पटेल यांच्यासारख्या चाणाक्ष मुत्सद्द्याला ही गोष्ट जमली नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. पण त्यांनींहि भाषिक प्रांतांच्या बाबतींत कालहरण करण्याचेंच धोरण ठेवलें. त्यांचीं कारणें पं. नेहरूंच्या कारणांपेक्षां भिन्न असण्याची शक्यता आहे. कारण भाषिक प्रांत निर्मितीची तीव्रता सरदार पटेलांना खुद्द त्यांच्या गुजरातमध्येंच अनुभवाला येत होती. तामिळनाडमधील मद्रास शहरावर आंध्रनें त्यांनीं दावा सांगण्यासारखे जे विचित्र प्रकार होते ते कठोरपणें निकालांत काढण्याइतका ठामपणाहि सरदारांच्या ठिकाणीं होता. पण भाषिक प्रांतरचना करायची तर त्या निर्मितीचीं तत्त्वें ठरवून तीं सर्व ठिकाणीं निरपवाद लागू करावीं लागलीं असतीं; आणि असें करायचें म्हणजे मुंबईचा समावेश महाराष्ट्रांत करणें अपरिहार्य ठरलें असतें, आणि तेंच सरदार पटेल यांना टाळावयाचें होतें. म्हणून त्यांनीं भाषावार प्रांतरचनेलाच खो घालण्याचा प्रयत्न केला, आणि त्यांतून त्यांचें कालहरणाचें धोरण जन्माला आलें.

मुंबईचा प्रश्न हा केवळ संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या आड आला असें नव्हे तर एकूण भाषावार प्रांतरचनेच्याच तो मुळावर येत होता असा याचा अर्थ आहे. सरदार पटेल यांचा मुंबई महाराष्ट्रांत आणण्यास विरोध होता ही कांहीं गुपित गोष्ट नाहीं. सरदार पटेल यांचे राजकीय शिष्य श्री. शंकरराव देव यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा नेट धरल्यावर मुंबईचा हट्ट सोडा म्हणजे महाराष्ट्राची निर्मिति करतों असें सरदारजींनीं देवांना सांगितलें होतें असें म्हणतात. पण मुंबईवरचा महा-राष्ट्राचा हक्क सोडण्यास देवांनीं नकार दिला त्यामुळें कॉंग्रेस संघटनेंत देवांवर सरदारांची इतराजी झाली असाहि प्रवाद आहे. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें पहिलें अधिवेशन १९४६ सालीं मुंबईत भरलें. त्या वेळीं श्री. शंकरराव देव त्याचे अध्यक्ष होते आणि श्री. स. का. पाटील स्वागताध्यक्ष होते. मुंबई

महाराष्ट्रांत घालण्यास सरदारांचा विरोध असल्यामुळेंच त्यांचे पट्टशिष्य श्री. स. का. पाटील यांनीं संयुक्त महाराष्ट्राची मागणी त्यानंतर सोडून दिली असली पाहिजे. सरदार पटेल यांचा तरी मुंबई महाराष्ट्रांत जाण्याला एवढा विरोध कां होता? आपल्या विरोधाचीं वैयक्तिक कारणें त्यांनीं कधीं सांगितलेलीं नाहींत. पण तर्कच करायचा तर असें म्हणतां येईल कीं, मुंबईच्या बिगर महाराष्ट्रीय आणि विशेषतः गुजराथी व्यापारी-उदमी लोकांचें महत्त्व कमी होईल, मुंबईचे आर्थिक फायदे केवळ महाराष्ट्राला मिळतील आणि गुजराथला मिळणार नाहींत, असें त्यांना वाटत असावें. मराठी लोकांच्या शहाणपणाबद्दल आणि राज्यकर्तृत्वाबद्दल त्यांना शंका असावी. पण असलीं कारणें तोंडानें न बोलून दाखविण्याइतके ते मुत्सद्दी होते. त्यामुळें मुंबई महाराष्ट्रांत जाऊं न देण्याचें आपलें उद्दिष्ट वेगळ्या मार्गानें साधण्याचें धोरण त्यांनीं आंखलें.

## मुंबईबाबत कलहाचें बीजारोपण

एकूण भाषावार प्रांतरचनाच करायची टाळणें हा त्यांच्या धोरणाचा पहिला टप्पा होता. वस्तुतः भारताची घटना तयार करतांनाच या प्रांतांची निर्मिति करतां आली असती. पण त्यांनीं तें केलें नाहीं. पण भाषावार प्रांतांची मागणी केवळ महाराष्ट्राची नव्हती. त्या बाबतींत दाक्षिण भारतांतील इतर भाषिकांची, विशेषतः आंध्र लोकांची, भावना तीव्र होती. आंध्र प्रांत निर्माण करण्याचें आश्वासनहि काँग्रेस नेत्यांनीं दिलें होतें. पण एकदां आंध्र निर्माण केला तर बाकीचे प्रांत निर्माण करणें अटळ ठरेल आणि मुंबईचा प्रश्न धसाला लागेल म्हणून आंध्राबाबत वचनभंग करूनहि काँग्रेस नेत्यांनीं भाषावार प्रांतरचना पुढें ढकलण्याची कारवाई केली. ही कारवाई मुख्यतः सरदार पटेल यांची होती. तरीहि दक्षिण भारतीयांनीं हा प्रश्न धसाला लावलाच. तेव्हां शेवटीं १९४८ सालीं दार कमिशनची नेमणूक झाली. या दार कमिशननें नुकतेंच मिळालेलें स्वातंत्र्य सुस्थिर करण्याची आवश्यकता प्रतिपादन करून भाषावार प्रांतरचना पुढें ढकलावी असा निर्णय दिला. पण एवढेंच सांगून हें दार कमिशन थांबलें नाहीं. भाषावार प्रांत निर्माण होईल त्या वेळीं मुंबई शहराचा महाराष्ट्रांत समावेश करूं नये

असाहि निर्णय देऊन ठेवला! मुंबईतील कलहाचीं बीजें अधिकृत रीतीनें याच वेळीं रोंवलीं गेलीं. मराठी लोकांत पुणें संप्रदायाचें वर्चस्व आहे असें म्हणून दार कमिशननें महाराष्ट्राचा मुद्दाम अपमानहि केला.

## धनिकांचें धोरण

दार कमिशनच्या वेळीं दुसराहि एक बनाव झाला. तो म्हणजे श्री. पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांच्या नेतृत्वाखालीं निर्माण झालेली मुंबई नागरिक समिति हा होय. मुंबईतील व्यापार-उद्योगपतींचें महाराष्ट्राविरुद्ध या समितीच्या रूपानें संघटनच करण्यांत आलें. हे व्यापारी-उद्योगपति बिगर महाराष्ट्रीय आहेत. त्यांनीं असाच कांहीं बिगर महाराष्ट्रीय विद्वान् प्राध्यापकांनाहि या समितींत आणलें; आणि अशा तऱ्हेनें मुंबईतील भाषिक अल्पसंख्य जमाती आणि धनिक वर्ग यांची महाराष्ट्राविरुद्ध एकजूट झाली. श्री. स. का. पाटील यांच्या नेतृत्वाखालीं मुंबई कॉंग्रेसचेंहि मत हुबेहूब या नागरिक समितीच्या मतासारखेंच बठविण्यांत आलें. मुंबईच्या बहुरंगी संस्कृतीचें स्तोम माजविण्यांत आलें. मराठी लोक आडदांड आहेत; आणि त्यांच्या हवालीं जर मुंबई शहर केलें तर त्या शहराची ही बहुरंगी संस्कृति आणि तिचें वैभव टिकणार नाहीं असा प्रचार सुरू झाला. अनेक बुद्धिमान् लोक आणि प्रचाराचीं सर्व साधनें या धनिकांच्या हातांशीं असल्यामुळें महाराष्ट्राची अखिल भारतांत बदनामी करणें त्यांना कठीण गेलें नाहीं. दार कमिशनच्या धोरणांत आणखी एक टप्पा गांठला गेला. तो असा कीं, शक्य तोंपर्यंत कालहरण करायचें; पण भाषावार प्रांत केलेच तर मुंबई महाराष्ट्राला द्यायची नाहीं. पण दार कमिशनच्या भाषावार प्रांतरचना फेटाळण्याच्या निर्णयाविरुद्ध देशभर एवढें काहूर माजलें आणि असंतोष निर्माण झाला कीं, लोकमत शांत करण्यासाठीं जयपूर कॉंग्रेसमध्यें पं. नेहरू, सरदार पटेल आणि कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांची त्रिमूर्ति समिति या प्रश्नाचा फेरविचार करण्यासाठीं म्हणून नेमण्यांत आली. या त्रिमूर्ति समितीनेंहि भाषावार प्रांतरचना लोंबकळतच ठेवली. पण महाराष्ट्रावर दुहेरी अन्याय केला. मुंबई महाराष्ट्रांत न घालतां तिचें वेगळें राज्य करावें हें दार कमिशनचें मत तर मांडलेंच पण

विदर्भाचा समावेश महाराष्ट्रांत व्हावा कीं नाहीं हें विदर्भानें ठरवावें असें सांगितलें !

मुंबई वेगळी काढण्याची ही पूर्वतयारी लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कारण सरदार पटेल यांनीं आपलें हें मत प्रथमतः 'निःपक्षपाती' दार कमिशनकडून आणि नंतर खुद्द पं. नेहरूंच्याच तोंडून वदवून घेतलें. आणि जातां जातां विदर्भाला वेगळें राज्य करण्याची लालूच दाखवून महाराष्ट्रीय लोकांची एकजूटहि फोडून ठेवली. एकीकडे मुंबईतील धनिक वर्गाला आणि अल्पसंख्याकांना या मुद्द्यावर महाराष्ट्राविरुद्ध संघटित करण्यांत आलें. पण अल्पसंख्याकांचें नेतृत्व या धनिकांच्या नागरिक समितीला झेपलें नाहीं तर त्या कार्याची जोखीम श्री. स. का. पाटील यांच्या नेतृत्वा-खालीं मुंबई कॉंग्रेसनें उचलली. अशी ही पार्श्वभूमि लक्षांत घेतली तरच मुंबईच्या प्रश्नावर पुढें जें रणकंदन झालें त्याचा अर्थ लक्षांत येऊं शकेल.

## चुकीचें पाऊल : आंध्राची निर्मिति

पुढें सरदारांचें देहावसान झालें. आणि झटपट ठाम निर्णय घेणारा केंद्रीय नेता गेला. भाषावार प्रांतांचा प्रश्न लोंबकळतच होता. आंध्रांत या प्रश्नावर तीव्र भावना होत्या. पण आंध्र नेत्यांची एक चूक होती. ते मद्रासवर चुकीचा हक्क सांगत होते. हा हक्क त्यांनीं सोडण्याची तयारी अगोदर दाखविली असती किंवा मद्रासवर आंध्राचा हक्क नाहीं, मद्रास-खेरीज हें आंध्र राज्य स्वीकारा, असें पं. नेहरूंनीं नम्रपणें सांगितलें असतें तर श्री. पोट्टी श्रीरामुलु यांना उपोषण करून देहत्याग करावा लागला नसता. श्रीरामुलु यांनीं आंध्र राज्यासाठीं उपोषण करून देह ठेवला; आंध्रांत दंगली झाल्या आणि मद्रासशिवाय आंध्र राज्य स्वीकारण्यास आंध्र नेते आणि आंध्र राज्याची तावडतोब निर्मिति करण्यास पं. नेहरू तयार झाले. चार दिवसांत निर्णय जाहीर झाला. भाषावर प्रांतरचनेंत योग्य गोष्ट चुकीच्या पद्धतीनें करण्याचें पहिलें पाऊल पडलें. पण हें सारें अपरिहार्य होतें. आंध्राची निर्मिति झाल्यानंतर इतर राज्यांची निर्मिति करणेंहि तितकेंच अपरिहार्य होतें. म्हणून अखेर नाइलाजानें भारत सरकारनें फाझल अली कमिशनची नेमणूक केली. फाझल अली न्यायमूर्ति

आणि पं. कुंझरू आणि सरदार पणिक्कर हेहि मान्यवर असल्यामुळें या कमिशनबद्दल इतरांप्रमाणेंच महाराष्ट्रालाहि मोठा भरंवसा होता.

## महाराष्ट्राचा भ्रमनिरास

महाराष्ट्राला भरंवसा वाटला याचें महत्त्वाचें कारण असें कीं, पं. नेहरूंचा जरी मुंबईच्या प्रश्नावर पूर्वग्रह होता तरी त्यांच्या ऋजु स्वभावामुळें, लोकशाही वृत्तीमुळें त्यांचें मतपरिवर्तन घडविणें अशक्य मानण्याचें कारण नव्हतें. सरदार पटेल आणि पं. नेहरू यांच्यामध्यें केवळ इतकाच फरक नव्हता. कोणत्याहि प्रश्नाचा उच्च तात्त्विक दृष्टीनें विचार करण्याची ताकद पं. नेहरूंच्या ठिकाणींच आहे. त्यामुळें ते पूर्वग्रहांतूनहि मुक्त होऊं शकतात. दुसरी गोष्ट अशी कीं, व्यवहारतःच पं. नेहरू मुंबईच्या प्रश्नावर जी त्रयस्थाची, तटस्थाची भूमिका घेऊं शकतील तशी भूमिका घेणें सरदार पटेलांना खूपच कठीण होतें. भारताच्या राजकारणांत आतां सरदार नव्हते; केवळ नेहरूच होते. आणि श्रेष्ठ निःपक्षपाती व्यक्तींची उच्चाधिकार समिति नेमून त्यांनीं हा प्रश्न निकालांत काढण्याचें ठरविलें होतें. पं. नेहरू या श्रेष्ठ व्यक्तींवर दडपण आणतील हें शक्य नव्हतें. आणि अन्य कोणा व्यक्तींचें दडपण या समितीवर येईल हें पटण्यासारखें नव्हतें. पण पुढें नेमक्या याच बाबतींत महाराष्ट्राचा भ्रमनिरास झाला.

राज्यपुनर्रचना मंडळ पुनर्रचनेच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठीं देशभर फिरूं लागलें. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लागणार या दृष्टीनेंच या वेळीं संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते आणि विरोधक आपल्या उद्योगाला लागले होते. दार कमिशनच्या वेळची नागरिक समिति पुन्हा जिवंत झाली. मुंबई कॉंग्रेस स्वतंत्र मुंबईसाठीं कटिबद्ध झाली. भाषावार प्रांतरचनाच पुढें ढकलावी, निदान मुंबईचें स्वतंत्र राज्य करावें, अशा सूचना करणाऱ्या निवेदनांचा पुनर्रचना मंडळावर पाऊस पाडण्यात आला. महाराष्ट्राच्या विरोधकांनीं आपली सर्व शक्ति या वेळीं पणाला लावली होती. पण संयुक्त महाराष्ट्र परिषदेतर्फे जें निवेदन करण्यांत आलें तें अत्यंत तर्कशुद्ध होतें. त्यामुळें महाराष्ट्राची बदनामी करण्याचे देशव्यापी प्रयत्न झाले असले तरीहि आपलें ध्येय साध्य होणार अशी मराठी नेत्यांची

खात्री होती. पुनर्रचना मंडळानें मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याचा निर्णय घेतला होता. तशी शिफारस करणारें प्रकरणहि लिहिण्यांत आलें होतें. संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या इतर दोन पुढाऱ्यांच्या देखत पुनर्रचना मंडळाच्या अध्यक्षांनीं आपल्याला हें प्रकरण वाचून दाखविलें होतें असें श्री. भाऊसाहेब हिरे यांनीं पुढें जाहीरपणें सांगितलें.

**एक लज्जास्पद प्रकरण**

मग हें प्रकरण कसें बदललें गेलें ? हा इतिहास बराचसा अज्ञात आहे. पुनर्रचना मंडळाच्या सदस्यांना आपलें मत बदलण्याचा पूर्ण अधिकार होता. पण त्यांनीं मत कां बदललें, कसें बदललें, हें अधिकृतपणें कोणीं सांगितलेलें नाहीं; आणि ही गोष्ट श्रेष्ठ व्यक्तींवरचा विश्वास नाहींसा करणारी अशीच समजली पाहिजे. विशेषतः गुजरातच्या नेत्यांनीं या प्रकरणीं ज्या कारवाया केल्या त्या राष्ट्रवादाला न शोभणाऱ्या आणि लोकशाहीला काळीमा आणणाऱ्या अशाच समजल्या पाहिजेत. पुनर्रचना मंडळ मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची शिफारस करणार असें समजतांच मुंबईचे मुख्य मंत्री श्री. मोरारजी देसाई यांच्या बंगल्यावर कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. ढेबर यांच्या पुढाकारानें गुजराती कॉंग्रेस जनांची बैठक भरली आणि गुजरात आणि विदर्भाखेरीज बाकीचा महाराष्ट्र यांचें 'समतोल द्विभाषिक' निर्माण करण्याची क्लृप्ति निघाली; आणि पुनर्रचना मंडळाचा निर्णय बाहेर आला त्या वेळीं विदर्भाचें वेगळें राज्य, बेळगांव-कारवारचा मुलूख कर्नाटकांत आणि मुंबईसह बाकीचा महाराष्ट्र गुजरातेंत असे महाराष्ट्राचे तीन तुकडे करण्याची योजना उघड झाली. हें सर्व कारस्थान गुजराथी नेत्यांचें आहे याबद्दल मराठी लोकांना शंका उरली नाहीं. महाराष्ट्रावर हा अन्याय तर केलाच पण मराठी लोकांवर नालायकीचा शिक्का मारून त्या अन्यायावर अपमानाचें मीठ चोळण्यांत आलें. मराठी लोकांबद्दल अत्यंत अनुदार आणि क्षुद्रपणाचें भाष्य काढणारा मजकूर या अहवालांत कोणीं घुसडला हेंहि एक रहस्यच आहे. आधुनिक भारताच्या इतिहासांतील हें एक लज्जास्पद प्रकरण आहे !

श्री. मोरारजी देसाई हे मुंबईच्या त्रिभाषिक राज्याचे मुख्यमंत्री होते.

पण या राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नांत त्यांनीं आपली भूमिका त्या पदाला साजेशी निःपक्षपातीपणाची ठेवली नाहीं. मुंबई महाराष्ट्रांत जाऊं नये असें ठाम मत त्यांनीं स्वीकारण्यासारखी कोणतीहि तात्त्विक भूमिका नव्हती. त्यांचें तें मत लोकशाहीशीं उदार आणि व्यापक दृष्टिकोणाशीं विसंगत होतें. त्यामुळें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर ते राष्ट्रीय भूमिकेवरून संकुचित प्रांतीय भूमिकेवर आले. मुंबईच्या प्रश्नावर सरदार पटेल यांच्या दुराग्रहाचा वारसा त्यांनीं उचलला, पण तो दुराग्रह पेलण्याइतकें सरदारांचें सामर्थ्य आणि भव्यता त्यांच्या ठिकाणीं नव्हती. त्यामुळें मोरारजींची पुढची कृति ही दुष्टपणाची, मराठी लोकांच्या शत्रुत्वाची अशीच भासूं लागली. राज्यपुनर्रचनेचा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वींच त्यांनीं मुंबईत आणि इतर महाराष्ट्रांत रस्तोरस्तीं पोलिसांचे चौक्या पहारे बसविले. त्यांनीं अविश्वास पेरला आणि त्यांतून पुढें अविश्वासाचेंच पीक आलें. अन्यायानें, अपमानानें तप्त झालेल्या मराठी लोकांना मोरारजी देसाई दंडुकेशाहीचा धाक घालीत आहेत असें वाटलें. शंकरराव देव आणि महाराष्ट्र कॉंग्रेस या परिस्थितींतूनहि मार्ग काढतील असें लोकांना वाटत होतें. तोंपर्यंत ते शांत होते. लोकांचा तो विश्वास ढळतांच दंगली झाल्या.

## मोरारजींची भूमिका–राष्ट्रीय कीं प्रांतीय ?

मोरारजी राष्ट्रीय भूमिकेवरून प्रांतिक भूमिकेवर आले होते, ही गोष्ट पुढें गुजरातमधील असंतोष शमविण्यासाठीं त्यांनीं उपोषण केलें त्या वेळीं सिद्ध झाली. वस्तुतः व्यापक राष्ट्रीय भूमिका त्यांनीं सोडली त्या वेळींच त्यांनीं मुंबईचें मुख्यमंत्रीपद सोडायला हवें होतें. त्यामुळें वळण लागलें असतें. पण मोरारजींचा अहंकार जाज्वल्य असल्यामुळें त्यांनीं तो मार्ग पत्करला नाहीं. उलट वेळोवेळीं महाराष्ट्राच्या संदर्भांत मग्रुरीची, अवहेलनेची आणि अपमानास्पद भाषा त्यांनीं वापरली. त्यामुळें आगींत तेल पडल्यासारखें झालें. त्यांनीं लोकक्षोभ शमविण्यासाठीं जो कठोर आणि बेफाम गोळीबार करविला तो कितपत अपरिहार्य होता हा मतभेदाचा प्रश्न होऊं शकेल. पण मोरारजींच्या वर्तनानें त्याला एक तऱ्हेचा सूडाचा रंग भरला होता हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. अखिल भारतीय नेतृत्व

करण्यास मोरारजी पुरे पडणार नाहींत हें सिद्ध झालें. मुंबईच्या मुख्यमंत्री-पदाला ते दुराग्रहानें चिकटून राहिले. पण अखेर त्यांच्या अनुयायांनींच त्यांचें त्या पदावरून उच्चाटन केलें आणि त्यांचा अहंकार जिरवला.

### श्री. शंकरराव देव

राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वी मंडळाच्या शिफारशींबद्दल अंदाज व्यक्त करणाऱ्या वार्ता विशिष्ट वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होऊं लागल्या. हे 'अंदाज' पुढें तंतोतंत खरे असल्याचें सिद्ध झालें; कारण ते मोठ्या पद्धतशीरपणेंच प्रसिद्ध झाले होते. या वार्ता प्रसिद्ध होऊं लागतांच श्री. शंकरराव देव हे भूदान कार्य बाजूला ठेवून महाराष्ट्रांत आले आणि त्यांनीं जनतेला 'शांततामय आत्मक्लेशाचा' मार्ग चोखाळ-ण्यास सिद्ध राहण्याचें आवाहन केलें. कॉंग्रेसमधून आणि राजकारणांतून ते यापूर्वींच बाहेर पडले होते. पण संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर त्यांना एक प्रकारची जिद्द होती. कॉंग्रेसमध्यें असतांनाच त्यांनीं संयुक्त महाराष्ट्राचा पुकारा करून संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें नेतृत्वहि स्वीकारलें होतें. या सर्व-पक्षीय संघटनेचें पुढारीपण स्वीकारल्यामुळें आणि मुंबईशिवाय महाराष्ट्र स्वीकारण्यास सरदार पटेल यांना नकार दिल्यामुळें कॉंग्रेसमधील त्यांचें स्थानहि एक प्रकारें त्यांना गमवावें लागलें होतें. त्यांची भाषा ठाम असल्यामुळेंच त्यांच्यावर मराठी लोकांचा विश्वास बसला होता. पण संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न हा आतां राजकारणाचा झाला होता. लोकांच्या भावना चेतविल्या गेल्या होत्या. तेव्हां या प्रश्नावरील त्यांची जिद्द ही कॉंग्रेस श्रेष्ठांबद्दलच्या आणि स्वतःच्या मार्गाबद्दलच्या गैरसमजावरच आधारलेली होती.

१९४६ सालीं बेळगांव साहित्य संमेलनांत संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मंजूर होऊन त्याच वेळीं सर्वपक्षीय संस्था स्थापण्यासाठीं एक उपसमिति निर्माण झाली. यांतून संयुक्त महाराष्ट्र परिषद् स्थापन झाली. संयुक्त महाराष्ट्र परिषद् सर्वपक्षीय होती तरी परिषदेंतील खरा उत्साह कॉंग्रेस नेत्यांचाच होता. वरिष्ठ कॉंग्रेस नेते त्यांच्या उत्साहावर थंडगार पाणी ओतीत होते तरीहि ठिकठिकाणीं भरणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें

पुढारीपण स्वीकारून ते लोकमत संघटित करीत होते. लोकमत प्रभावी होऊं लागतांच हळूहळू इतर पक्षहि परिषदेंत पुढें सरसावूं लागले. अशा तऱ्हेनें सर्वपक्षीय राजकीय आघाडीचें स्वरूप आलेल्या या संघटनेंत शंकरराव देव यांच्या नेतृत्वामुळेंच काँग्रेसजन राहिले. आपल्या आणि महाराष्ट्रीय काँग्रेस नेत्यांच्या मर्यादा लक्षांत न घेतां या राजकीय आघाडीचें नेतृत्व करण्यास शंकरराव देव सज्ज झाले. संयुक्त महाराष्ट्र परिषद् सर्व-पक्षीय होती. तरीहि शंकररावांच्या नेतृत्वाचा आधार महाराष्ट्र काँग्रेस हाच होता. आपल्या नेतृत्वाला त्यांनीं नवा आधार निर्माण केला नाहीं; आणि महाराष्ट्र काँग्रेस नेते पेंचांत येतील अशीं पावलें टाकण्यास सुरुवात केली.

## कचखाऊ मराठी काँग्रेसनेते

शंकरराव देव 'शांततापूर्ण आत्मक्लेशाच्या' मार्गाची भाषा बोलून लोकांच्या भावना उंचावीत होते. संयुक्त महाराष्ट्र सिद्ध करण्यासाठीं ते उपोषण करतील असेंहि लोकांना वाटत होतें. एकीकडे लोकांच्या भावना अशा तऱ्हेनें उंचावीत नेऊन ते काँग्रेसश्रेष्ठींशीं वाटाघाटी करूं लागले. राज्यपुनर्रचना मंडळानें सुचविलेली 'समतोल' द्विभाषिकाची रोगट कल्पना इतकी क्षीण होती कीं, अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर ती कल्पना तत्काळ गतप्राण झाली; आणि शंकररावांशीं झालेल्या पहिल्याच भेटींत काँग्रेसश्रेष्ठींनीं त्या कल्पनेचें दफन केलें. काँग्रेसश्रेष्ठींनीं विदर्भासह महाराष्ट्र देण्याचें मान्य केलें. पण त्या महाराष्ट्रांत मुंबई घालण्यास त्यांनीं साफ नकार दिला. मग मुंबईसंबंधीं अनेक पर्याय निघाले आणि काँग्रेसश्रेष्ठींशीं शंकरराव देव व मराठी काँग्रेस नेते वाटाघाटी करीत राहिले. मुंबई महाराष्ट्रांत घालण्यास काँग्रेसश्रेष्ठींनीं नकार दिल्यानंतर पर्यायांवर चर्चा करण्यास मुद्दाच नव्हता. पण हे पर्याय अमान्य आहेत असें म्हणण्याची काँग्रेस नेते यांची हिंमत झाली नाहीं. प्रत्येक पर्यायाला मराठी काँग्रेस नेते मान डोलावीत होते असेंच शेवटीं आझादांनीं जाहीरपणें सांगितलें.

महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी काढून तिचें शहर राज्य करण्याची कल्पना निघतांच मुंबईतील मराठी लोकांनीं कल्लोळ केला. त्यामुळें मुंबईचें राज्य करण्यांतला धोका हेरून ती केंद्रशासित करण्याचा बूट निघाला. त्यामुळें

लोक अधिकच खवळले. कारण मुंबईत बहुमत करून ती जिंकण्याचाहि मार्ग बंद झाला होता. तत्पूर्वी शंकरराव देव यांनीं विदर्भासह महाद्विभाषिकाची कल्पना सुचविली होती. पण ती गुजरात काँग्रेसनें फेटाळली. शंकरराव देवांनीं ही योजना स्वीकारण्यासाठीं मोरारजींची मनधरणी करून पाहिली. पण तीहि फुकट गेली. अखेर केंद्रशासित मुंबईचा निर्णय येतांच मुंबईत दंगली झाल्या. राज्यपुनर्रचना विधेयकावर मुंबई विधानसभेंत चर्चा चालू असतां त्रिराज्य योजनेला विरोध करण्यासाठीं जो मोर्चा निघाला होता त्याच्यावर मोरारजींच्या आज्ञेनें गोळीबार झालाच होता. केंद्रशासित मुंबईचा निर्णय जाहीर झाल्यानंतर मुंबईत झालेला गोळीबार केवळ अमानुष होता. मोरारजींच्या मनाचा त्या वेळीं तोलच गेला होता. त्या वेळीं ज्या दंगली झाल्या आणि राष्ट्रनेत्यांच्या फोटोंना पादत्राणांच्या माळा घालण्यासारखे जे प्रकार झाले त्यांचें समर्थन कोणीच करणार नाहीं. पण गोळीबारसुद्धां समर्थनीय ठरणार नाहीं. गोळीबार अपरिहार्य होता असें म्हणणाऱ्यांनीं ही अपरिहार्यता कोणीं आणली याचेंहि उत्तर दिलें पाहिजे. मुंबईतील त्या वेळच्या भयानक प्रकारांची अधिकतर जबाबदारी मोरारजी देसाई, पाटील आणि काँग्रेसश्रेष्ठी यांच्यावरच आहे.

## समितीचा जन्म

मराठी लोकांनीं त्या वेळीं जे प्रकार केले ते भडकून केले; आणि लोकांना भडकावण्याचें कार्य मोरारजी, पाटील यांनीं मराठी लोकांना दिलेल्या आव्हानांनीं आणि काकासाहेब गाडगीळ, शंकरराव देव आणि इतर मराठी काँग्रेसजनांनीं केलेल्या भाषणांनीं पार पाडलें होतें. मराठी लोकांनीं भडकून जाऊन जे प्रकार केले त्यामागें कोणत्याहि पक्षाचा कट नव्हता. पण ‘ सर्वस्व पणाला लावण्याची ’ भाषा देवांनीं वापरली होती; मुंबईचा प्रश्न रस्त्यांत सोडविण्याचा प्रयत्न होईल, मराठी लोक छातीवर गोळ्या झेलतील, या प्रश्नावर तडजोड नाहीं, असली भाषा काकासाहेबांनीं वापरली होती. काँग्रेस संघटना आणि संयुक्त महाराष्ट्राचें ध्येय यांची सारखीच एकनिष्ठा अतिशय सुसंगतपणें दाखवून काकासाहेबांनीं संयुक्त महाराष्ट्राचें मोठें कार्य केलें. पण त्यांच्या अनुपम वक्तृत्वानें त्यांच्या

मुत्सद्देगिरीवर अनेकदां मात केली हेंहि विसरतां कामा नये. मोरारजींनीं तर मराठी लोकांवर स्त्रियांचा विनयभंग केल्याचेहि निराधार आरोप केले. अशा परिस्थितींत श्री. शंकरराव देव यांनीं आपल्या हातीं आलेल्या सर्वाधिकारांत संयुक्त परिषदेचेंच विसर्जन करून टाकलें. या परिषदेंतून कॉंग्रेस पुढारी आधींच दूर झाले होते. शंकरराव नुसतें 'शांतिः शांतिः शांतिः' असें म्हणत होते. भडकलेल्या लोकांचें नेतृत्व स्वीकारून त्यांना मार्गदर्शन करण्याचें कार्य अतिशय महत्त्वाचें होतें. हें कार्य करण्यास श्री. एस्. एम्. जोशी पुढें आले आणि पुढें त्यांनीं सर्व विरोधी पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र समिति स्थापन केली.

## लोकक्षोभाचा परिणाम

मुंबई केंद्रशासित करण्याचा निर्णय सरकारनें घेतला होता; या केंद्र-शासनाला पांच वर्षांची मुदत पुढें पं. नेहरूंनीं जाहीर केली. पण लोकक्षोभ कायम होता. निदर्शनें-सत्याग्रहांनीं मुंबई दणाणत होती. महिनेच्या महिने हें तापलेलें वातावरण कायम होतें. लोकसभेपुढें केंद्रशासित मुंबईचें विधेयक आलें त्या वेळीं दिल्लीला समितीच्या प्रमुख पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं एक हजार लोकांनीं सत्याग्रह केला. आणि मराठी लोकांचें दुःख वेशीवर टांगलें. मुंबईच्या प्रकरणांत ज्या घटना घडत होत्या त्या नेहरूंच्या मनाला बोंचत असल्या पाहिजेत. त्यांची जन्मजात लोकशाही वृत्ति त्यांना सतावीत होती. मुंबईसंबंधीं त्यांनीं अखेरचा निर्णय असा घेतला नाहीं; आणि घेतलेला निर्णय अपरिवर्तनीय आहे असेंहि म्हटलें नाहीं. केंद्रशासित मुंबई, महाराष्ट्र आणि गुजरात निर्माण करण्याचें विधेयक लोकसभेसमोर होतें; आणि केंद्रशासित मुंबईला पांच वर्षांची कालमर्यादाहि त्यांनीं बोलून दाखविली होती. अखेर मराठी लोकमताची तीव्रता पाहून ३० जुलै रोजीं लोकसभेंत पं. नेहरूंनीं महत्त्वाचा खुलासा केला. केंद्रशासित मुंबईच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठीं श्री. चिंतामणराव देशमुख यांनीं अर्थमंत्रि-पदाचा राजीनामा दिला होता. त्यांनीं लोकसभेंत केलेल्या निवेदनानें महाराष्ट्रविरोधी कट रचणाऱ्यांची दाणादाण उडाली होती. म्हणून

महाराष्ट्राचें सांत्वन करण्यासाठीं पं. नेहरूंनीं लोकसभेंत आणि नंतर पुण्याला टिळक पुण्यतिथीच्या वेळीं अशीं दोन निवेदनें केलीं.

## पंडितजींचीं दोन निवेदनें

लोकसभेंत पं. नेहरू म्हणाले, 'माझ्यापुरतें म्हणाल तर मुंबई महाराष्ट्रांत समाविष्ट झाली तर मला आनंदच होईल. किंबहुना मुंबईत जेव्हां शांतता नांदूं लागेल तेव्हां मी स्वतः देखील मुंबई महाराष्ट्रांत समाविष्ट करावी म्हणून वकिली करीन.' त्यानंतर पुणें येथें पं. नेहरूंनीं जाहीर सभेंत सांगितलें, 'महाराष्ट्रियांच्या हातीं मुंबई शहर गेलें तर ते त्या शहराच्या बहुरंगी संस्कृतीचा नाश करतील असें मला म्हणावयाचें नाहीं. सर्व संबंधितांच्या सद्‌भावनेनें व संमतीनें मुंबई महाराष्ट्राला मिळाली तर तें महाराष्ट्राच्या आणि देशाच्याहि हिताचें होईल. नाहीं तर महाराष्ट्राला आणि देशालाहि ती एक डोकेंदुखीच होऊन बसेल.' पं. नेहरूंचा दृष्टिकोन साफ निवळल्याचे हे उद्‌गार होते. आज ना उद्यां मुंबई महाराष्ट्रांत घालण्यास नेहरूच पुढें येणार हें स्पष्ट झाल्यामुळें ज्यांनीं पूर्वीं मुंबई वेगळी ठेवण्यासाठीं अट्टाहास केला होता त्यांनींच विदर्भासह द्विभाषिक राज्य निर्माण करण्याच्या दृष्टीनें पुढाकार घेतला. श्री. चिंतामणराव देशमुख यांनीं द्विभाषिकाला आपला जाहीर पाठिंबा दिला होता. त्यामुळें विशाल द्विभाषिकाच्या योजनेला २८२ खासदारांच्या सह्या गोळा करून पंतप्रधान पं. नेहरू पुण्याहून परत येतांच त्या त्यांच्या हातीं देण्यांत आल्या. द्विभाषिकाची ही योजना लोकसभेनें झटपट मंजूरहि केली. श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं मात्र त्या विरुद्ध मत नोंदविलें.

अशा अनपेक्षित रीतीनें द्विभाषिक राज्य आलें. पण त्यानें मराठी किंवा गुजराती लोकांना तर हा वज्राघातच वाटला. महागुजरात त्यांच्या हातांतून हिसकावून घेतला गेला होता. त्यामुळें गुजराती जनता चिडली आणि मुंबईतील पूर्वींचा प्रक्षोभ फिका वाटेल अशा भयानक दंगली त्यांनीं गुजरातभर केल्या. मोरारजींच्या अब्रूचें अहमदाबादेंत वस्त्रहरण झालें. आणि आपली अब्रू झांकण्यासाठीं त्यांनीं एक उपोषण केलें. गुजरातमध्यें हें द्विभाषिक कॉंग्रेसजनांसकट कोणालाच मंजूर नव्हतें. मोरारजींनाहि तें

नको होतें; पण नको म्हणण्यास त्यांना तोंड उरलें नव्हतें. शंकरराव देवांनीं हेंच द्विभाषिक सुचविलें तेव्हां महाराष्ट्र काँग्रेसनें तें स्वीकारलें होतें आणि इतर मराठी लोकांनीं किंवा नेत्यांनींहि त्याला विरोध असा केला नव्हता. पण आतां महाराष्ट्रांतहि काँग्रेससकट कोणालाच हें द्विभाषिक नको होतें. कारण महाराष्ट्राला बहुमत असलें तरी तेथें आपला प्रभाव पडेल अशी मराठी काँग्रेसजनांना आणि इतरांनाहि खात्री नव्हती. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुंबई महाराष्ट्रांत असली तरी ती केवळ मराठी राज्यांत घालायची नाहीं हाच डाव यांतून साधला गेला असें महाराष्ट्राला वाटत होतें. पुढें सार्वत्रिक निवडणुकींत गुजरातपेक्षांहि अधिक त्वेषानें मराठी लोकांनीं द्विभाषिक फेटाळून लावलें याचें तर्कशुद्ध कारण हेंच होतें. इतर सर्वांना भाषिक राज्यें देऊन फक्त महाराष्ट्र-गुजरातवरच द्विभाषिक लादलें हा अन्याय आहे ही भावनाहि होतीच; पण ती सुद्धां दुय्यमच होती.

द्विभाषिक राज्य आलें आणि मुंबईतील मोरारजीभाईंचें मुख्यमंत्रिपद गेलें. महाराष्ट्राला हा शुभशकून झाला; आणि मोरारजींना मुख्यमंत्रिपदा-वरून घालविण्याचें श्रेय त्यांना विरोध करण्यासाठीं उभे राहिलेले श्री. भाऊसाहेब हिरे यांनाच दिलें पाहिजे. मोरारजी बाजूला झाल्यामुळें मुख्यमंत्रिपदावर अपरिहार्य श्री. यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. आतांपर्यंत मुंबई महाराष्ट्रांत आणण्याची जी एकमार्गी प्रक्रिया मराठी लोकांनीं चालविली होती त्याऐवजीं दुहेरी प्रक्रिया सुरू झाली. संयुक्त महाराष्ट्र समिति आणि श्री. यशवंतराव चव्हाण या दोघांच्या प्रयत्नांनें आतां संयुक्त महाराष्ट्र होणार आहे. यशवंतरावांना हें संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचें श्रेय निष्कारण दिलें जातें असें कित्येकांना वाटतें; तसा प्रचारच होतो. म्हणून श्री. यशवंतराव चव्हाण यांची या प्रश्नांतील भूमिका मुळा-पासूनच तपासून पाहिली पाहिजे.

## यशवंतरावांची भूमिका

संयुक्त महाराष्ट्र समितीप्रमाणेंच श्री. यशवंतराव चव्हाण यांनींहि मुंबई महाराष्ट्रांत आणली. याचा अर्थ द्विभाषिक मोडून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र करण्यासाठीं धूर्तपणें द्विभाषिक स्वीकारलें असा नाहीं. काँग्रेसश्रेष्ठींनीं आणि

लोकसभेनें सांगितलेला एक प्रयोग त्यांनीं प्रामाणिकपणें करून पाहिला. मग केवळ द्विभाषिक मोडण्याचा सल्ला त्यांनीं काँग्रेसश्रेष्ठींना दिला; आणि आज ते मुंबईचे मुख्यमंत्री आहेत म्हणून त्यांना संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याचें, मुंबई महाराष्ट्रांत आणण्याचें श्रेय द्यावयाचें कीं काय असा प्रश्न साहजिकच मनांत उभा राहील. यशवंतरावांची भूमिका मुळापासून तपासली म्हणजे या प्रश्नाचें उत्तर मिळेल. एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, यशवंतरावांचें नेतृत्व महाराष्ट्रांतहि ते मुंबईचे मुख्यमंत्री होईपर्यंत दुय्यम दर्जाचें होतें. श्री. केशवराव जेधे यांनीं काँग्रेस सोडल्यानंतर भाऊसाहेब हिरे हे महाराष्ट्र काँग्रेसचे नेते झाले. शंकरराव देव हे भाऊसाहेबांचें स्फूर्तिस्थान, निदान संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर तरी होतें. त्यामुळें हिरे आणि देव यांच्या धोरणांतच चव्हाणांचें धोरण सामान्यत: अंतर्भूत होतें; फक्त वेळोवेळीं ते त्या धोरणाला आपली टीप देत असत. यापेक्षां अधिक कांहीं करण्यासाठीं त्यांना महाराष्ट्र काँग्रेसच्या नेतृत्वाविरुद्ध बंड पुकारावें लागलें असतें. हें बंड पुकारणें त्यांनीं फलटणच्या प्रसिद्ध बैठकीपर्यंत टाळलें. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर संयुक्त महाराष्ट्र परिषदेंत राहणें म्हणजे सर्वपक्षीय आघाडीचें राजकारण असून त्यामुळें काँग्रेस धोक्यांत येईल हें महाराष्ट्रांत फक्त दोनच काँग्रेस पुढाऱ्यांनीं ओळखलें होतें. पहिले काकासाहेब गाडगीळ आणि दुसरे यशवंतराव चव्हाण. काकासाहेब गाडगीळ महाराष्ट्रांत काँग्रेसचे मोठे पुढारी म्हणून मानले जात असले तरी खुद्द महाराष्ट्र काँग्रेसमध्यें त्यांच्या शब्दाप्रमाणें धोरण ठरत नव्हतें, कारण काकासाहेब गाडगीळ संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे कधीं प्राथमिक सदस्यहि झाले नाहींत. पण शंकरराव देवांच्या प्रेरणेनें महाराष्ट्र काँग्रेस पुढाऱ्यांचें परिषदेशीं होत असलेलें सहकार्य ते थांबवूं शकले नाहींत. यशवंतराव त्या वेळीं दुय्यम नेते असल्यामुळें देव-हिरे यांच्याबरोबर ते फरफटत गेले.

## देव विरुद्ध चव्हाण

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न काँग्रेसनें सोडविला नाहीं तर तो सोडविण्यासाठीं विरोधी पक्षांचें संयुक्त राजकारण उभें राहील असा इशारा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत

यशवंतरावांनीं हैदराबाद काँग्रेसमध्यें काकासाहेब गाडगीळांनीं मांडलेल्या भाषिक प्रांतांच्या ठरावाला उपसूचना जोडतांनाच दिला होता. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें नेतृत्व देव आणि हिरे करीत होते. परिषदेतर्फे महाराष्ट्राची कैफियत पुनर्रचना मंडळाला देण्यांत आली. पुढें गुजराती काँग्रेस नेत्यांच्या कारवायांनीं समतोल द्विभाषिकाचा निर्णय झाला. त्याला यशवंतरावांचा प्रखर विरोध होता. मग मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठीं मराठी काँग्रेस पुढारी दिल्लींत काँग्रेसश्रेष्ठींशीं वाटाघाटी करूं लागले. त्यांत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हीच ठाम मागणी असावी असें यशवंतरावांचें मत होतें. पण शंकरराव देवांनीं महाद्विभाषिकाचा पर्याय सुचविला. या पर्यायाला यशवंतरावांनीं इतका विरोध केला कीं, देवांबरोबर काँग्रेसश्रेष्ठींशीं वाटाघाटी करण्यासाठीं जाण्यासहि त्यांनीं नकार दिला होता. शेवटीं सर्व पुढाऱ्यांच्या आग्रहामुळें ते शंकररावांबरोबर काँग्रेसश्रेष्ठींकडे गेले. या वेळींच यशवंतरावांनीं शंकररावांचें नेतृत्व झुगारून दिलें असतें तर महाराष्ट्रांत दुही माजविल्याचा जो आरोप पुढें त्यांच्यावर झाला तो त्या वेळीं अधिकच तीव्रतेनें झाला असता. देवांच्या महाद्विभाषिक योजनेला पाठिंबा देणारा ठराव महाराष्ट्र काँग्रेसनें मंजूर केला, त्या वेळीं यशवंतरावांनीं केलेल्या भाषणांतील कांहीं वाक्यें प्रसिद्ध आहेत. ते म्हणाले होते, ‘ गुजरातच्या नेत्यांनीं मुंबई शहरावर हक्क सांगणें हा शुद्ध ‘ स्वदेशी वसाहतवाद ’ आहे. आपण परकी वसाहतवादाचा पराजय करून स्वातंत्र्य प्रस्थापित केलें. या स्वदेशी वसाहतवादाचेंहि पारिपत्य आपल्याला करावें लागणार आहे. ’ महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला डंख करण्यांत आला आहे. मतभेद असले तरी संकटकाळीं महाराष्ट्र दुभंगणार नाहीं असेंहि उद्‌गार या वेळीं त्यांनीं काढले होते.

## मराठी काँग्रेसनेत्यांची दोलायमान स्थिति

मुंबई विधानसभेंत त्रिराज्य योजनेचा ठराव १८ नोव्हेंबर १९५५ रोजीं यावयाचा होता. त्या दिवशीं ‘ संप नको; पण निदर्शनें करावीं ’ असें पत्रक शंकरराव देवांनीं काढलें होतें. या निदर्शकांवर लाठीमार झाला. पुढें निदर्शनें स्वयंस्फूर्तीनेंच चालू राहिलीं. मोरारजी आणि पाटील

यांचीं प्रक्षोभक भाषणें चालू होतीं. निदर्शनेंहि उग्र होत होतीं. मोरारजींच्या गोळीबारांत चौदा लोक ठार झाले. पांच दिवसांचें उपोषण करून शंकरराव देवांनीं प्रायश्चित्त घेतलें. या वेळीं मराठी काँग्रेस पुढाऱ्यांपुढें बिनतोड परिस्थिति उभी होती. एक तर त्यांनीं मराठी लोकांच्या भावना शांत करण्यासाठीं काँग्रेसविरुद्ध बंड पुकारणें जरूर होतें किंवा काँग्रेस पक्षावरची निष्ठा अभंग ठेवून प्रक्षोभाला आळा घालण्यासाठीं ठामपणें उभें राहणें जरूर होतें. पहिला बंडाचा मार्ग मुंबईत डॉ. नरवणे आणि श्री. गो. बा. महाशब्दे यांनीं स्वीकारला. महाशब्दे यांनीं श्री. स. का. पाटील यांच्या काँग्रेस पक्षाविरुद्ध बंड उभारून मुंबई महापालिकेंत संयुक्त महाराष्ट्राचा ठराव विजयी केला. महाराष्ट्रांतील काँग्रेस पुढारी काँग्रेस-विरुद्ध बंड पुकारण्यास तयार नव्हते. पण मंत्रिपदाचे राजीनामे देण्यास शंकरराव देव त्यांना प्रेरणा देत होते. हा अर्धवट मार्ग होता. बंड किंवा निष्ठा असा या वेळीं सरळ सवाल होता. राजीनामेहि देऊं आणि काँग्रेसशीं निष्ठाहि राखूं या मार्गानें वरिष्ठ काँग्रेस नेत्यांचा आणि जनतेचा दोघांचाहि विश्वास डळमळला असता. आणि लोकांच्या प्रक्षोभांत भर पडून अराजकाची परिस्थिति निर्माण झाली असती. देवांच्या प्रेरणेनें हा डळमळित मार्ग स्वीकारण्यास यशवंतराव चव्हाण यांनीं नकार दिला.

## यशवंतरावांची तर्कशुद्ध भूमिका

यापुढें काँग्रेसविरुद्ध बंड करावयाचें नसेल तर ठाम काँग्रेसचा उच्चार करणें जरूर होतें आणि त्यासाठीं शंकरराव देवांचें नेतृत्व झुगारून देणें आवश्यक होतें. सातारा जिल्हा काँग्रेसची १ डिसेंबर १९५५ रोजीं बैठक घेऊन तेथें या ठाम काँग्रेसनिष्ठेची आणि शंकरराव देवांचें नेतृत्व झुगारल्याची घोषणा यशवंतरावांनीं केली. आपण ही भूमिका घेणार हें त्यांनीं यापूर्वींच सहा दिवस अगोदर पत्र लिहून शंकररावांना कळविलें होतें. संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें शंकरराव देवांना दिलेले सर्वाधिकार रद्द झाले आहेत अशी घोषणा कॉ. डांगे यांनीं यापूर्वींच शिवाजी पार्कवरील जाहीर सभेंत केली होती. शंकरराव देव प्रक्षोभित झालेल्या जनतेला मार्ग-दर्शन करण्यास पुढें न येतां प्रायश्चित्ताचीं उपोषणें करीत बसले होते.

त्यामुळें लोकांनीं त्यांचें नेतृत्व झुगारलेंच होतें. कॉ. डांगे यांनींहि त्यांचें नेतृत्व झुगारलें. म्हणजे फक्त मराठी काँग्रेसजनच त्यांचें नेतृत्व मानीत होते. त्या काँग्रेसजनांना देव डळमळीत नेतृत्व देत होते. शंकरराव संयुक्त महाराष्ट्रासाठीं उपोषण करणार अशीहि भाषा चालू होती. शंकररावांच्या उपोषणानें मराठी काँग्रेस नेते अधिक अधिकच पेंचांत आले असते. म्हणूनच यशवंतरावांनीं त्यांचें नेतृत्व झुगारून दिलें. जनतेचा प्रक्षोभ वगळला तर या परिस्थितींतून विरोधी पक्षाच्या संयुक्त आघाडीचें राजकारण निर्माण होणार हें स्पष्ट होतें. त्याला तोंड देणें ही आपली जबाबदारी आहे असें यशवंतरावांना वाटत असावें. या सर्व दृष्टींनीं विचार करतां यशवंतरावांची फलटणची भूमिका तर्कशुद्ध होती असेंच म्हटलें पाहिजे.

## असामान्य नेतृत्वाची कसोटी

पण संयुक्त महाराष्ट्राचें काय ? फलटणला यशवंतरावांनीं शंकररावांच्या नेतृत्वाविरुद्ध बंड पुकारलें त्या वेळींच आपली भूमिका स्वच्छपणें मांडली. संयुक्त महाराष्ट्र आणि पं. नेहरू यांपैकीं कोणती तरी एकच गोष्ट स्वीकारण्याचा प्रश्न आला तर मी पं. नेहरूंना अग्रहक्क देईन. मुंबई-बाबतची मागणी मीं सोडून दिलेली नाहीं. पण ही मागणी पुरी करून घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मुंबईतील बिगर महाराष्ट्रीय लोकांना महाराष्ट्राची मागणी न्याय्य आहे हें पटवून देणें, किंवा राष्ट्रीय पुढाऱ्यांची याबाबत खातरजमा करून देणें हा होय. नेहरूनिष्ठा आणि लोकशाहीनिष्ठा यांचा समन्वय करून महाराष्ट्राचा प्रश्न सोडविण्याचा यशवंतरावांचा निर्धार या भूमिकेंतून व्यक्त झाला होता. 'संघटनेंतून, विचारपरिवर्तनांतून आणि अढळ निष्ठेनें आम्ही आमचें संयुक्त महाराष्ट्राचें ध्येय गांठूं' असें त्यांनीं त्यानंतर जळगांवच्या युवक परिषदेंत जाहीर केलें. पं. नेहरूंचा विश्वास गमवायचा नसेल तर काँग्रेस संघटनेंतच राहिलें पाहिजे; काँग्रेस सोडून केंद्रसत्तेशीं झुंज देण्याचें ठरविलें तर सर्वपक्षीय राजकीय आघाडींत सामील होऊन अराजक निर्माण करावें लागेल. अराजकानें संयुक्त महाराष्ट्र मिळणार नसून राज्यकर्तृत्वानें राष्ट्रीय नेत्यांच्या मनांत स्वतःबद्दल विश्वास निर्माण करून त्यांचें मतपरिवर्तन केलें पाहिजे आणि

संयुक्त महाराष्ट्र मिळविला पाहिजे ही यशवंतरावांची भूमिका होती. त्या वेळच्या प्रक्षोभित आणि गोंधळलेल्या मनःस्थितींत या भूमेकेचा विचार करणें लोकांच्या आटोक्याबाहेरचें होतें. त्यामुळें त्यांच्या हितशत्रूंनीं 'सूर्याजी पिसाळ' अशी शिवी देऊन त्यांच्याविरुद्ध काहूर उठविलें आणि त्यांच्याविरुद्ध प्रक्षोभ निर्माण करून त्यांना सळो कीं पळो करून सोडण्याची शिकस्त केली. पण यशवंतरावांचा आपल्या या भूमिकेवर इतका दृढ विश्वास होता कीं, आपल्याविरुद्ध इतकें काहूर माजलेलें असतांहि त्यांनीं आपल्या मनाचा तोल ढळूं दिला नाहीं. शांतपणें ते प्रक्षोभित जनसमुदायापुढेंहि युक्तिवाद करीत राहिले. यांतच यशवंतरावांच्या दूरदर्शी आणि असामान्य नेतृत्वाची कसोटी लागली.

## यशवंतरावांचें मार्गदर्शन

यशवंतरावांचा आत्मविश्वास इतका विलक्षण होता कीं, १९५६ च्या फेब्रुवारी महिन्यांत सांगलीच्या जाहीरसभेंत त्यांनीं सांगितलें, 'एक वेळ अशी येईल कीं, जाहीरपणें, किमान माझ्या कानांत तरी, हें कबूल कराल कीं, १९५५–५६ मध्यें तुम्ही जें बोललांत तें खरें होतें.' 'झगड्यानें, वैरानें मुंबई मिळणार नाहीं आणि मिळाली तरी ती मुंबई असणार नाहीं. तसाच मीहि कांहीं अगदीं पालापाचोळ्याचा नाहीं, कीं विरोधाची फुंकर मारून मी उडून जाईन. पंचवीस वर्षांचें माझें राजकीय जीवन जनतेपुढें आहे. मी त्याची जाहीर चौकशी करून घेण्यास तयार आहें. यांत काडी-इतकाहि अहंकार नाहीं. यशवंतराव राजकारणांतून सहजासहजीं उठून जाणार नाहीं.' २७ मार्च १९५६ मध्यें केंद्रशासित मुंबईची तरतूद असलेलें राज्यपुनर्रचना विधेयक मुंबई विधानसभेंत मांडण्यांत आलें. त्या वेळींहि यशवंतरावांनीं मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचाच पुरस्कार केला. १७ जून १९५६ रोजीं महाराष्ट्र कॉंग्रेसच्या बैठकींत हिरे यांनीं कॉंग्रेस. जनांनीं अधिकारपदांचा त्याग करण्यास मुभा मागणारा ठराव मांडला-त्याला विरोध करतांना यशवंतरावांनीं स्पष्टपणें सांगितलें कीं, लोकांना योग्य वेळीं योग्य मार्गदर्शन करण्यांतच नेतृत्वाची खरी कसोटी आहे. द्विभाषिक राज्य येण्यापूर्वींच कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या सभेंत सांगितलें होतें कीं,

महाराष्ट्राचें राज्य नेकीनें व कुशलतेनें चालवून यशस्वी करण्यांत मुंबई मिळविण्याचा मार्ग आहे.

पुढें द्विभाषिक राज्य आलें. मोरारजींच्या नेतृत्वाला भाऊसाहेब हिरे यांनीं विरोध केला म्हणून यशवंतरावांना मुंबईचें मुख्यमंत्रिपद देण्यांत आलें. यशवंतरावांनीं संयुक्त महाराष्ट्राबाबत जी भूमिका घेतली होती ती सत्तालोभाची नव्हती तर विशिष्ट तात्त्विक भूमिका होती. आणि याच भूमिकेवरून त्यांनीं द्विभाषिक राज्याचा कारभार सुरू केला. नेकीचा कारभार चालवून राज्य यशस्वी करायचें आणि आपल्या कर्तृत्वानें कॉंग्रेस वरिष्ठांचा, विशेषत: पं. नेहरूंचा आणि बिगर मराठी लोकांचा, विश्वास संपादन करायचा अशी यशवंतरावांची भूमिका होती.

## समितीचें ऐतिहासिक कार्य

पण संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र एकभाषी राज्य मिळविण्याच्या नाण्याची यशवंरावांची भूमिका ही एक बाजू होती. या नाण्याची दुसरी बाजू संयुक्त महाराष्ट्र समितीची भूमिका ही आहे. संयुक्त महाराष्ट्रांत मुंबई कां समाविष्ट करायची नाहीं याचें तर्कशुद्ध आणि लोकांना पटणारें कारण कोणी देऊं शकत नव्हतें. महाराष्ट्रावर अन्याय झाला होता, त्यांचा दुरुत्तरें बोलून मोठमोठ्या सत्ताधारी नेत्यांनीं अपमान केला होता, सुरुवातीपासून दंडुक्याचा धाक दाखवून मोरारजीभाईनीं मराठी लोकांना पद्धतशीरपणें प्रक्षोभित केलें होतें. त्यांतच 'तडजोड नाहीं', 'शांततामय कृति करावी लागेल', 'आत्मक्लेशाच्या मार्गे चोखळूं', 'मराठी लोक छातीवर गोळ्या झेलतील', 'मुंबईचा प्रश्न मुंबईच्या रस्त्यांत सोडविला जाईल' अशी लढाऊपणाची भाषा विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून नव्हे तर कॉंग्रेसच्या नेत्यांच्या तोंडूनच ऐकविली जात होती. लोकांचा प्रक्षोभ शिगेला पोंचला होता. अशा वेळीं अचानक संयमाची भाषा ऐकवून लोकांना वळविणें अशक्य होतें. ज्या क्रमानें प्रक्षोभ वाढविला गेला होता त्याच क्रमानें तो शांत करतां आला असता. पण एक यशवंतराव वगळतां दुसऱ्या कोणीं मराठी कॉंग्रेस नेत्यानें तर्कशुद्ध भूमिका घेतली नव्हती. आणि यशवंतरावांचे मंत्रिमंडळांतील नेते जे मोरारजी तेच

खरे राज्यकर्ते होते. मोरारजींच्या कृतीनें प्रक्षोभ कमी होण्याऐवजीं त्याला उकळ्या फुटत होत्या. १६ जानेवारीपासून मुंबईंत सहा दिवस जें भयानक हत्याकांड झालें त्यामुळें तर प्रक्षोभाचा वणवा साऱ्या महाराष्ट्रभर पेटला. या वेळीं लोकांना संयमाची जाणीव देणारी, त्यांचा स्वाभिमान आणि आत्मविश्वास यांना धक्का न लावतां त्यांना आंवरणारी एक शक्ति श्री. एस्. एम्. जोशी यांच्या नेतृत्वाच्या रूपानें पुढें आली. प्रक्षुब्ध जनतेला त्यांनीं नेतृत्व दिलें. चारित्र्य आणि तत्त्वनिष्ठा असलेली एस्. एम्. यांच्यासारखी व्यक्ति पुढें आली आणि त्यांनीं १९५६ च्या फेब्रुवारींत संयुक्त महाराष्ट्र समिति स्थापन केली. जनतेचा त्वेष, संताप, स्वाभिमान आणि आत्मविश्वास समितीच्या रूपानें साकार झाला. संयुक्त महाराष्ट्र निर्माण करणें हेंच समितीचें ध्येय होतें. त्यासाठीं निदर्शनांपासून सत्याग्रहापर्यंत आणि राजीनाम्यापासून निवडणुकीपर्यंत कोणताहि मार्ग चोखाळण्यास समिति सिद्ध झाली. मुंबईंत सत्याग्रह झाले, दिल्लींत सत्याग्रह झाले पुढें द्विभाषिक आलें आणि त्यांतून संयुक्त महाराष्ट्र कसा निर्माण होणार असा प्रश्न उभा राहिला. या प्रश्नाचें तर्कशुद्ध उत्तर कोणीच देऊं शकत नव्हता.

## द्विभाषिकानें तयार केलेली कोंडी

संयुक्त महाराष्ट्र समितीनें ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत मुंबईसह महाराष्ट्रांतील जागा जिंकल्या. त्यानंतर समितीला संयुक्त आघाडीच्या राजकारणाचें स्वरूप येऊं लागलें. त्यांत कम्युनिस्ट राजकारणाचे डावपेंच खेळले जाऊं लागले आणि त्यामुळें समितीच्या संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या विशुद्ध ध्येयवादाला पक्षीय राजकारणांतील सत्तावादी स्वार्थाचा उपसर्ग होऊं लागला, ही गोष्ट खरी असली तरी त्यामुळें समितीनें जी ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे तिचें मोल कमी होऊं शकत नाहीं. मुंबई जिंकण्याचें आणि द्विभाषिक मोडण्याचें असें दुहेरी कार्य द्विभाषिकाच्या निर्मितीनें मराठी लोकांच्या समोर उभें होतें; आणि हें कार्य बिकट होतें. द्विभाषिकानें मुंबईचा प्रश्न सुटला नव्हता. तो प्रश्न टाळण्यांत आला होता. मुंबई महाराष्ट्रांत घालायची नाहीं हाच निर्धार त्यामागें होता. मराठी

लोकांना द्विभाषिकांत बहुमत असलें तरी तें कॉंग्रेसच्या राजकारणांत प्रतिबिंबित होईल अशी खात्री नव्हती. पूर्वीच्या मुंबई राज्यांत महाराष्ट्रावर राजकीयदृष्ट्या सर्व प्रकारें अन्याय होतो ही गोष्ट डॉ. आंबेडकरांसारख्या पंडितानें आंकडेवार तपशील देऊन सिद्ध केलेली होती. तोच अन्याय नव्या द्विभाषिकांत चालू राहणार नाहीं याची खात्री नव्हती. परिस्थिति निवळल्यानंतर, मुंबई आणि विदर्भ यांच्यांतील प्रतिनिधींच्या साह्यानें गुजराती मुत्सद्दी महाराष्ट्रावर राज्य करतील अशी भीति लोकांना वाटत होती आणि विदर्भाच्या बाबतींत जें फूटपाडेपणाचें धोरण सतत चाललें होतें त्यामुळें अशी भीति वाटण्यास भरपूर आधार होता. त्यामुळें मराठी लोकांनीं निवडणुकांत मुंबई जिंकली तरी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळणें द्विभाषिकामुळें अशक्य होऊन बसलें होतें. द्विभाषिकाच्या निर्मितीमुळें संयुक्त महाराष्ट्राच्याच प्रश्नाची कोंडी झाली होती, संयुक्त महाराष्ट्र समितीनेंच ही कोंडी फोडली.

## लोकमताचा कौल

द्विभाषिक निर्माण झाल्यामुळें संयुक्त महाराष्ट्र मिळविण्यासाठीं निवडणुकीच्या मार्गानें लोकमताचा कौल द्विभाषिकाला नसून संयुक्त महाराष्ट्रालाच आहे हें सिद्ध करण्याची जबाबदारी संयुक्त समितीवर पडली. संयुक्त महाराष्ट्र समितीनें निवडणुकी लढविल्या आणि त्यांतून संयुक्त आघाडीचें राजकारण आणि कम्युनिस्ट डावपेंच बळावले. पण ही गोष्ट अपरिहार्य होती. ज्यांनीं द्विभाषिक आणलें त्यांच्यावरहि या परिस्थितीची जबाबदारी टाकली पाहिजे. समितीनें निवडणुका लढवून द्विभाषिकाचा पुरस्कार करणाऱ्या महाराष्ट्र कॉंग्रेसचा पराभव करणें हें संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीं आवश्यकच होतें. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर निवडणुका लढवूं नका असा सल्ला काकासाहेब गाडगीळ देत होते. निवडणुकांत संयुक्त-महाराष्ट्रद्रोह्यांना एकहि मत देऊं नका असें काकासाहेबांनींच शिवाजी पार्कवरच्या सभेंत सांगितलें होतें. जर समितीनें निवडणुकी लढविल्या नसत्या आणि गुजरातप्रमाणेंच महाराष्ट्रांतहि कॉंग्रेसच निवडून आली असती तर द्विभाषिकाला जनतेचा कौल मिळाला असें म्हणून द्विभाषि-

काच्या फेरविचाराचा प्रश्न कायमचा फेंटाळला गेला असता. द्विभाषिकाच्या कारभाराबाबतहि मोठें संकट ओढवलें असतें. तें संकट हें कीं, द्विभाषिक राज्यांत कॉंग्रेस पक्षामध्यें गुजराती आणि मराठी कॉंग्रेसजन प्रचंड प्रमाणांत निवडून आले असते तर प्रांतीय वृत्तीचे डावपेंच त्यांनीं एकमेकांविरुद्ध सतत चालू ठेवले असते. विरोधी पक्ष प्रचंड असतांना सुद्धां या द्विभाषिकांत अशा डावपेंचांनीं शेवटीं शेवटीं डोकें वर काढण्यास सुरुवात केलीच होती!

## प्रयोग अयशस्वी, निष्ठा यशस्वी!

द्विभाषिकाची निर्मिति हीच मुळीं अनैसर्गिक अशी गोष्ट होती. गुजराती-मराठी लोकांनीं परस्परांच्या विश्वासानें ही व्यवस्था स्वीकारली नव्हती. इतकेंच नव्हे तर कॉंग्रेसच्या गुजराती-मराठी पुढाऱ्यांनाहि परस्परांबद्दल पूर्ण विश्वास नव्हता. मराठी लोकांना गुजराती नेत्यांच्या कारस्थानाची आणि गुजराती लोकांना प्रचंड मराठी बहुसंख्येची भीति वाटत होती. ही दुर्दैवी परिस्थिति खरीच; पण ती होती हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. आणि या परिस्थितीवर द्विभाषिक मोडणें हाच इलाज होता. म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीनें द्विभाषिक मोडण्यासाठीं निवडणुकी लढविण्याचें ठरविलें ही एक ऐतिहासिक घटना होती. सं. म. समितीनें निवडणुकी लढविण्याचें ठरविल्यावर संयुक्त कार्यक्रम आंखला गेला. पण समितीला कार्यक्रम कुठें आहे म्हणून कॉंग्रेस हिणवीत होती त्याला उत्तर देण्याच्या ईर्षेतून संयुक्त कार्यक्रम जन्माला आला. समितीला संयुक्त आघाडीच्या राजकारणाचें स्वरूप कां आलें हें या परिस्थितीचें विश्लेषण केलें तरच कळेल. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीं हा धोका स्वीकारणें जरूर होतें. एस्. एम्. जोशी यांनीं हा धोका स्वीकारला. कारण त्यामागें महाराष्ट्राची जिद्द होती. यशवंतराव जसा द्विभाषिकाचा प्रयोग एका विशिष्ट निष्ठेच्या भूमिकेवर करीत होते तसाच एस्. एम्. जोशी संयुक्त महाराष्ट्राच्या भूमिकेवर हा संयुक्त आघाडीच्या राजकारणाचा प्रयोग करीत होते. योगायोग असा कीं या दोन्ही नेत्यांनीं चालविलेले प्रयोग अयशस्वी ठरले आणि निष्ठा यशस्वी झाल्या! महाराष्ट्राचें ध्येय साकार झालें. या

गोष्टी कोणीं ठरवून केलेल्या नाहींत आणि अशा गोष्टी ठरवून होतहि नाहींत. कारण जीवनांतील प्रश्न गणिताच्या पद्धतीनें सुटत नाहींत. ध्येयवादी नेते स्वार्थत्यागाच्या विशुद्ध भूमिकेवर राहिले तर त्यांतून निर्माण होणारी अदृश्य शक्तिच असे प्रश्न सोडविते. अशा वेळीं नेतृत्वाची कसोटी लागते.

## महाराष्ट्र जिद्द व नेतृत्व यशस्वी

सं. म. समितीनें निवडणुका लढविण्याचे ठरविलें. पण उमेदवार निवडण्याच्या प्रश्नावर समिति त्या वेळींच भंग पावली असती ! समितीचा उमेदवार निवडतांना इतके मतभेद झाले कीं मतभेद मिटत नाहींत आणि समितीतर्फे निवडणूक लढविली जात नाहीं असें त्या बैठकींत कॉ. डांगे यांनीं समितीचे अध्यक्ष म्हणून जाहीरहि केलें. त्या वेळीं समितीची आघाडी सांवरण्यास एस्. एम्. जोशी पुढें आले. त्यांनीं त्या वेळीं जें त्वेषपूर्ण भाषण केलें त्यामुळें पक्षीय मतभेद विरघळले आणि निवडणूक एकजूट सिद्ध झाली. हें संयुक्त आघाडीचें राजकारण नव्हतें तर महाराष्ट्राची जिद्द होती. या जिद्दीनेंच पुढें निवडणुकी जिंकल्या गेल्या. समितीला एवढा अभूतपूर्व विजय मिळेल अशी समितीच्या नेत्यांनाहि अपेक्षा नव्हती. पण निवडणुकीच्या धारातीर्थावर काँग्रेसचे अतिरथी महारथी धडाधड कोसळून पडले आणि समितीच्या नेत्यांनाहि आश्चर्य वाटेल असा विजय समितीला प्राप्त झाला. काँग्रेसचे मोठमोठे नेते पडले आणि यशवंतराव विजयी झाले. यशवंतरावांनीं संघटनेच्या बळावर आणि सभ्य, आर्जवी प्रचाराच्या जोरावर एक एक मत वेंचून हा विजय खेंचून आणला होता. पण याचबरोबर त्यांचा विजय हा महाराष्ट्रांतील एका नव्या नेतृत्वाचाहि विजय होता. महाराष्ट्राच्या दृष्टीनें त्यांच्या विजयाला एस्. एम्. जोशी यांच्या निवडणुकींतील विजयासारखेंच महत्त्व होतें. एस्. एम्. जोशींच्या रूपानें महाराष्ट्राची जिद्द यशस्वी झाली, तर यशवंतरावांच्या विजयानें महाराष्ट्राचा राज्यकर्ता यशस्वी झाला. महाराष्ट्राची जिद्द जितकी महत्त्वाची होती तितकेंच राष्ट्रीय नेतृत्वाचें मन जिंकणारें, महाराष्ट्राला काँग्रेसश्रेष्ठांत स्थान निर्माण करून देणारें यशवंतरावांचें स्थान महत्त्वाचें होतें. हें दुहेरी यश निवडणूक संग्रामांतून निर्माण झालें. तें कोणीं ठरवून झालेलें नाहीं.

## मुंबईत पाटलांना थप्पड

सार्वत्रिक निवडणुकीनंतर मुंबई महापालिकेच्या निवडणुकी आल्या. संयुक्त महाराष्ट्राचें हें मर्मस्थान होतें. मुंबईत काँग्रेसला शह देण्यांत पाटलांविरुद्ध बंड करून उठलेल्या डॉ. नरवणे, महाशब्दे यांनीं मोठी कामगिरी बजावली. समितीचें महापालिकेंत बहुमत नव्हतें त्या वेळींच या बंडखोर गटानें स्वतंत्र मुंबईवादी काँग्रेसला हादरा देऊन संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मंजूर केला होता. मुंबईतील अल्पसंख्याकांना काँग्रेसच्या झेंड्याखालीं संघटित करून महाराष्ट्राचा पराभव करायचा असा पाटलांचा चाणाक्षपणाचा डाव होता. सार्वत्रिक निवडणुकींत मुंबई शहरांत काँग्रेसला बारा तर समितीला अकरा जागा मिळाल्या. पण काँग्रेसचा हा नाममात्र विजय पुढें झालेल्या पोट-निवडणुकींत पुसून गेला. आणि समितीला बारा तर काँग्रेसला अकरा असे विजयी उमेदवारांचे आंकडे उलटेपालटे झाले. पण महाराष्ट्राचा मुंबईतील खरा दणदणीत विजय महापालिकेच्या निवडणुकींत मिळाला. समितीला ६९ आणि काँग्रेसला अवघ्या ५४ जागा मिळाल्या. महाराष्ट्रानें निवडणुकीच्या मार्गानेंच मुंबई जिंकली. स्वतंत्र मुंबईचा तोरा नाहींसा झाला; बहुरंगी संस्कृतीच्या खोडसाळपणाच्या प्रचाराचा तुरा मोडून पडला! समितीच्या या विजयानें मुंबईच्या प्रश्नाचा निर्णायक निकाल लागला. महाराष्ट्रांतील समितीच्या विजयानें द्विभाषिक राज्याला हादरा बसला. लोकमताचा कौल स्पष्ट झाला.

काँग्रेसचे नेते वरकरणीं द्विभाषिकाचा पराभव मान्य करीत नव्हते. मुंबईच्या प्रश्नाचा फेरविचार संबंधित नेत्यांमध्यें एकमत झाल्याशिवाय करतां येणार नाहीं अशा हुलकावण्या ते दाखवूं लागले. त्यामुळें संयुक्त महाराष्ट्र समिति महागुजरात परिषदेच्या नेत्यांविरुद्ध वाटाघाटी करून विभाषिक मोडण्याची एकमताची योजना ठरवूं लागले. पण या राजकारणांत समितीच्या नेत्यांना मुत्सद्देगिरी दाखवितां आली नाहीं. डांगचीं ४५ खेडीं सोडून देऊं; मुंबईच्या शिलकेंतून गुजरातला वांटा देऊं; असल्या तत्त्वशून्य घोषणा महागुजरात परिषदेशीं वाटाघाटी केल्यानंतर पुण्याच्या जाहीर सभेंत संयुक्त महाराष्ट्र समितीचे एक नेते कॉ. डांगे यांनीं केल्या. या

घोषणांमागें संयुक्त आघाडीचें व्यापक आणि धूर्त राजकारण असावें. पण समितीच्या या चुका महाराष्ट्राला महाग पडण्याचा धोका आहे. या चुका कशा निस्तरल्या जातात हें दिसेलच. राज्यकर्ता या नात्यानें या चुका निस्तरण्याची जबाबदारी श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यावर पडली आहे, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. याचा सरळ अर्थ असा कीं, संयुक्त महाराष्ट्र समिति ध्येयवादी भूमिकेवर जिद्दीनें राहिली तोंपर्यंत ती महाराष्ट्राला उपकारक ठरली. पण ज्या वेळीं ती राजकारण करूं लागली तेव्हां ती अपेशी ठरली.

## एस्. एम्.चें द्रष्टेपण

संयुक्त महाराष्ट्र समितीनें मुंबईत आणि महाराष्ट्रांत प्रचंड विजय मिळविला आणि द्विभाषिकाला धक्का दिला हें तिचें कार्य ऐतिहासिक स्वरूपाचें आहे. महागुजरात परिषदेच्या नेत्यांबरोबर वाटाघाटी करणें ही समितीची राजकीय चूक होती. कारण महागुजरात परिषदेचे नेते यशवंतरावांवर गुजरातचें मराठीकरण केल्याचे आरोप करीत होते. इतकी त्या नेत्यांची भूमिका संकुचित होती. समितीच्या प्रचारकांनीं निवडणुकीपूर्वीं आणि निवडणुकीनंतर अनेक वेळां गलिच्छ, विद्वेषी असा प्रचार केला. यामुळें समितीची प्रतिष्ठा कमी झाली. संयुक्त महाराष्ट्र समितीनें प्रतापगड येथें शिवस्मारकाचें उद्घाटन पं. नेहरू यांच्या हस्तें होणार म्हणून जीं निदर्शनें केलीं त्या निदर्शनांनाहि कांहीं तात्त्विक भूमिका नव्हती. या प्रतापगड प्रकरणानें महाराष्ट्रांत जातीयवादाचें भूत निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला. हें भूत कॉंग्रेस उठवीत होती असें म्हटलें तरी त्याला समितीनेंच संधि दिली हें नाकारतां येणार नाहीं. यशवंतराव आणि एस्. एम्. जोशी यांच्या संयमी नेतृत्वामुळेंच त्या वेळीं अनर्थ होण्याचें टळलें. द्विभाषिकाविरुद्ध महाराष्ट्र आणि गुजरातमध्यें जो असंतोष निर्माण झाला होता त्यामुळें द्विभाषिक राज्य आपल्या अवजड भारानेंच कोसळून पडणार अशी निश्चिति निर्माण झाली. त्या वेळीं समितीनें केलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे बेळगांव-कारवारचा सीमा लढा ही होय. सीमा लढा हा एस्. एम्. जोशी यांच्या नेतृत्वांतील द्रष्टेपणाचा भाग आहे. समितींतील अनेक नेत्यांना सीमा लढ्याबद्दल उत्साह नव्हता. कॉ. डांगे यांचा सीमा लढ्याला विरोधच

होता. पण तरीहि हा लढा निदर्शनें, सत्याग्रह या अवस्था संपवून साराबंदीच्या रूपानें चालू आहे. अखेर हा प्रश्न वाटाघाटींनीं सोडवायचा असला तरी म्हैसूर सरकारच्या दुराग्रही धोरणाला अशा जिद्दीच्या लढ्याशिवाय पायबंद बसणें शक्य नव्हतें. बेळगांव-कारवारचा सीमा प्रश्न सुटल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्र पूर्ण झाला असें म्हणतां येणार नाहीं. संयुक्त महाराष्ट्राला सीमा प्रश्नाच्या अपूर्णतेचें गालबोट लागून राहिलें तर तें पुसून टाकण्याची जबाबदारी महाराष्ट्राच्या नेत्यांवरच राहील.

## एस्. एम्. जोशींचें यशस्वी नेतृत्व

संयुक्त महाराष्ट्र समितीचे कांहीं प्रचारक विद्वेषी आणि भडक प्रचार करीत होते. त्याची कांहीं आवश्यकता नव्हती. पण संयुक्त महाराष्ट्र समितींत राजकीय पक्षांच्या डावपेचांना ऊत येऊं लागला तसतसें महाराष्ट्राची जिद्द हें समितीचें स्वरूप मलीन होऊं लागलें. अशा वेळीं एस्. एम्. जोशी यांच्या नेतृत्वानें या प्रश्नाला एक नवी कलाटणी दिली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितींत यशवंतराव चव्हाण यांनीं पुढाकार घ्यावा आणि त्यांनीं पुढाकार घेऊन संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति झाली तर पुढच्या निवडणुकीपर्यंत त्यांच्या मंत्रिमंडळाला आपण पाठिंबा देऊं असें त्यांनीं वैयक्तिक मत मुंबई विधानसभेंत जाहीर केलें. संयुक्त महाराष्ट्राच्याच प्रश्नावर विरोधी सदस्य निवडून आले आहेत, तेव्हां या प्रश्नावरच त्यांच्या ध्येयनिष्ठेला उजळा देऊन संयुक्त महाराष्ट्राचा मार्ग खुला करण्याचें कार्य एस्. एम्. जोशी यांच्या या घोषणेनें केलें. या ध्येयनिष्ठेमुळें संयुक्त महाराष्ट्र समितींत एस्. एम्. जोशींच्या नेतृत्वाविरुद्ध डावपेंच टाकून त्यांना बदनाम करण्याचे प्रयत्न सुरू झाले. समितीच्या संयुक्त आघाडीच्या राजकारणाची ही अपरिहार्य परिणति होती. समिति हें संयुक्त महाराष्ट्राच्या जिद्दीचें प्रतीक न राहतां राजकीय पक्षांच्या डावपेंचाचें क्षेत्र झालें. एस्. एम्. जोशी यांनीं अपरिहार्यपणें स्वीकारलेला संयुक्त आघाडीचा प्रयोग फसल्यासारखा झाला आहे. पण एस्. एम्. जोशींचें नेतृत्व यशस्वी झालें आहे. कारण मराठी लोकांची जिद्द दाखवून संयुक्त महाराष्ट्र निर्माण करणें एवढेंच त्या नेतृत्वाचें ऐतिहासिक कार्य होतें.

## संयुक्त महाराष्ट्राचा जयजयकार

आणि यशवंतराव चव्हाण यांनीं तितक्याच अपरिहार्यपणें स्वीकारलेला द्विभाषिकाचा प्रयोग अयशस्वी झाला; पण त्यांचें संयमी आणि धीरोदात्त नेतृत्व यशस्वी झालें. कारभाराच्या दृष्टीनें द्विभाषिक यशस्वी झालें ही गोष्ट सर्वांनींच कबूल केली आहे आणि हा यशवंतरावांचा वैयक्तिक विजय आहे. त्यांनीं गेलीं तीन वर्षे ज्या मुत्सद्देगिरीनें, लोकशाही वृत्तीनें आणि कौशल्यानें द्विभाषिकाचा कारभार चालविला त्यामुळें पं. नेहरूंचा विश्वास त्यांनीं संपादिला. मुंबईचा कारभार पूर्वीपेक्षां उत्तम चालला आहे असें जाहीरपणें सांगून नेहरूंनीं त्यांचा गौरव केला. यशवंतरावांनीं विरोधकांचाहि विश्वास संपादन केला. महाराष्ट्रांत मुंबई जाण्याला ज्यांचा विरोध होता त्यांचीहि आपल्या कर्तृत्वानें खात्री पटविली. पं. नेहरूंनींच द्विभाषिकाचा फेरविचार करण्याच्या प्रश्नास स्वतः चालना दिली आणि यशवंतरावांच्या हातून संयुक्त महाराष्ट्राचा अरुणोदय झाला. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या रूपानें निर्माण झालेली महाराष्ट्राची जिद्द आणि यशवंतराव चव्हाण यांच्या रूपानें व्यक्त झालेलें महाराष्ट्राचें तत्त्वनिष्ठ आणि मुत्सद्दी नेतृत्व विजयी झालें. अशा दोन विरोधी प्रक्रिया परस्परांना पूरक झाल्या आणि संयुक्त महाराष्ट्राचा अरुणोदय झाला आहे. महाराष्ट्राच्या भाग्योदयाची ही ललकारी आहे. म्हणून आपण संयुक्त महाराष्ट्राचा जयजयकार करीत आहोंत.

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक .. ... ... ....... नों: दि: ... .. . ...

## बेळगांव कारवारचा सीमा-प्रश्न : : ३

बेळगांव-कारवारचा सीमा-प्रश्न सुटल्याखेरीज महाराष्ट्र राज्याची पूर्तता झाली असें कोणताहि मराठी माणूस मानणार नाहीं. महाराष्ट्राच्या मनाची ही धारणा आहे; आणि महाराष्ट्र सरकारचीहि तीच दृष्टि आहे. खुद्द या सीमा भागांतील जनतेनें तर महाराष्ट्र राज्यांत येण्यासाठीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त चालविली आहे. सत्याग्रह, निदर्शनें, निवडणुका, साराबंदी अशा एकापेक्षां एक प्रभावी मार्गांचा अवलंब करून आपलें मत या जनतेनें वारंवार जाहीर केलें आहे. एक दोन दिवस नव्हे तर गेलीं पांच वर्षें या सीमा भागांत तंग वातावरण आहे; आणि या भागाला न्याय मिळेपर्यंत हें वातावरण शांत होण्याची बिलकूल आशा नाहीं.

### महाराष्ट्राची न्याय्य मागणी

पण हा न्याय मिळणार कसा ? तसें म्हटलें तर बेळगांव-कारवारचा प्रश्न तसा बिकट आहे असें नाहीं. उलट तो अगदीं साधा प्रश्न आहे. सीमा भागांतील लोकांची आणि महाराष्ट्राची मागणी काय आहे ? महाराष्ट्राला लागून असलेला बहुसंख्य मराठी भाषिक मुलूख आहे, तो खेड्यागणिक तपासणी करून महाराष्ट्रांत सामील करावा. जसा महाराष्ट्राला लागून असलेला मराठी मुलूख आम्ही मागत आहोंत तसाच कर्नाटकाला लागून असलेला पण महाराष्ट्रांत समाविष्ट झालेला कानडी मुलूखहि म्हैसूरनें घ्यावा अशी आमची मागणी आहे. इतकी सरळ आणि न्याय्य मागणी कोणती असूं शकेल ? पण कितीहि साधा आणि सरळ प्रश्न असला तरी तो अत्यंत बिकट करून ठेवण्याचें आपल्या नेत्यांचें कसब मोठें अलौकिक आहे. यामुळें हा प्रश्न कसा सुटेल, कधीं सुटेल, हें कोणीच सांगूं शकत नाहीं अशी मोठी विलक्षण परिस्थिति या प्रश्नाबाबत निर्माण झाली आहे.

लोकशाहींत लोकांची इच्छा प्रमाण असते. आणि सीमा भागांतील लोकांची इच्छा नुसती न्याय्यच नव्हे तर पूर्णपणें व्यवहार्यहि आहे आणि ती हरतऱ्हांनीं त्यांनीं राज्यकर्त्यांना पटवून देण्याची शिकस्त केली आहे. पंतप्रधान पं. नेहरूंना या सीमा भागांतील मराठी जनतेचें शिष्टमंडळ भेटलें

आणि त्यानें आपली बाजू त्यांना समजावून सांगितली तेव्हां पं. नेहरू म्हणाले, तुमची बाजू जोरदार आहे. गृहमंत्री पं. पंतांसमोर ही बाजू मांडण्यांत आली तेव्हां हा प्रश्न सोडवला पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. मुंबई आणि म्हैसूर राज्यांच्या झोनल कौन्सिलमध्यें हा सीमा-प्रश्न सोडविला जाईल असें त्यांनीं वारंवार आश्वासन दिलें. पण गेलीं चार वर्षें झोनल कौन्सिलमध्यें या सीमा प्रश्नाचें घोंगडें नुसतें भिजत पडलें आहे. आपण कितीहि पत्रें पाठविलीं तरी म्हैसूरचे मुख्यमंत्री जत्ती दादच देत नाहींत असें पं. पंत म्हणतात! जत्ती एवढे सामर्थ्यशाली पुरुष खरोखरच असतील तर त्यांनाच भारताचें गृहमंत्रिपद द्यावें असें म्हणण्याचा मोह कोणालाहि होईल! केंद्र सरकारच्या या कालहरण करण्याच्या वृत्तीमुळें हा साधा आणि सरळ प्रश्न एकसारखा चिघळत आहे!

## मराठी मुत्सद्द्यांचें सीमा-प्रश्नाबाबत दुर्लक्ष

एका अर्थीं हा प्रश्न साधा नाहींहि! कारण या प्रश्नाचीं मुळें तीस चाळीस वर्षांइतकीं इतिहासांत खोल गेलेलीं आहेत; आणि गेल्या पंधरा वर्षांत हा प्रश्न पद्धतशीरपणें बिकट करण्यांत आलेला आहे. महाराष्ट्राचा हा मुलूख छिनून घेऊन कर्नाटकांत कोंबण्याचे एकामागून एक कटच रचण्यांत आले आहेत. कॉंग्रेस पक्षाच्या आणि सरकारच्या निरनिराळ्या पातळ्यांवर हीं कारस्थानें कशीं रचण्यांत आलीं आणि त्यांत मोठमोठ्या स्थानांवरच्या व्यक्ति कशा गुंतत गेल्या हें पाहिलें म्हणजे संताप आणि चीड उसळून येते; आणि राजकारणांतील क्षुद्रता आणि दुष्टपणा पाहून शरम वाटते. एकूण मराठी मुत्सद्द्यांबद्दल बोलायचें तर त्यांना हीं कारस्थानें आकलन झालीं नाहींत असें तरी म्हटलें पाहिजे; त्यामुळें त्यांनीं या प्रश्नाकडे पूर्वींपासूनच जें विशेष लक्ष द्यायला हवें होतें तें दिलें नाहीं. किंवा असेंहि म्हणतां येईल कीं, मराठी मुत्सद्दी मुंबई राज्यांत मंत्री झाले तरीहि ते या प्रश्नापुरते अगतिक होते.

महाराष्ट्राची ही दक्षिण सीमा नैसर्गिकरीत्या स्पष्ट नाहीं; म्हणजे महाराष्ट्र आणि कर्नाटक यांना वेगळें दाखविणारा एखादा पर्वत किंवा मोठी नदी येथें नाहीं. पण असें असलें तरी ढोबळपणें मराठी आणि कानडी प्रदेश

दाखविणारी भौगोलिक रचना येथें उपलब्धच नाहीं असें मात्र नाहीं. आज म्हैसूरमध्यें समाविष्ट झालेला जो मराठी प्रदेश आम्ही मागतों तो कानडी मुलखापेक्षां वेगळा आहे हें दृष्टीलाहि दिसेल. महाराष्ट्राची भूरचना काळ्या प्रस्तराच्या प्रदेशाची आहे. तोच प्रदेश या मराठी मुलखांतहि दिसेल. घाटमाथ्यावरून पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे गेलेला हा मराठी मुलूख डोंगराळ आहे, उंच सखल आहे. उलट शेजारच्या कानडी मुलखाचें वैशिष्ट्य आणि व्यक्तित्वहि डोळ्यांत भरण्याइतकें स्पष्ट आहे. कानडी मुलूख सरळ आणि सपाट आहे आणि तेथें इतर कानडी मुलखाप्रमाणेंच पावसाचें प्रमाण कमी आहे !

## वेगळेपणा कायमच

महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या या नैसर्गिक भूरचनेंतील वैशिष्ट्यांपेक्षांहि या दोन प्रदेशांतील समाजरचना अधिक वैशिष्ट्यपूर्ण आणि वेगळी आहे. वसईपासून वर्ध्यापर्यंत कोणत्याहि मराठी खेड्यांत गेलें तरी तेथील समाज-रचनेंत जातिव्यवस्थेचें एकच स्वरूप आढळतें. मराठे, महार आणि ब्राह्मण या तीन प्रमुख जाती तेथें आढळतील. बेळगांव-कारवारमधील जो मराठी मुलूख आहे तेथेंहि हींच सामाजिक वैशिष्ट्यें आढळतील. कानडी मुलखां-तील समाजरचनेंत या जातींची जागा वैष्णव ब्राह्मण आणि लिंगायत यांनीं घेतलेली आढळेल. महाराष्ट्रांत इतरत्र जे पाटील आणि वतनदार आढळतात ते या बेळगांव-कारवारच्या फक्त मराठी मुलखांतहि आढळतील; आणि त्यामुळें कानडी प्रदेशापासून हा मराठी भाग सहज वेगळा काढतां येतो.

दक्षिण सीमेवरील या मराठी मुलखाची राजकीय दृष्ट्या कानडी मुलखाशीं निरगांठ घालण्याचें काम प्रथम ब्रिटिश राजवटीनें केलें. ब्रिटिशांनीं कानडी मुलूख आधींच जिंकला होता. त्यांना शेवटपर्यंत विरोध करणारा बालेकिल्ला म्हणजे बेळगांव हा होता. आधींच ब्रिटिशांच्या मनांत मराठी लोकांबद्दल अढी होती, म्हणून आपल्या कारभारासाठीं बेळगांवचा केवळ मराठी जिल्हा न करतां त्यांनीं त्यांत कांहीं कानडी मुलूख मिळवून मिश्र जिल्हा तयार केला. राज्य करण्याच्या दृष्टीनें ब्रिटिशांना ही रचना सोयिस्कर होती. या भागांतला मराठी आणि कानडी

मुलूख एका कारभाराखालीं येण्यापूर्वींहि तो एकमेकांच्या शेजारीं होताच. त्या वेळीं आणि त्यानंतरहि या मराठी आणि कानडी समाजाचें मिश्रण झालें नाहीं; ते समाज एकजीव झाले नाहींत. मराठी लोकांचे नात्याचे आणि रक्ताचे संबंध महाराष्ट्राशींच राहिले; कानडी लोकांचे कर्नाटकांत राहिले. 'कानडीनें केला मराठी भ्रतार' असा प्रकार मोठ्या प्रमाणावर कधीं झालाच नाहीं.

## महाराष्ट्राचें दक्षिण केंद्र

बेळगांव हें दक्षिण महाराष्ट्राचें सांस्कृतिक केंद्र आहे. तें जसें सांस्कृतिक केंद्र आहे, तसेंच सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराचेंहि केंद्र आहे. दक्षिण महाराष्ट्रांत कोल्हापूर हेंहि दुसरें एक केंद्र आहे. पण रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागाचा शैक्षणिक, विशेषतः आर्थिक आणि व्यापार-उद्योगाच्या दृष्टीनें, बेळगांवशीं जितका घनिष्ठ संबंध आहे, तितका तो कोल्हापूरशीं मुळींच नाहीं असें बिनदिक्कत म्हणतां येईल. दक्षिण रत्नागिरींतील लोकांचा एक मुंबई शहर वगळलें तर बेळगांवइतका दृढ आणि जिव्हाळ्याचा संबंध दुसऱ्या कोणत्याहि शहराशीं नाहीं. आंबोली घाटांतून बेळगांवचा आणि दक्षिण कोकणचा हा संबंध दीर्घकाल चालू आहे. बेळगांव जोंपर्यंत महाराष्ट्रांत येत नाहीं तोंपर्यंत या विभागाशीं असलेले बेळगांवचे संबंध ताणण्याचा आणि तोडण्याचा प्रयत्न होत राहणार आणि त्याच्या वेदना बेळगांवसकट या दक्षिण महाराष्ट्रांत उठत राहणार हें अपरिहार्य आहे.

बेळगांवची तुलना मुंबईसंबंधीं निर्माण केलेल्या वादाशीं सहज करतां येईल. मुंबई शहराला असलेल्या विशेष महत्त्वामुळें जसा मुंबईबद्दल वाद निर्माण करण्यांत आला होता आणि ताटाबरोबर कांठ जावा त्याप्रमाणें एकीकडे ठाण्यापर्यंत आणि दुसरीकडे बोरीवलीपर्यंतचीं गांवें जशीं महाराष्ट्रापासून तोडून 'बृहन्‌'मुंबईत कोंबण्यांत आलीं होतीं, तसाच प्रकार बेळगांव आणि त्याच्या आजूबाजूच्या गांवांबाबतहि करण्यांत आलेला आहे. कानडी पुढाऱ्यांना बेळगांवचें प्रलोभन वाटलें नसतें तर चंदगड तालुका ज्याप्रमाणें महाराष्ट्रांत आला तसाच खानापूर, निपाणी, बेळगांव, सुपा,

हल्याळ, कारवार या तालुक्यांतील मराठी विभागहि विर्निवादपणें महाराष्ट्रांत आला असता. पण बेळगांव पचविण्यासाठीं त्याच्या भोंवतालचा मराठी मुलूखहि गिळला पाहिजे असें कानडी नेत्यांनीं ठरविलें आणि त्यासाठीं कारस्थानें सुरू केलीं.

## 'कर्नाटक-सिंहा'चा जवडा

बेळगांवांत कानडी वर्चस्वाचें हें भूत गेल्या तीस-चाळीस वर्षांतच निर्माण करण्यांत आलें आहे. तोंपर्यंत बेळगांवांतील पुढारी हे कानडी कीं मराठी असा प्रश्नच कधीं उत्पन्न झाला नाहीं. या बेळगांवांतील कानडीवादाचा कांदा म्हणून श्री. गंगाधरराव देशपांडे यांचा उल्लेख करावा लागेल. बेळगांवच्या मुलखाचे लचके तोडून ते कर्नाटकाच्या पोटांत घालण्यांत या 'कर्नाटक-सिंहा'चा भाग मोठा आहे. पण हे 'कर्नाटक-सिंह'च नव्हेत, तर आज बेळगांव भागांत वावरणारे कर्नाटक लांडगे, कोल्हे, पुढारी हे सर्रासपणें आपले सर्व व्यवहार जाहीरपणें मराठी भाषेंतूनच चालवीत असत. बेळगांवांतच नव्हे तर हुबळी-धारवाडपर्यंत जाऊन हे 'कर्नाटक' पुढारी मराठी भाषेंतूनच व्याख्यानें देत असत. विशेषतः 'कर्नाटक-सिंहां'बद्दल सांगायचें तर त्यांची मराठींतील उत्तम वक्त्यांत गणना करावी लागेल. या 'कर्नाटक-सिंह' गंगाधररावांनीं आपल्या आत्मचरित्राच्या कांहीं प्रकरणांचें लेखन केलें असून तें आत्मचरित्र त्यांच्या जुन्या मित्रमंडळींत खाजगी रीतीनें वाचनासाठीं फिरविण्यांत आलें आहे. सांगायची गोष्ट अशी कीं, 'कर्नाटक-सिंहा'चें हें आत्मचरित्र शुद्ध मराठी भाषेंत आहे !

'कर्नाटक-सिंहा'नें पुढें बेळगांवांत कानडी-मराठी वाद सुरू केला तो स्वतःचें पुढारीपण टिकविण्यासाठींच. हा वाद वाढला, पण 'कर्नाटक-सिंहा'चें पुढारीपण मात्र या वादांत निकालांत निघालें. तें पुढारीपण आतां ऐतिहासिक बाब राहिली आहे. पण केवळ या पुढाऱ्यांना कानडी-मराठी वाद निर्माण करून बेळगांवचा प्रश्न इतका बिकट करतां आला नसता. हा प्रश्न बिकट होण्यास कांहीं ऐतिहासिक कारणें आहेत; आणि मराठी लोकांच्या चुकाहि कारण आहेत. बेळगांवच्या प्रश्नाचा श्रीगणेशा

कॉंग्रेसनें १९२० सालीं आपल्या संघटनेची भाषावार पुनर्रचना केली तेव्हांपासून झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कॉंग्रेस संघटनेची ही त्या वेळची पुनर्रचना मुंबईत जशी महाराष्ट्राला नडली तशीच बेळगांवाबाबतहि ती अजून उपद्रव देत आहे.

## ऐतिहासिक आपत्ति

त्या वेळीं बेळगांव जिल्ह्याचा समावेश मुंबई राज्यांतील कर्नाटक प्रांतिक कॉंग्रेसमध्यें करण्यांत आला. मुंबई इलाख्यांत त्या वेळीं गुजराती, मराठी आणि कानडी असे तीन भाषांचे लोक राहात होते. त्या वेळीं मुंबई इलाख्यांतल्या कानडी लोकांची जी कर्नाटक प्रदेश कॉंग्रेस कमिटी निर्माण करण्यांत आली तींत बेळगांव जिल्ह्याचा जो समावेश झाला तो कांहीं दुष्टपणानें झाला असें दिसत नाहीं; नाइलाजानें झाला असें दिसतें. त्या वेळीं बेळगांव जिल्हा महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीच्या अधिकारक्षेत्रांत घालण्याची कांहीं सोयच नव्हती. कारण महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीचें अधिकारक्षेत्र आणि बेळगांव जिल्हा यांच्यामध्यें कोल्हापूर, सांगली, मिरज वगैरे संस्थानी मुलूख होता; आणि संस्थानें कॉंग्रेसच्या संघटनेंत नव्हतीं. त्यामुळें बेळगांव जिल्हा कर्नाटक कॉंग्रेसमध्यें घुसवणें अपरिहार्य होतें.

याबरोबरच ही गोष्टहि लक्षांत ठेवली पाहिजे कीं, बेळगांवचा समावेश कर्नाटकांत करण्यासाठीं कानडी पुढारी आटोकाट प्रयत्न करीत होते. मराठी पुढाऱ्यांना तो प्रश्न दुय्यम वाटत होता. त्यांचें लक्ष स्वराज्यावर केंद्रित झालें होतें. स्वराज्यांत हे प्रश्न चटकन् सुटतील असेंहि त्यांना वाटलें असावें. त्या वेळीं स्वराज्याची चळवळ हीच प्रमुख होती. त्या चळवळीचें साधन म्हणून कॉंग्रेस संघटना, आणि त्या संघटनेची सोय म्हणून बेळगांव जिल्ह्याचा कर्नाटक कॉंग्रेसमध्यें समावेश, अशी विचाराची परंपरा होती. सगळेच विचार करणारे कॉंग्रेसच्या बाजूचे होते. त्यामुळें बेळगांवच्या प्रश्नावर भांडण होऊन कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांत फाटाफूट होऊं नये म्हणून सगळ्यांनीं जपत राहावें अशी त्या वेळीं एकूण महाराष्ट्राची मनःस्थिति होती. अशा या मनःस्थितींतच १९२९ सालीं बेळगांव येथील मराठी साहित्य संमेलनाच्या वेळीं बेळगांवचा कर्नाटकांत समावेश करण्याचा

काँग्रेसचा जो निर्णय आहे त्याला आमचा विरोध नाहीं असला अदूरदर्शी 'जाहीर खुलासा' मराठी साहित्यिकांनीं आपल्या सहीनें केला असावा. या 'जाहीर खुलाशा'वर अदूरदर्शीपणानें सह्या ठोकणारे मराठी साहित्यिक पुढारी आणि हा खुलासा मिळविणारे धूर्त 'कर्नाटक-सिंह' यांच्या मनोवृत्तींतील फरक अधिक स्पष्ट करण्याचें कारण नाहीं.

## आणखी एक घोडचूक

मराठी लोकांचा अदूरदर्शीपणा येथेंच थांबलेला नाहीं. बेळगांवचा कर्नाटक काँग्रेसमध्यें झालेला समावेश बिलकूल नामंजूर असलेली आणि त्याला कट्टर विरोध करणारी मंडळी बेळगांव जिल्ह्यांत फक्त ब्राह्मणेतर पक्षाची होती. ही मंडळी अजूनहि बहुंशीं काँग्रेस पक्षाच्या बाहेरच आहे. काँग्रेसच्या बाहेर राहून काँग्रेस संघटनेबद्दलच्या व्यवस्थेला विरोध करण्यांत भिंतीवर डोकें आपटीत राहण्याइतकाच शहाणपणा होता. पण परिस्थिति सारखी बदलत राहिली तरी मराठी लोकांनीं हा आपला दीडशहाणपणा कधीं सोडला नाहीं. परिणाम असा झाला कीं, बेळगांव जिल्हा काँग्रेसवर कानडी लोकांची पकड सतत वाढतच गेली. मुंबई शहरांतहि असेंच झालें होतें. महाराष्ट्राला मुंबई शहर हवें होतें. पण मुंबईच्या काँग्रेसमध्यें शिरून ती काबीज करावी असा विचार मुंबईच्या मराठी लोकांना कधीं सुचला नाहीं. मुंबईत यामुळें जेवढें महाराष्ट्राचें नुकसान झालें त्यापेक्षां या वृत्तीमुळें बेळगांव जिल्ह्यांत अधिक नुकसान झालें आहे.

बेळगांव-कारवार जिल्ह्यांतील मराठी लोकांनीं काँग्रेस संघटनेची सतत उपेक्षा करण्याऐवजीं काँग्रेस काबीज करण्याचें धोरण गेल्या पंधरावीस वर्षांत जर अंमलांत आणलें असतें तर कदाचित् या प्रश्नाला वेगळें वळण लागलें असतें. कदाचित् म्हणण्याचें कारण असें कीं, १९४६ सालापासून कर्नाटक काँग्रेसला महाराष्ट्र काँग्रेसपासून फोडण्याचें आणि त्यासाठीं कर्नाटकाला बेळगांव-कारवारची लांच देण्याचें कारस्थान मुंबईत राज्यकर्त्या पुढाऱ्यांच्या पातळीवरून शिजूं लागलें होतें. त्यामुळें बेळगांव-कारवार जिल्हा-काँग्रेस काबीज करून कर्नाटक काँग्रेसला शह देणें मराठी लोकांना कितपत शक्य झालें असतें हा मुद्दा विवाद्यच समजला पाहिजे.

बेळगांव-कारवार जिल्ह्यांसकट कर्नाटक काँग्रेस निर्माण झाली. १९२४ सालीं बेळगांव येथें अ. भा. काँग्रेसचें अधिवेशन भरलें. महात्मा गांधी या काँग्रेसचे अध्यक्ष होते. हें अधिवेशन गाजणें अपरिहार्यच होतें. त्याच-बरोबर बेळगांव कर्नाटकाचें हा अपसमजहि गाजला. कारण हें काँग्रेसचें अधिवेशन कर्नाटक काँग्रेसच्या विद्यमानें भरविण्यांत आलें होतें. ब्रिटिशांच्या राज्यकाभाराचे मुंबई इलाख्यांतील कानडी जिल्हे म्हणून विजापूर, धारवाड बरोबर बेळगांवचेंहि नांव मुळें भूगोलांत घोकीत होतीं. काँग्रेसच्या कारभारानें काँग्रेसचें राज्य येण्यापूर्वींहि या घोकण्यांत कांहीं बदल झाला नाहीं; आणि मुंबईंत काँग्रेसचें राज्य आल्यानंतर अशीच घोकंपट्टी सुरू राहावी अशी जणूं कांहीं दक्षताच घेतली जाऊं लागली.

## खेरांचे उद्योग

१९४६ सालापर्यंत बेळगांव भागांत कानडी वर्चस्वाची स्पर्धा सुरू होती. पण ती स्थानिक किंवा कानडी आणि मराठी लोकांचा वाद होता. १९४६ सालीं स्वराज्य समोर दिसूं लागलें. खुद्द बेळगांवांतच महाराष्ट्र साहित्य संमेलनानें संयुक्त महाराष्ट्राचा पुकारा केला. त्यामुळें उत्तरेला मुंबई महाराष्ट्रांत जाणार अशी गुर्जर राजकारणी पुरुषांना धडकी बसली; आणि बेळगांव हातचें जाईल अशी धास्ती कानडी लोकांना वाटूं लागली. संयुक्त महाराष्ट्राची मागणी महाराष्ट्रांत भराभर लोकप्रिय होत होती; आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीबद्दल काडीमात्र आपुलकी नसलेले श्री. बाळासाहेब खेर हे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. बेळगांव सीमा-भागांत मराठीची गळचेपी करणारीं आणि कानड्यांना चिथावणी देणारीं जीं कृत्यें खेरांनीं आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दींत केलीं तीं खरोखर गर्हणीय आहेत.

खेरांना त्यांच्या या दुष्कृत्यांत साथ करण्यास राज्ययंत्रांतहि एखादा मृतात्मा महाराष्ट्रीय भेटला असला तर त्यांत आश्चर्य नाहीं. या मृतात्म्याला आणि खेरांना स्फूर्ति देण्याचें कार्य गुर्जर राजकारण्यांनीं केलें. १९४६ सालीं श्री. व्यंकटराव पवार यांनीं मुंबई विधानमंडळांत संयुक्त महाराष्ट्राचा ठराव आणला. या ठरावाला गुर्जरांनीं विरोध केला; कानडी तटस्थ

राहिले आणि मराठी बहुमतानें ठराव मंजूर झाला. मराठी बहुमताचा ‘धोका’ आणि कानडी मतांचे मराठी लोकांना शह देण्याच्या दृष्टीनें असलेलें महत्त्व गुर्जर मुत्सद्द्यांच्या मनावर या प्रकारानें पुरतें बिंबलें. मुंबई महाराष्ट्राला देण्यास कानडी लोकांनींहि विरोध करावा म्हणून त्यांना हवा असलेला बेळगांव-कारवारचा भाग त्यांना देऊन टाकण्याचें धोरण आंखण्यांत आलें. हें धोरण आंखण्यांत सुरुवातीला मोरारजी देसाई यांचा हात नसावा. सरदारांच्या चाणक्य बुद्धींतूनच हें धोरण प्रकटलें असावें. पण खेर आणि मोरारजी यांनीं आपापल्या अमदानींत या धोरणाची शंभर टक्के अंमलबजावणी केली.

## हिरे यांची अगतिकता

खेर-मोरारजी महाराष्ट्र-हिताचा बळी देण्याचें धोरण अंमलांत आणीत असतांना महाराष्ट्र कॉंग्रेसचे नेते कसे अगतिक झाले होते हें पाहण्यासारखें आहे. कै. केशवराव जेधे यांनीं कॉंग्रेस सोडली आणि शे. का. पक्ष निर्माण झाला. या वेळीं महाराष्ट्र कॉंग्रेसचे नेते म्हणून श्री. भाऊसाहेब हिरे प्रतिष्ठित झाले होते. त्यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचाराचा तडाखा चालविला होता. साहजिकच बेळगांव-कारवारच्या या दक्षिण सीमेवरहि त्यांनीं दौरा केला. दक्षिण भागाचा प्रश्न त्यांना समजला होता असेंहि त्यांच्या एका वक्तव्यावरून त्या वेळीं वाटलें. ते म्हणाले होते कीं, ज्यांच्या हातीं सत्ता आहे त्यांना आपल्या राज्यांत तरी कारभाराचे विभाग भाषिक तत्त्वावर करतां येतील. म्हणजे बेळगांव-कारवारसारखे जे द्विभाषिक जिल्हे असतील त्यांचे मराठी-कानडी असे स्वतंत्र भाग करावे; आणि ही गोष्ट राज्य सरकारच्या अधिकार-कक्षेंतच होती. पण भाऊसाहेब हें बोलले त्या वेळीं ते मंत्री नव्हते. पुढें १९५२ मध्यें ते मंत्री झाले, इतकेंच नव्हे तर महसूल-मंत्रीच झाले. पण तरीहि त्यांना या द्विभाषिक जिल्ह्यांची महसुलाच्या दृष्टीनेंहि भाषिक विभागणी करतां आली नाहीं. त्यांच्या कारकीर्दींत या सीमाभागाचें दुर्दैव वाढतच गेलें !

बेळगांव-कारवार हे जिल्हे प्रथमपासून द्विभाषिक म्हणूनच मानले गेलेले होते. खेर-मोरारजींच्या कारकीर्दींत त्यांच्या द्विभाषिक स्वरूपाकडे

दुर्लक्ष करून त्यांच्यावर कानडी शिक्का ठोकण्याचे प्रयत्न झाले. खैर-मोरारजी सरकारनेंहि मुंबई राज्याची भाषिक विभागणी केली. पण बेळगांव-कारवार जिल्ह्यांना कर्नाटकाचा भाग ठरवून केली! कर्नाटक विद्यापीठाची स्थापना करून हे दोन्ही जिल्हे त्या कर्नाटक विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रांत आणले. विजापूर-धारवाडबरोबर बेळगांव-कारवार या जिल्ह्यांचा कर्नाटक विभाग ठरवून सरकारी खातीं आणि संस्था यांचा कारभार या विभागापुरतां वेगळा कानडी स्वरूपाचा केला! जिल्हा लोकल बोर्डें कानडी झालीं आणि मराठी विभागाची संपूर्ण उपेक्षा झाली. पण मोरारजींनीं कमाल केली ती बेळगांव नगरपालिकेला मराठीबरोबर आपला कारभार कानडी भाषेंतहि चालविण्याचा हुकूम सोडून! बेळगांव नगरपालिकेनें हा हुकूम मानला नाहीं तर ती रद्द करण्याचीहि धमकी देण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं!

## मुंबई सरकारचा कट

बेळगाव नगरपालिकेचा कारभार गेलीं शंभर वर्षें फक्त मराठी भाषेंतच चाललेला आहे. नगरपालिकेचे ७५ टक्क्यांपेक्षां अधिक सभासद मराठी आहेत; पूर्वींहि असेच होते. तरीहि कारभार मराठींतून चालला, दप्तर मराठी भाषेंतच राहिलें. याचा अर्थ कानडी सभासदांनाहि मराठी समजत होतें. बेळगांव जिल्ह्यांत कांहीं कानडी गांवें आल्यामुळें तो द्विभाषिक जिल्हा असला तरी बेळगांव शहर केव्हांच द्विभाषिक नव्हतें, तें मराठीच होतें. पण बेळगाव शहराचा कारभार केवळ मराठी भाषेंत राहिला तर त्यामुळें बेळगांव जिल्हा कानडी ठरविण्याच्या कटाला तेवढा बाध येत होता. म्हणून मोरारजींची ती धडपड होती!

बेळगांव-कारवार जिल्ह्यातील पांच लक्ष मराठी भाषिकांची पद्धतशीर गळचेपी करण्यात केंद्र सरकारांतील नभोवाणी खातें केसकरांच्या पूर्वींहि कंबर कसून होतें. कै. पुरुषोत्तम मंगेश लाडांनीं नभोवाणीवर कोंकणी 'भाषा' घुसविण्याचा कट केसकरांच्या हातून पार पाडला तो प्रकार त्यानंतरचा. त्यापूर्वीं रंगराव दिवाकरांकडे नभोवाणी खातें असतांना विजापूर, धारवाड, बेळगांव, कारवारसाठीं धारवाडला नभोवाणीचें

कानडीसाठीं केंद्र उघडण्यांत आलें. पण त्या केंद्रावर कधींहि मराठी कार्यक्रम झालेला नाहीं. बेळगांव-कारवारमधील पांच लक्ष मराठी लोकांचा नभोवाणीशीं जणूं कांहीं संबंधच नाहीं. मुंबई सरकारनें याबद्दल कधीं तक्रार केली नाहीं, कारण बेळगांव-कारवारचें कानडीकरण करण्याच्या कटांत मुंबई सरकार सामीलच होतें! मुंबई सरकारनें स्टेट ट्रान्स्पोर्ट कार्पोरेशन सुरू केलें. एस्. टी. च्या विभागांना इतरत्र जिल्ह्यांचीं नांवें होतीं. रत्नागिरी डिव्हिजन, पुणें डिव्हिजन अशीं. पण बेळगांवच्या डिव्हिजनला मात्र नांव देण्यांत आलें 'कर्नाटक डिव्हिजन'. हा कटच नव्हे तर काय?

## कर्नाटक विद्यापीठाचा अत्याचार

बेळगांवच्या राणी पार्वतीदेवी कॉलेजबाबत कर्नाटक विद्यापीठाच्या संदर्भांत जो अन्याय मुंबई सरकारनें केला तो जितका क्रूर तितकाच घृणास्पद आहे; आणि हा अन्याय करतांना खेरांनीं जी हातचलाखी केली तिला दुष्टपणाशिवाय दुसरें नांव देणें कठीणच आहे. मुंबई सरकारनें प्रथम पुणें विद्यापीठ निर्माण केलें. पण त्या विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रांतून बेळगांव-कारवारला वगळलें. अर्थात्‌च राणी पार्वतीदेवी कॉलेजला प्रयत्न करूनहि पुणें विद्यापीठाला त्या वेळीं जोडून देण्याचें नाकारण्यांत आलें. पुढें कर्नाटक विद्यापीठाची स्थापना करण्यांत आली. त्या वेळीं राणी पार्वतीदेवी कॉलेजचा प्रश्न निघाला. हें कॉलेज कर्नाटक विद्यापीठांत कोंबण्यांत येईल अशी खात्री पटली असती तर मराठी आमदारांनीं हें विद्यापीठाचें विधेयक मंजूर होऊं दिलें नसतें. म्हणून मुख्यमंत्री खेर यांनीं अशी हातचलाखी केली कीं, या विधेयकांत विभाग पांचमध्यें केलेल्या तरतुदीप्रमाणें या विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रांतील एखादी संस्था दुसऱ्या विद्यापीठाला जोडतां येईल. प्रत्यक्ष विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर या पांचव्या सेक्शनमधील अधिकाराचा उपयोग करण्यांत येईल असेंहि खेरांनीं विधिमंडळांत आश्वासन दिलें!

पुढें कर्नाटक विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर पार्वतीदेवी कॉलेजनें पुणें विद्यापीठाला जोडण्याची मागणी केली तेव्हां पुणें विद्यापीठानें मराठी

माध्यम स्वीकारल्यावर किंवा कर्नाटक विद्यापीठानें कानडी माध्यम केल्यावर अर्जाचा विचार होईल असें उत्तर देण्यांत आलें. पुणें विद्यापीठानें मराठी माध्यम सुरू केलें तेव्हां पार्वतीदेवी कॉलेजच्या अर्जाला उत्तर देण्यांत आलें कीं, कर्नाटक विद्यापीठाचें माध्यम अजून इंग्रजीच आहे! म्हणजे मूळपासूनच बनवाबनवी आणि फसवेगिरी करण्याचेंच खेरांनीं ठरविलें होतें. बेळगांव बिनबोभाट कर्नाटकाला मिळावें हाच यांतला हेतु होता. जेव्हां कधीं मुंबई राज्याच्या विभाजनाचा प्रश्न येईल त्या वेळीं मुंबई महाराष्ट्रांतून वेगळी काढण्यास कर्नाटकी आमदारांचा पाठिंबा मिळावा म्हणून त्यांना ही बेळगांव-कारवारमधील मराठी मुलखाची लांच देऊं केलेली होती. कर्नाटक कॉंग्रेसनें ही लांच मनोभावें स्वीकारली; आणि मुंबई स्वतंत्र ठेवावी, कोयना धरणाचें काम हातीं घेऊं नये, अशा अर्थाचे ठरावहि कर्नाटक कॉंग्रेसनें मंजूर केले! मुंबई सरकारच्या विद्यमानें मुंबई कॉंग्रेस, गुजरात कॉंग्रेस आणि कर्नाटक कॉंग्रेस यांनीं महाराष्ट्राविरुद्ध कट केला होता हेंच यावरून सिद्ध होतें.

## कारस्थानाचें नवें पर्व

बेळगांव-कारवारबाबत महाराष्ट्रविरोधी कटाचें पुढचें प्रकरण राज्यपुनर्रचना मंडळाबरोबर सुरू झालें. महाराष्ट्रापासून विदर्भ वेगळा काढण्याचे आणि गुजरात-महाराष्ट्राचें ' समतोल ' द्विभाषिक बनविण्याचें कारस्थान या पुनर्रचना मंडळाला जसें मुंबईत पढविण्यांत आलें, तसेंच बेळगांव-कारवार कर्नाटकांत कोंबण्याचा कटहि मुंबईतच शिजवून तो या पुनर्रचना मंडळाच्या स्वाधीन करण्यांत आला असला पाहिजे यांत कांहीं शंका नाहीं. पुनर्रचना मंडळानें या कटांतील आपली कामगिरी तंतोतंत पार पाडली; आणि ती पार पाडण्यास स्वतःचीं अशीं कांहीं कारणेंहि सांगितलीं! पुनर्रचना मंडळाच्या अहवालांत मराठी लोकांची निंदा-नालस्ती आहे तर कानडी लोकांची मनधरणी आहे! कर्नाटकाचा बेल्लारी जिल्हा आंध्राला द्यावयाचा होता आणि या बेल्लारीच्या बदल्यांत कर्नाटकाला बेळगांव-कारवारच्या मराठी मुलखाचें दान देऊन पुनर्रचना मंडळ कर्नाटकाचें सांतवन करीत होतें. पुनर्रचना मंडळानें स्पष्ट म्हटलेंच आहे कीं, ' कर्नाटक राज्यांत

कोलार जिल्हा कायम ठेवणें आणि जोडीला बेळगांव जिल्ह्यांतील मोठा भाग कर्नाटकांत ठेवणें हें आमच्या मतें बेल्लारी जिल्ह्याचा पूर्वभाग देण्यापेक्षां कर्नाटकाच्या अधिक हिताचें आहे !

## पुनर्रचना मंडळाची चलाखी

बेळगांव जिल्ह्यांतील चंदगड तालुका वेगळा काढून तो महाराष्ट्राला जोडावा असें पुनर्रचना मंडळानें ठरविलें. पण बेळगांवचा बाकीचा मराठी भाग कर्नाटकांत घालण्यासाठीं युक्तिवादाची जी कसरत पुनर्रचना मंडळानें केली आहे ती एका बाजूनें जितकी केविलवाणी आहे तितकीच दुसऱ्या बाजूनें लबाडीचीहि आहे. पुनर्रचना मंडळ म्हणतें, "खानापूर आणि बेळगांव तालुक्यांतील मराठी भाषिकांची बहुसंख्या किंचित् म्हणजे अनुक्रमें ५३·९ आणि ५१·४ इतकी आहे. बाकीच्या सात तालुक्यांपैकीं सहा तालुके भरदार कानडी बहुसंख्येचे आहेत. तर उरलेल्या चिकोडी तालुक्यांत कानडी भाषिक हा सर्वांत मोठा गट आहे. बेळगांव जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांचे आर्थिक संबंध मराठी आणि कानडी दोन्ही भागांशीं आहेत. बेळगांव शहर हें या भागांतील व्यापारी रहदारीचें केंद्र आहे. येथें मुख्य व्यापारी वाहतूक कापसाची आणि गळिताच्या धान्यांची होते. तथापि, बेळगांव शहर किंवा इतर वादग्रस्त भाग यांचा मुंबई राज्यांतील मराठी भागाशीं विशेष तऱ्हेचा असा खास आर्थिक संबंध नाहीं."

पुनर्रचना मंडळानें या युक्तिवादांत केलेली हातचलाखी स्पष्टच आहे. बेळगांव आणि खानापूर तालुक्यांत मराठी भाषिक अनुक्रमें ५३·९ आणि ५१·४ इतके असूनहि ती किंचित् बहुसंख्या आहे असें या मंडळाला वाटतें. पण तेंच चिकोडी तालुक्यांत ४६ टक्के कानडी भाषिक हा सर्वांत मोठा भाषिक गट आहे ही भाषा मंडळाला सुचते. म्हणजे चिकोडी तालुक्यांत कानडी बहुसंख्य नाहींत म्हणून त्यांना सर्वांत मोठा भाषिक गट म्हणून गौरवावयाचें आणि बेळगांव-खानापूर तालुक्यांतील मराठी बहुसंख्य स्पष्ट दिसत असतां तिची किंचित् बहुसंख्या म्हणून हेटाळणी करायची असा हा लबाडीचा प्रकार आहे. बेळगांव-खानापूर तालुक्यांत

कानडी लोकसंख्या २८ टक्केहि नाहीं; पण हें मात्र पुनर्रचना मंडळानें छपवून ठेवलें आहे.

## खोटीं आणि खोडसाळ विधानें

बेळगांव जिल्ह्यांतील सर्वच तालुक्यांचे आर्थिक संबंध मराठी आणि कानडी या दोन्ही भागांशीं आहेत हें चक्क खोटें विधान पुनर्रचना मंडळानें दडपून दिलें आहे. 'मराठी भागाशीं या वादग्रस्त तालुक्यांचा खास आर्थिक संबंध नाहीं' असें त्याहून खोटें विधान करतां यावें म्हणूनच हें पहिलें विधान मंडळानें दडपून दिलें आहे. प्रश्न आहे तो बेळगांव-खानापूर तालुक्यांचा. बेळगांव जिल्ह्यांतल्या कानडी तालुक्यांचा प्रश्न त्यांत ढकलण्याचें कारण काय? 'बेळगांव हें शहर कापूस आणि गळिताचीं धान्यें यांच्या व्यापारी वाहतुकीचें केंद्र आहे' हें विधान सर्वांत अधिक बनावट; पण कर्नाटक कॉंग्रेस कमिटीनें तें आपल्या निवेदनांत प्रथम केलें आणि पुनर्रचना मंडळानें तें आपल्या अहवालांत दडपून दिलें!

बेळगांव नगरपालिकेनें आपल्या उत्पन्नाची आंकडेवारी देऊन कर्नाटक कॉंग्रेसच्या निवेदनांतील विधानें खोडून काढलीं होतीं. बेळगांव नगरपालिकेला कोणत्याहि वर्षीं कापसावर दीडशें रुपयांपेक्षां अधिक जकात मिळालेली नाहीं. १९५४–५५ सालीं गळिताच्या धान्यावर सुमारें १२॥ हजार रुपये जकात मिळाली; पण बेळगांव नगरपालिकेचें जकातीचें उत्पन्न १५ लक्ष रुपये आहे. त्यापैकीं १२॥ हजार रुपये म्हणजे केवढी रक्कम होते? नगरपालिकेनें आपल्या निरनिराळ्या ऑक्ट्रॉय नाक्यांवरील जकातीचे हिशेब सादर करून पुनर्रचना मंडळाला असें दाखवून दिलें होतें कीं, कोंकणांतून आणि इतर मराठी भागांतून येणाऱ्या-जाणाऱ्या मालावरील जकात ८७ टक्के आहे; तर कानडी भागांतून येणाऱ्या-जाणाऱ्या मालावरील जकात फक्त १३ टक्के आहे! पण बेळगांव-कारवार जिल्हे कर्नाटकांत कोंबण्याच्या मुंबई सरकारच्या कटांत पुनर्रचना मंडळ जर सरळच सामील झालें होतें तर खरा पुरावा डोळे उघडून तें पाहिलच कशाला? बेळगांवांतील ५३५५ दुकानांपैकीं ४५१८ दुकानें मराठी लोकांचीं आहेत.

बेळगांव शहराचा कर्नाटकांत समावेश करण्याबाबतहि पुनर्रचना मंडळानें अशीच हातचलाखी केलेली आहे. बेळगांवांत निर्विवाद मराठी बहुसंख्या आहे हें कबूल केल्यानंतर बेळगांव शहरांतील लोकसंख्येचे भाषावार आंकडे गेल्या शिरगणतींत तयारच केले गेले नाहींत असें पुनर्रचना मंडळानें ठोकून दिलें. ही माहिती मुंबई सरकारनें किंवा कर्नाटक कॉंग्रेसनें बहुधा मंडळाला दिली असावी! पण बेळगांव नगरपालिकेनें गेल्या शिरगणतीच्या वेळीं हे भाषावार आंकडे तयार केले होते. कारण बेळगांवांतील शिरगणतीचें काम सरकारतर्फे ही नगरपालिका करते.

## लोकसंख्येचे बोलके आंकडे

पुनर्रचना मंडळानें आंकड्यांचा उपयोग केवळ धूळफेक करण्यासाठींच केला आहे. कारण बेळगांव-खानापूर तालुक्यांतील अनुक्रमें ५३ आणि ५१ टक्के मराठी लोकसंख्या मंडळाला 'किंचित्' बहुसंख्या वाटते. पण खुद्द कानडी लोकसंख्या बेळगांव शहरांत २३ टक्के, बेळगांव तालुक्यांत २७ टक्के आणि खानापूर तालुक्यांत फक्त १२ टक्के आहे हें सत्य पुनर्रचना मंडळानें छपवून ठेवलें आहे. कारवार जिल्ह्याच्या कारवार, सुपें आणि हल्याळ या तालुक्यांचा तर पुनर्रचना मंडळानें उल्लेखहि केलेला नाहीं. या तीन तालुक्यांत कानडी लोकसंख्या अनुक्रमें २२, २२ आणि ८ टक्के आहे, तर मराठी कोंकणी बोलणाऱ्यांची लोकसंख्या अनुक्रमें ७१, ५९ आणि ८२ टक्के आहे. या भागांत बोलली जाणारी कोंकणी सावंतवाडीकडे बोलल्या जाणाऱ्या कोंकणीसारखीच आहे. पण 'कोंकणी' ही 'भाषा' आहे आणि बोलीच असली तर ती कानडीशीं संलग्न आहे हें काका कालेलकरी महाराष्ट्रद्वेष्टें मत पुनर्रचना मंडळाच्या डोक्यांत घुसविलें गेलें होतें कीं काय माहीत नाहीं.

खानापूर, सुपें, हल्याळ, कारवार या तालुक्यांचा म्हैसूरमध्यें समावेश करण्यामागें दुसराहि एक कुटिल डाव आहे. पुढें गोवा स्वतंत्र झाल्यानंतर त्याच्या विलिनीकरणाचा प्रश्न येणार. तेव्हां गोव्यावर कर्नाटकाला हक्क सांगतां येईल अशी तयारी काका कालेकरांच्या वक्तव्यांनीं जशी करण्यांत येत आहे तशीच ती हे तालुके आधींच कर्नाटकांत घुसवूनहि करण्यांत

आली आहे. गोवा म्हैसूरमध्यें जाईल असें कृष्ण मेनन एकदां म्हणून गेले! त्यांच्या त्या अनवधानानें महाराष्ट्रविरोधी कारस्थानाच्या दिल्लींतील अस्तित्वाची चुणूक मिळण्यास हरकत नाहीं.

पुनर्रचना मंडळानें ही 'पुनर्रचना' करतांना कोणतेंच तत्त्व स्वीकारलेलें नाहीं. जिल्हा हें प्रमाण मंडळानें कशाच्या आधारें धरलें? जिल्ह्यांतून तालुका वेगळा करण्याचीहि तयारी दाखविलीच. मग खेडें हा घटक धरण्यास काय हरकत होती? जिल्हा किंवा तालुका हा घटक काय स्वयंभू आहे कीं काय? १८३६ सालीं ब्रिटिशांनीं बेळगांव 'जिल्हा' तयार केला तेव्हां त्यांत मुद्दाम कानडी भाग समाविष्ट केला होता. खेर-मोरारजी सरकारनें ब्रिटिशांचेंच धोरण पुढें चालविलें. १९४८–४९ सालीं संस्थानें विलीन झाल्यावर रामदुर्ग-सौंदत्तीसारखीं कानडी संस्थानें धारवाड जिल्ह्याला जोडण्याऐवजीं मुद्दाम बेळगांव जिल्ह्याला जोडण्यांत आलीं. कारण बेळगांव 'जिल्ह्या'ची कानडी लोकसंख्या वाढवून दाखविण्यास मुंबई सरकार टपलेलें होतें.

## मुंबई सरकारचें कौटिल्य

पण जिल्हा हा 'घटक' म्हणून पुनर्रचनेच्या वेळीं मान्य होण्याची आशा कमी असल्यामुळें मुंबई सरकारनें १९५०–५१ सालीं या जिल्ह्यांतील तालुक्यांची पुनर्रचना कुटिल बुद्धीनें केली. त्या वेळीं बेळगांव तालुक्यांतील गांवें वेगळीं काढून चंदगड हा नवा तालुका बनविण्यांत आला; आणि बेळगांव तालुक्याला कानडी खेडीं नव्यानें जोडण्यांत आलीं. बेळगांव तालुक्यांतील कानडी लोकसंख्या वाढवून तालुका हा घटक धरला गेला तर बेळगांव तालुका कर्नाटकांत जावा अशासाठींच ही कारवाई मुंबई सरकारनें केली होती. पण बेळगांव शहरापासून आठ मैलांच्या कक्षेंत कुठेंहि कानडी लोकवस्तीचें खेडें नाहीं; तो सर्व मराठी मुलूख आहे. बेळगांव-कारवारमधील मराठी आणि कानडी विभाग स्पष्टपणें वेगळा काढतां येतो. पण पूर्वनियोजित कारस्थानाप्रमाणें पुनर्रचना मंडळानें हा सगळा भाग म्हैसूरमध्यें कोंबला. आणि येथून या प्रकरणांतील युद्धकांड सुरू झालें.

तसें म्हटलें तर बेळगांव भागांतील मराठी जनता कानडी वर्चस्वाचा प्रतिकार गेलीं वीस वर्षें एकाकीपणें करीत आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून हा प्रतिकार अधिक तीव्रपणें आणि अधिक संघटितपणें होऊं लागला. मुंबई सरकार या भागांतील कानडी वर्चस्वाला जसजशी फूस देऊं लागलें तसतशी या प्रतिकाराला अधिक धार येऊं लागली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची आवश्यकता सर्वांत अधिक तीव्रपणें या भागांतील लोकांनाच भासत होती. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा उच्चार प्रथम बेळगांवांतच झाला. पण तें बेळगांव मात्र महाराष्ट्र राज्य निर्माण होऊनहि अजून महाराष्ट्राबाहेरच राहिलें आहे. बेळगांव-कारवार भागांत मुंबई सरकार जसजसें भाषिक अन्याय करीत गेलें तसतशी या भागांतील मराठी जनता त्या अन्यायाविरुद्ध संघटित होत गेली. राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध होण्याच्या वेळीं अन्यायानें शींग गांठली.

## उग्र प्रतिकार आणि दडपशाही

हा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वींच बेळगांवांत पोलीस बंदोबस्ताचें प्रदर्शन होऊं लागलें होतें. तसें तें प्रदर्शन मुंबईंत आणि पश्चिम महाराष्ट्रांत मोरारजींनीं सगळीकडेच केलें होतें. पण बेळगांव भागांत या पोलिसी प्रदर्शनाचा कहरच झाला. लोकांना जशी कांहीं चिथावणीच देण्यांत आली. बेळगांव महाराष्ट्रापासून तोडण्याचा आपण जो कट केला आहे तो बाहेर येतांच त्याची उग्र प्रतिक्रिया होणार अशी अपेक्षाच जसें कांहीं मुंबई सरकार करीत होतें. बेळगांव म्हैसुरांत समाविष्ट केल्याचा पुनर्रचना मंडळाचा निर्णय जाहीर होतांच मराठी जनतेचा त्वेष, संताप आणि चीड यांची प्रतिक्रिया खरोखरीच उग्र झाली. मोरारजींनीं मुंबईंत जसा गोळीबार केला तसाच बेळगांवांतहि केला. १७ जानेवारी १९५६ रोजीं गोळीबारांत चार माणसें बळी पडलीं.

सीमा भागांत महाराष्ट्र एकीकरण समिति पूर्वींपासूनच संघटित झालेली होती. आतांपर्यंत ती अर्ज-विनंत्या, निवेदनें करीत होती, प्रचार, जागृति करीत होती. आतां ती एकीकरण समिति लढा देणारी संघटना बनली; लोकांचा उत्साहच अपार होता. एकीकडे मुंबईंत कल्लोळ माजला

होता आणि मराठी पुढाऱ्यांचें सगळें लक्ष तेथेंच केंद्रित झालें होतें. अशा वेळीं बेळगांवच्या जनतेनें हा लढा स्वतःच्या हिंमतीवर पुढें चालविला. बेळगांवांत ९ मार्च १९५६ पासून सत्याग्रह सुरू झाला. बेळगांवांत शिक्षा अत्यंत कडक म्हणजे क्रूरपणेंच दिल्या जात होत्या. तरीहि पांच हजार लोकांनीं सत्याग्रह करून शिक्षा भोगल्या. मुलांमुलींपासून म्हाताऱ्या-कोताऱ्यांपर्यंत सर्वांनीं या सत्याग्रहांत भाग घेतला. एकेका खेड्यांतून एकाच दिवशीं शंभरपर्यंत लोक सत्याग्रह करून तुरुंगांत गेले. बेळगांव-कारवारच्या या लढ्याला खरोखरच तोड नाहीं.

१ नोव्हेंबर १९५६ रोजीं बेळगांवांत एक प्रचंड मूक मिरवणूक निघाली. तीस हजार स्त्री-पुरुषांची ही मिरवणूक शोकमग्न होऊन निःशब्द-पणें चालली होती. मिरवणुकीच्या गांभीर्याचा, ती पाहण्यासाठीं रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या हजारों लोकांवर इतका परिणाम झाला कीं, त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. या मिरवणुकीनें पोलीस अधिकाऱ्यांच्या हृदयालाहि पाझर फुटला. कारण मिरवणूक तशीच अपूर्व होती. राजकीय घटना वेगानें घडत होत्या. त्रिराज्य योजना गेली, केंद्रशासित मुंबईची कल्पना खुंटली आणि अचानक विशाल द्विभाषिक आलें. बेळगांव-कारवारचा सीमा भाग मात्र म्हैसुरांत गेला तो गेलाच. मकराच्या दाढेंतून माणिक काढण्यासाठीं प्रयत्न करावा त्याप्रमाणें मराठी लोक बेळगांवसाठीं लढूं लागले. सत्याग्रह संपला आणि निवडणुकीचा लढा सुरू झाला. निवडणुकींत सर्वत्र महाराष्ट्रवाद्यांचाच विजय झाला.

### पंतांचें आश्वासन

लोकसभेंत बेळगांव-कारवारचा प्रश्न अनेक प्रकारें उपस्थित झाला होता; आणि हा प्रश्न मिटविला पाहिजे ही गोष्ट गृहमंत्री पं. पंतांनीं मान्य केली. पण हा प्रश्न मिटविण्यासाठीं सीमा मंडळ नेमण्यास त्यांनीं नकार दिला; आणि मुंबई-म्हैसूरच्या झोनल कौन्सिलमध्यें या प्रश्नाची तड लावण्यांत येईल असें आश्वासन दिलें. द्विभाषिकाच्या रचनेनंतर श्री. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले; आणि मुंबईतून होणारीं बेळगांव-कारवार-विरोधी

कारस्थानें संपलीं. बेळगांव, कारवार परत मिळविण्यासाठीं सरकारी पातळीवरून प्रयत्न सुरू झाले.

मुंबई सरकारनें हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें भारत सरकारला एक निवेदन सादर केलें. त्यांत बेळगांव-कारवार, बिदर, गुलबर्गा या म्हैसूर-मधील जिल्ह्यांतील ८१४ गांवें मुंबई राज्यांत यावीं अशी मागणी केली. खेडें हा घटक धरून भाषिक बहुसंख्या आणि सलगता या तत्त्वांवर ही मागणी करण्यांत आली. हींच तत्त्वें कां स्वीकारलीं पाहिजेत याबद्दल बिनतोड युक्तिवाद करण्यांत आला. लोकसंख्येची आंकडेवारी आणि नकाशेहि सादर करण्यांत आले. तसेंच सोलापूर, दक्षिण सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील २६० कानडी गांवें याच तत्त्वावर म्हैसूर राज्यांत घालण्याचीहि मुंबई सरकारनें तयारी दाखविली. अनेकदां प्रयत्न करूनहि या बाबतींत तडजोड होऊं शकलेली नाहीं.

## सत्याग्रह आणि दिल्ली-मोर्चा

एकीकडे मुंबई सरकारचे हे प्रयत्न चालू होते तर दुसरीकडे लोकांचीहि चळवळ चालूच होती. महाराष्ट्र एकीकरण समिति आणि संयुक्त महाराष्ट्र समिति यांच्या संयुक्त बैठकींतून सीमा-लढा-समिति निर्माण करण्यांत आली; आणि १ नोव्हेंबर १९५८ पासून बेळगांव, निपाणी, खानापूर, कारवार, भालकी या पांच ठिकाणीं सत्याग्रहाला सुरुवात झाली. हा सत्याग्रहसुद्धां अभूतपूर्व असाच झाला. म्हैसुरी पोलिसांनीहि अत्याचाराची शिकस्त केली. दीड महिना सत्याग्रह चालविल्यावर दिल्लीला लोकसभेवर मोर्चा नेण्याचें निश्चित करण्यांत आलें.

१८ डिसेंबर १९५८ रोजीं तीन हजार नागरिकांचा मोर्चा लोक-सभेवर गेला आणि त्यानें तेथें ३२ तास बैठा सत्याग्रह केला. बेळगांव-कारवार भागांतील सत्याग्रह चालूच होता. पण सत्याग्रहाच्या पुढचें सारा-बंदीचें पाऊलहि टाकणें लोकांना अपरिहार्य वाटूं लागलें.

९ फेब्रुवारी १९५९ रोजीं साराबंदी लढ्याची तयारी सुरू झाली. साराबंदीच्या लढ्यांत १४८ गांवें निवडण्यांत आलीं. या गांवांतील साराबंदी यशस्वी झाली. पण म्हैसूर सरकारवर त्याचा कांहीं परिणाम

झालेला नाहीं. उलट सारावंदी यशस्वी झाली याची चीड घेऊन येळ्ळूर वगैरे गांवांत सारा वसूल करण्यासाठीं लोकांवर भयानक अत्याचार करण्यांत आले. आज लोकांची सारावंदी आणि म्हैसूर सरकारचे अत्याचार दोन्हीहि चालू आहेत. पण मध्यंतरींच्या काळांत आणखी कांहीं महत्त्वाच्या राजकीय घटना घडल्या आहेत. द्विभाषिकाच्या विभाजनाचीं चक्रें सीमा भागांत सारावंदीची मोहीम सुरू झाल्यावर अधिक वेगानें फिरूं लागलीं. १ मे १९६० रोजीं द्विभाषिकाचें विभाजन होऊन महाराष्ट्र राज्य निर्माण झालें.

## यशवंतरावांचे प्रयत्न

द्विभाषिक विभाजनाबरोबर बेळगांवचा प्रश्न सुटावा अशी मुंबई सरकारसकट सगळ्याच मराठी लोकांची इच्छा होती. पण म्हैसूर सरकारचा हटवादीपणा आणि केंद्र सरकारचें कालहरणाचें धोरण यांमुळें ही इच्छा सफल होण्याचें चिन्ह दिसेना. म्हैसूर आणि मुंबई राज्याचें झोनल कौन्सिल द्विभाषिकाच्या विभाजनाबरोबर विसर्जन पावणार होतें. त्यामुळें या सीमा प्रश्नावर आपण घेतलेली भूमिका आणि विधानसभेपुढें मांडण्याचें आणि विधानसभेचा आपल्या भूमिकेला एकमुखी पाठिंबा मिळविण्याचें मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें ११ मार्च १९६० रोजीं मुंबईच्या द्विभाषिक विधानसभेनें यशवंत-रावांच्या भूमिकेला एकमुखी पाठिंबा दिला.

खेडें हा घटक धरून भाषिक बहुसंख्या आणि सलगता या तत्त्वांवर सीमेचा प्रश्न निकालांत काढावा हीच भूमिका यशवंतरावांनीं मांडली आहे आणि तिला सर्व पक्षांनीं पाठिंबा दिला आहे. विशेष म्हणजे द्विभाषिक विधानसभेंत गुजरातच्या प्रतिनिधींनाहि या भूमिकेला पाठिंबा द्यावा लागला. यशवंतरावांनीं म्हैसूरच्या मुख्यमंत्र्यांशीं झालेल्या आपल्या चर्चेची जी माहिती विधानसभेंत दिली ती ऐकल्यानंतर म्हैसुरी नेत्यांच्या वृत्तीवर प्रकाश पडतो. १९५७ सालीं त्या वेळचे म्हैसूरचे मुख्यमंत्री निजलिंगप्पा यांनीं यशवंत-रावांना म्हटलें, 'या सगळ्या प्रश्नांतून कारवारचा प्रश्न सोडून द्या, निपाणीचा प्रश्न सोडून द्या आणि बाकीच्या प्रश्नांसंबंधीं आपण ६० टक्के

लोकवस्तीचें प्रमाण धरून विचार करूं.' यशवंतरावांनीं ही सूचना धुडकावून लावली. पुढें जत्ती म्हैसूरचे मुख्य मंत्री झाले. ते यशवंतरावांना म्हणाले, 'तुम्ही निपाणी घ्या आणि हा प्रश्न सोडवून टाका.' यशवंतरावांनीं तडक उत्तर दिलें, 'मी माझ्या सरकारतर्फे तुमच्याकडे कांहीं गांवांची भिक्षा मागत नाहीं. न्यायानें आणि सर्वमान्य तत्त्वांना धरून जो कांहीं प्रदेश मुंबई राज्यांत समाविष्ट व्हावयाचा असेल तो घेण्यास आणि त्याच न्यायानें जो प्रदेश म्हैसूर राज्यांत जावयाचा असेल तो देण्यास मी या ठिकाणीं आलों आहें.'

## एस्. एम्. जोशी यांची सूचना

म्हैसूर सरकारची वृत्ति हा प्रदेश दाबून ठेवण्याची आहे. महाराष्ट्र सरकारची दृष्टि न्याय मिळविण्याची आहे. पण हा न्याय कसा मिळणार ? जत्तींवर दडपण कोण आणणार ? केंद्र सरकार दडपण आणूं शकेल. पण केंद्र सरकारची त्याला तयारी दिसत नाहीं. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या भवितव्याचा प्रश्न धसाला लावल्यामुळें एस्. एम्. जोशी समितींतून बाहेर पडले आहेत. सं. म. समितीचें कार्यक्षेत्र सीमा प्रश्नापुरतें मर्यादित करावें आणि आमदार-खासदारांनीं या प्रश्नावर राजीनामे देऊन केंद्र सरकारवर दडपण आणावें, असा मार्ग एस्. एम्. जोशी यांनीं सुचविला होता तो समितींतील कम्युनिस्ट प्रभृति पक्षांनीं नामंजूर केला. एस्. एम्. जोशी या राजीनामा मार्गाचा प्रचार करीत आहेत. श्री. चिंतामणराव देशमुख यांनीं महाराष्ट्र राज्यांतील कानडी गांवें म्हैसूरला देऊन टाकण्याचा एकतर्फी निर्णय महाराष्ट्र सरकारनें घ्यावा असें सुचविलें. केंद्र सरकारवर आणि म्हैसूर सरकारवर नैतिक दडपण आणण्यास हा मार्ग चांगला आहे असें वाटून एस्. एम्. जोशी यांनीं या सूचनेलाहि पाठिंबा दिला आहे.

बेळगांव-कारवारच्या प्रश्नाची आज अशी स्थिति आहे. महाराष्ट्र आणि म्हैसूर राज्यांच्या भूमिका परस्परविरुद्ध आहेत आणि त्या भूमिकांना त्या राज्यांतील सर्व पक्षांचा पाठिंबा आहे. सर्व अखिल भारतीय पक्षांना ही नामुष्कीची गोष्ट आहे कीं, ते अखिल भारतीय पातळीवर या प्रश्नासंबंधीं न्यायाची भूमिका घेऊन तिचा आग्रह धरूं शकत नाहींत. राष्ट्रीय

नेते या प्रश्नाचा न्यायानें निर्णय लावण्याचा निर्धार दाखवीत नाहींत ही देखील नामुष्कीची गोष्ट आहे. भारताच्या राष्ट्रीय एकतेला चिनी आक्रमणापासून जेवढा धोका आहे तेवढाच अन्यायाच्या आणि दडपेगिरीच्या धोरणाला बळी पडण्यापासूनहि धोका आहे. हा प्रश्न महत्त्वाचा आहे. पण तो कधीं सुटेल हें सांगतां येत नाहीं. पण तो प्रश्न सुटून बेळगांव-कारवारचा महाराष्ट्रांत समावेश होईपर्यंत या सीमा भागांत कधींहि शांतता नांदणें शक्य नाहीं.

* * *

# यशवंतरावांचें नेतृत्व : : ४

नव-महाराष्ट्राचे नेते म्हणून श्री. **यशवंतराव चव्हाण** यांना आतां एकमुखी मान्यता मिळाली आहे. ज्यांना त्यांचें नांव घेतांना शिवीशिवाय शब्द सुचत नव्हते त्यांनाहि निंदा करण्यापूर्वी त्यांची एक ओंवी म्हणावी लागत आहे. मग त्यांच्या अनुयायांत आणि स्नेह्यांत त्यांच्यावर स्तुतिसुमनें उधळण्याबाबत अहमहमिका लागावी यांत कांहीं आश्चर्य नाहीं. जगांत यशाइतकें यशस्वी कोणीहि होत नाहीं असें म्हणतात; आणि तें यश तर यशवंतरावांच्या हातांतच आलेलें आहे. पूर्वीं राजाची नुसती स्तुतिच होत असे. लोकशाहींत राज्यकर्त्यांची स्तुतीप्रमाणेंच निंदाहि होते; आणि ही निंदास्तुति बरीचशी अर्थवादात्मक असते. या नियमाप्रमाणेंच यशवंत-रावांच्या स्तुतींतला कांहीं भाग वजा केला तरीहि त्यांचें बरेंच वर्णन शिल्लक उरतें; आणि तेंच महत्त्वाचें आहे.

**जनतेनें घेतलेली परीक्षा**

यशवंतरावांना हें नेतृत्व सहजासहजीं प्राप्त झालेलें नाहीं; लोकांनीं त्यांच्या नेतृत्वाला सहजासहजीं मान्यता दिलेली नाहीं; आणि ही गोष्ट दोघांनाहि भूषणावह अशीच समजली पाहिजे. मराठी कॉंग्रेसजनांचा, खुषीनें किंवा नाखुषीनें, त्या वेळींहि यशवंतरावांना पाठिंबाच होता; आणि विरोधी पक्षाचे लोक आजहि त्यांच्यामागें आलेले नाहींत. बदल झालेला आहे तो सर्वसामान्य लोकांच्या मतांत. हे लोक म्हणजे जनता. ही जनता बिरबल-बादशहाच्या गोष्टींतील बहुरूप्याला भेटलेल्या गुराख्यासारखी असते. परीक्षा केल्याशिवाय ती बिदागी देत नाहीं. बहुरूप्यानें गाईचें सोंग आणतांच बादशहानें त्याच्यावर बक्षिसांचा वर्षाव केला. पण गुराख्यानें त्याच्या पाठीवर चिमूटभर माती टाकून पाहिली. खऱ्या गाईप्रमाणें बहुरूप्यानें आपल्या पाठीवरच्या केंसांचा संकोच केला. गुराखी खूष झाला आणि त्यानें एक पैसा बहुरूप्याला दिला. बहुरूपीहि खूष झाला.

त्या गुराख्याप्रमाणें जनतेनेंहि यशवंतरावांची परीक्षा घेतली आणि नंतर आपली पसंती व्यक्त केली आहे. जनतेच्या या परीक्षेचें खुद्द यशवंत-

रावांनाहि कौतुक वाटत असेल. कारण जितका आत्मविश्वास तितकीच गुणग्राहकताहि त्यांच्या ठिकाणीं आहे. शिवछत्रपतींपासून लोकमान्यांपर्यंत सर्व महापुरुषांचीं नांवें आज त्यांच्या तुलनेसाठीं घेतलीं जातात. पण स्तुतीनें त्यांचा तोल जाण्याची शक्यता नाहीं. कारण भयानक निंदा, उपहास आणि दुष्ट प्रहार त्यांनीं शांतपणें सहन केलेले आहेत. ती निंदा ऐकतांना त्यांच्या मनाचा तोल ढळला नाहीं; उलट भडकलेल्या, बेभान झालेल्या लोकांशीं बुद्धिवाद करण्याइतका निग्रह त्यांनीं त्या वेळीं दाखविला. आजहि स्तुति करणाऱ्या मित्रांचा तोल सुटूं नये म्हणून ते अधिक जपत असलेले दिसतात.

## दीर्घकालीन तितीक्षा

यशवंतरावांच्या बुद्धीची झेंप आणि निष्ठेचा कस काय आहे याची जाणीव १९५६ सालापर्यंत महाराष्ट्र कॉंग्रेसमध्येंहि फारच थोड्यांना असेल. कारण तोंपर्यंत मुंबई मंत्रिमंडळांतील ते महत्त्वाचे मंत्री आहेत असें कोणी मानीत नव्हतें. आणि महाराष्ट्र कॉंग्रेसमध्येंहि त्यांचें नेतृत्व दुय्यम दर्जाचेंच समजलें जात होतें. ज्याच्या अंगांत कर्तबगारी आहे त्यानें महत्त्वाकांक्षा बाळगणें हा कांहीं राजकारणांत दुर्गुण होऊं शकत नाहीं. १९४६ सालापासून १९५६ सालापर्यंतच्या दहा वर्षांत महाराष्ट्र कॉंग्रेसचें नेतृत्व यशवंतरावांच्या तुलनेनें अनेक बाबतींत इतकें सामान्य वाटतें कीं, या नेतृत्वाचें अनुयायित्व बिनतक्रारपणें त्यांनीं इतका दीर्घकाल मान्य तरी कसें केलें याचेंच आश्चर्य वाटत राहतें. महत्त्वाकांक्षेला व्यापक हिताची जोड आणि संयमाचा लगाम असल्यामुळेंच त्यांना दीर्घकाल ही तितीक्षा शक्य झाली असावी.

घडून आलेल्या घटनेच्या श्रेयाची वांटणी करणें तसें म्हटलें तर सोपें असतें. पण घटना घडविण्यांत कालाचाहि म्हणून एक वांटा असतो. कालपक्क होऊनहि कांहीं घटनांची फलनिष्पत्ति होते. अशा वेळीं बाकीच्या गोष्टी निमित्तमात्रहि असतात. म्हणूनच एखाद्यानें काय साधलें, काय मिळविलें, याच्यापेक्षां ती गोष्ट मिळेपर्यंत तो कसा वागला ही गोष्टच अधिक महत्त्वाची समजावी लागते. जीवनाच्या ग्रंथाचीं कांहीं पानें योगा-

योगानेंच उलटलीं जातात. या पानांवर मथळे असतात; आणि खालीं मजकूर लिहावयाचा असतो. योगायोगानें जीवनग्रंथाचें कोणतें पान उघडलें गेलें आणि त्याच्यावर कोणता मथळा होता याच्यापेक्षांहि त्या मथळ्याखालीं कोणता मजकूर लिहिला गेला ही अधिक महत्त्वाची गोष्ट समजली पाहिजे. कारण तेथें कर्तृत्वाचा कस लागत असतो.

### प्रवाहपतित नव्हेत

यशवंतरावांनीं फलटण येथें नेहरू-निष्ठेचा सिद्धान्त मांडला त्या वेळीं पुढें साराच अंधार होता. आज ज्या घटना घडून राहिल्या आहेत त्यांची कांहींहि कल्पना त्या वेळीं कोणालाहि नव्हती. अशा वेळीं आपण कोणत्या मार्गानें जाणार एवढेंच त्यांनीं जाहीर केलें. त्या वेळीं महाराष्ट्र कॉंग्रेसपुढें दोनच मार्ग होते. एक स्वतःच्या संघटनेवरील निष्ठेचा आणि दुसरा बंडखोरीचा. यांपैकीं बंडखोरीचा मार्ग पत्करण्यास महाराष्ट्र कॉंग्रेसचे अन्य नेतेहि तयार नव्हते; आणि वरिष्ठ कॉंग्रेस नेत्यांवरची निष्ठाहि ते स्पष्टपणें बोलून दाखवीत नव्हते. भाषा बंडखोरीची आणि कृति निष्ठेची अशा तऱ्हेनें ते वागत होते. त्यामुळें त्यांची स्थिति केविलवाणी झाली होती. ते प्रवाहपतित झाले होते. प्रवाहाबरोबर वहात जाण्याऐवजीं प्रवाहाविरुद्ध हात मारण्यास प्रथम यशवंतरावांनीं प्रारंभ केला. हा आत्मविश्वासाचा, कांहीं निष्ठेचा प्रश्न होता.

केंद्रशासित मुंबई आणि इतर दोन राज्यांचें विधेयक आलें त्या वेळीं यशवंतरावांनीं आपली संयुक्त महाराष्ट्राचीच भूमिका मांडली. त्रिराज्या-ऐवजीं अचानक द्विभाषिक आलें. मोरारजींच्या विरुद्ध हिरे उभे राहिले आणि मोरारजींच्या ऐवजीं यशवंतराव निवडून आले. द्विभाषिकाचे ते मुख्यमंत्री झाले आणि त्यांच्या कर्तृत्वाला द्विभाषिक मुंबई राज्य मोकळें झालें. ते द्विभाषिक मोडण्यासाठीं मुख्यमंत्री झाले नव्हते; पण मराठी जनता हें द्विभाषिक स्वीकारील असें त्यांना त्या वेळींहि वाटलें असेल असें म्हणणें कठीण आहे. वर्ष दीड वर्ष आपण द्विभाषिक एकतानतेनें राबविलें; पण आपण लोकांची एकतानता साधूं शकत नाहीं असा त्यानंतर आपल्याला अनुभव आला असें त्यांनीं अलीकडे एका मुलाखतींत सांगितलें आहे.

हा अनुभवहि त्यांना अपेक्षितच असला पाहिजे. कारण द्विभाषिकाचा कारभार सुरू केल्यानंतरहि त्यांची भाषा सावधपणाची होती. द्विभाषिक अमर आहे, काळ्या दगडावरची रेघ आहे, चंद्रसूर्य असेपर्यंत तें टिकणार आहे, असली भाषा त्यांनीं कधींहि वापरली नाहीं. लोकांनीं विकासाची संधि पाहावी, विचार करावा, असेंच त्यांचें आवाहन होतें.

## ‘ गुरू ’ची विद्या

द्विभाषिकाच्या कारभारांत लोक आपल्याबरोबर समरस होत नाहींत असें दिसून आल्यानंतर त्यांनीं जें वर्तन केलें त्यांत त्यांचा मुत्सद्दीपणा आणि चाणाक्षपणा दिसून येतो. या आपल्या वर्तनाचें वर्णन त्यांनींच मोजक्या पण मार्मिक शब्दांत केलें आहे. ते म्हणतात, ‘ एक गोष्ट मीं कटाक्षानें पथ्य म्हणून पाळली होती. ती अशी कीं, ज्यांनीं माझ्यावर द्विभाषिक राबविण्याची जबाबदारी टाकली होती त्यांनीं या बाबतींत मला विचारीपर्यंत आपण होऊन या प्रश्नाचा फेरविचार करा असें सुचवायचें नाहीं. पण जेव्हां ते होऊन मला परिस्थितीचा अंदाज विचारतील तेव्हां मात्र सुस्पष्ट कल्पना द्यायची. ’

वरिष्ठ नेत्यांनीं विचारल्याशिवाय बोलायचें नाहीं या त्यांच्या निर्णयाला तशींच कारणें होतीं. ज्या शक्तींनीं मुंबईसह महाराष्ट्राची निर्मिति यापूर्वीं घडूं दिली नव्हती त्या शक्तींवर मात करण्याचा हा प्रश्न होता. स्पष्टच बोलायचें तर मोरारजींचा हटवाद अखेरपर्यंत कायम होता. तेव्हां त्यांच्या हटवादाला आपण स्वतः तोंड देण्याऐवजीं नेहरू-पंतांवर ती कामगिरी ढकलण्याची मुत्सद्देगिरी यांत होती. यापूर्वीं मोरारजीप्रभृति नेते मराठी पुढाऱ्यांना नेहरू-पंतांशीं झगडायला लावीत असत, तोच डाव मोठ्या कौशल्यानें मोरारजीप्रभृतींवर उलटविण्याची ही युक्ति होती. ही युक्ति यापूर्वीं मराठी कॉंग्रेस पुढाऱ्यांना सुचली नव्हती.

आणि सुचून उपयोगहि नव्हता. कारण गुजरात कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं आपल्या डावपेंचासाठीं आवश्यक ती तयारी केलेली होती; जरूर ती शक्ति संपादन केलेली होती. पक्षसंघटनेंत, विशेषतः जेथें एकमुखी असें बलिष्ठ नेतृत्व असतें अशा संघटनेंत निष्ठेमुळें, आज्ञापालनामुळें एक प्रकारचें सामर्थ्य

येत असतें. वरिष्ठ नेत्यांची वाटेल ती आज्ञा गुर्जर नेते बिनतक्रार पाळतात असा त्यांनीं स्वतःबद्दल गवगवा निर्माण केलेला होता. मोरारजी हे असा गवगवा करणाऱ्यांतील अध्वर्यु होत. मोरारजींना यशवंतरावांचें गुरुपद कांहीं विरोधकांनीं दिलें आहे. मोरारजींवर त्यांना न पेलणारी जबाबदारी टाकण्यासारखाच हा प्रकार आहे ! पण ज्याचा गुण घ्यायचा त्याला गुरु मानायचें या दत्ताच्या पद्धतीप्रमाणें संघटनेंत आज्ञापालनानें सामर्थ्य संपादन करण्याचा हा गुण यशवंतरावांनीं मोरारजींकडून उचलला; आणि मोरारजींवर उलटविलाहि !

## वाणीचा संयम आणि शब्दांचें सामर्थ्य

या गोष्टी निसर्गक्रमानेंच झाल्या. पण त्या अभावितपणें घडल्या असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्यांना यशवंतरावांनीं निश्चित अशी गति, वळण दिलें; आणि मग त्या क्रमानें घडत गेल्या. आपलें यासंबंधींचें धोरण स्पष्ट करतांना यशवंतरावांनीं वापरलेले शब्द मोठे अर्थपूर्ण आहेत. वरिष्ठ नेत्यांनीं विचारल्यानंतर आपलें मत सांगायचें. पण ते म्हणतात, 'किंबहुना आपण अशा वेळीं जें मत देऊं तें निर्णयासच कारणीभूत व्हावें इतकी आपली शक्ति निर्माण व्हावयास हवी असें मला वाटे.' त्याचें मत निर्णायक ठरलें हें आपण पाहत आहोंत.

वाणीच्या संयमानें शब्दांत सामर्थ्य निर्माण होतें असें धर्मशास्त्रकारांचें मत आहे. यशवंतरावांनीं हें मत अनुभवसिद्ध करून दाखविलें आहे. लोकशाहींत शब्दांच्या शस्त्रानें लढावें लागतें. पण शब्दांचा उपयोग शस्त्राप्रमाणेंच फार जपून करावा लागतो याचें भान महाराष्ट्रांत तरी कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं फार क्वचितच दाखविलें. भाषेवर प्रभुत्व, साहित्यिक शैली आणि वक्तृत्वाची देणगी या तीन गोष्टी एकत्र आल्या कीं, शब्द अनावर होतात. सभेंत टाळ्यांचा मोह टाळतां येत नाहीं. आणि मग 'मुखमस्तीति वक्तव्यम्' असा प्रकार होऊन वक्त्याच्या तोंडून बाहेर पडणारे शब्दच त्याच्या मानगुटीवर बसतात. यशवंतरावांना वक्तृत्वाची देणगी आहे, भाषेवर त्यांचें प्रभुत्व आहे आणि त्यांची निरूपणाची शैली साहित्यिकाची

आहे. पण या गुणांच्या आहारीं ते जात नाहींत. काय बोलूं नये हें त्यांना नेमकें कळतें. यामुळें त्यांचें यश निश्चित झालें.

काय बोलूं नये हें जसें त्यांना कळतें तसेंच काय बोलावें हें त्यांना माहीत असतें. शब्दशस्त्रानें प्रतिपक्षाला घायाळ करण्याची त्यांची ताकद राज्यपुनर्रचना मंडळानें सुचविलेल्या समतोल द्विभाषिकाचें वर्णन त्यांनीं 'देशी वसाहतवाद' या शब्दांत केलें त्या वेळींच दिसून आली. पण मार्मिक शब्द मर्मभेदीच असले पाहिजेत असें त्यांना वाटत नसावें. यश संपादन करण्यासाठीं मर्म जाणलें पाहिजे; कर्मेवर्मे काढण्यानें यशाची खात्री नसतेच; पण मनें भंगतात, अशा तऱ्हेचा व्यापक अर्थ त्यांनीं गेल्या चार वर्षांत आचरून दाखविला आहे. विदर्भाचा प्रश्न अणे यांनीं अजूनहि ताणण्याचा प्रयत्न चालविला आहे. पण 'लोकनायक अणे यांना आम्ही लोकमान्यांच्या जागीं मानतों. त्यांचा आशीर्वाद अजून मिळायचा आहे' एवढेच उद्‌गार ते काढतात. गोड शब्दांचें नाटक एखाद्या वेळीं करतां येईल पण मनच तसें घडविल्याशिवाय प्रत्येक वेळीं तसे शब्द बाहेर पडूं शकत नाहींत.

## टीकेचें हलाहल पचविणारा शंकर

प्रहार सहन करण्याची आणि तरीहि मनाचा तोल ढळूं न देण्याची त्यांना आतां संवयच झाली आहे. सूर्याजी पिसाळाच्या उपमेपासून मराठ्यांच्या राज्याच्या आरोपापर्यंत अनेक कठोर शब्द त्यांनीं ऐकले आहेत. मनांत असतें तर कटु आणि भेदक शब्दांचा वर्षाव करणें त्यांना अशक्य नव्हतें. पण सूर्याजीची आठवण करणाऱ्यांना 'तुमचा शिवाजी कोण?' असें त्यांनीं विचारलें. मराठ्यांच्या राज्याची दहशत खाणाऱ्यांना 'संशयानें मारूं नका, वेदना फार होतात' अशा हृदय पिळवटणाऱ्या शब्दांत त्यांनीं आवाहन केलें. भडकलेल्या आणि बहकलेल्या लोकांच्याहि बुद्धीला आवाहन करायचें आणि त्यांच्यासमोर विचार मांडायचा असें जणूं कांहीं व्रतच त्यांनीं घेतलें आहे असें वाटतें.

संदिग्ध बोलून संशय आणि वाद वाढविण्याची त्यांना संवय नाहीं. उलट शक्य तितकें आपलें म्हणणें निःसंदिग्धपणें मांडायचें अशीच त्यांची

पद्धत आहे. पण कित्येकदां ते सूचक शब्द वापरतात; आणि त्या वेळीं त्यांच्या मनांतली खळबळ सहज दिसून येते; एक वर्षापूर्वीं कऱ्हाडला त्यांचा वाढदिवस त्यांच्या घरीं साजरा झाला त्या वेळीं 'मी एका चक्रव्यूहांत शिरलों आहें' असे उद्गार त्यांनीं काढले होते. त्या 'चक्रव्यूहा'चा द्विभाषिकाशीं संबंध आहे हें त्या वेळीं सर्वांनींच ओळखलें होतें. पण द्विभाषिकाचें विभाजन सुचविण्याच्या दिशेनें त्यांनीं त्या वेळीं पावलें टाकण्यास सुरुवात केली होती हें आतां स्पष्ट झालें आहे.

## परंपरेचा धागा

रानडे, लोकमान्य यांच्याशीं त्यांची तुलना करणाऱ्यांना त्यांनीं नुकतेच '१९२० नंतर सुरू झालेल्या राजकारणाचा मी प्रतिनिधि आहें' असें सांगितलें. पण त्यांचीं भाषणें ऐकतांना त्यांचा विशेष असा मनांत ठसतो कीं, भारतीय राजकारणाची रानडे-टिळकांपासूनची जी परंपरा आहे ती त्यांनीं खंडित केलेली नसून तिचा धागा पुढें चालविला आहे. मार्क्सवादाचे संस्कार त्यांच्या बुद्धीवर झालेले आहेत. पण त्या संस्कारांनीं त्यांनीं राजकीय विचारपरंपरेचा धागा तोडला नाहीं तर अधिक बळकट केला. म्हणूनच महात्मा फुले यांच्या विचारांतील क्रांतिकारक भागहि त्यांनीं आत्मसात् करून या विचारपरंपरेंत जोडून दिलेला दिसतो. मार्क्सवादी विचाराच्या संस्कारांनीं राजकारणाच्या राष्ट्रीय परंपरेवर महाराष्ट्रांत आघात झाल्याचीं उदाहरणें शोधण्यासाठीं दूर जायला नको. महात्मा फुले यांच्या विचारांचा उच्चार करणाऱ्या अनेकांच्या शब्दांतील जातीयतेचा रंग पुसला गेला नाहीं. त्यामुळें 'बहुजनसमाज' या शब्दालाहि ब्राह्मणेतर असा जातीय अर्थ चिकटूं लागला. विचाराची आणि उच्चाराची इतकी उच्च पातळी यशवंतरावांनीं सतत राखली आहे कीं, त्यांच्या शब्दांना विकृत अर्थ चिकटविण्याचें धाडस त्यांच्या शत्रूंनाहि होणार नाहीं.

सांगलीला नुकताच त्यांचा जो सत्कार झाला त्या वेळीं कोणी तरी सुचविलें कीं, बहुजनसमाजाच्या भाषेला आतां राजदरबारीं स्थान मिळालें पाहिजे. यशवंतरावांनीं इतकेंच उत्तर दिलें कीं, बहुजनसमाजाचा माझा अर्थ वेगळा आहे; आणि हा अर्थ त्यांनीं सांगलीच्याच पूर्वींच्या एका

भाषणांत सांगितला होता. ज्या दरिद्री समाजांतून ते वर आले त्या समाजाबद्दल त्यांच्या मनांत अपार कणव आहे. पण त्यांच्या डोळ्यांसमोर विशिष्ट जातीचा समाज नाहीं; तर वसईपासून वर्ध्यापर्यंत पसरलेल्या महाराष्ट्रांतला बहुविध समाज आहे; आणि असें आहे म्हणूनच ते महाराष्ट्राचें नेतृत्व घेऊं शकले आहेत. ज्या काळांत बहुजनसमाज हा शब्द मराठी राजकारणांत एखाद्या चलनी नाण्यासारखा वापरला जात होता त्या वेळींहि त्यांनीं त्या शब्दाचा उपयोग टाळला. जातिनिरपेक्ष विचार करण्याची शास्त्रीय दृष्टि त्यांच्या ठिकाणीं आहे म्हणूनच त्यांच्या नेतृत्वाच्या कक्षा सतत वाढत आहेत.

### व्यक्तित्वाचें व्यवच्छेदक लक्षण

महाराष्ट्र कॉंग्रेसमध्यें त्यांनीं नवें नेतृत्व निर्माण केलें आहे याचें कारण त्यांचा बौद्धिक कस उच्च दर्जाचा आहे हें आहेच, पण दुसरें कारण ते राजकारणांतच वाढले हें आहे. सामाजिक किंवा शैक्षणिक चळवळी करीत असतांना योगायोगानें राजकारणांत सांपडलेले असे ते नेते नाहींत. समाजक्रांतीचें उद्दिष्ट तर त्यांच्यासमोर आहेच. अन्यथा भूदानाच्या चळवळीबद्दल त्यांना आस्था वाटली नसती; आणि ही आस्था तोंडी नसून आपल्या पगाराचा सहावा हिस्सा ते संपत्तिदान म्हणून देत आलेले आहेत. तरीहि राजकारण आणि तदनुषंगिक सत्ता हेंच त्यांनीं समाजक्रांतीचें आपलें साधन ठरविलें आहे. ते हाडाचे राजकारणी आहेत. म्हणून गुरूपदेश न घेतां जनांचें ऐकून मनाचें करण्याचा खाक्या त्यांनीं चालविला. म्हणून प्रत्येक कृति ते जबर आत्मविश्वासानें करूं शकतात.

आत्मविश्वास हें त्यांच्या व्यक्तित्वाचें व्यवच्छेदक लक्षणच आहे. १९५६ सालच्या ऐन रणधुमाळींत सांगलीच्या जाहीर सभेंत त्यांनीं सांगितलें होतें, 'तसाच मीहि कांहीं अगदींच पालापाचोळ्याचा नाहीं, कीं विरोधाची फुंकर मारून मी उडून जाईन ! पंचवीस वर्षांचें माझें राजकीय जीवन जनतेसमोर आहे. मी त्याची जाहीर चौकशी करून घेण्यास तयार आहें. यशवंतराव राजकारणांतून सहजासहजीं उडून जाणार नाहीं.' त्यांचा हाच आत्मविश्वास द्विभाषिक विभाजनाच्या तडजोडींतहि दिसून

क्र ......१८...... वि: ......... नों: दि: ..........


येतो. डांग, आर्थिक मदत गुजरातला देणें आवश्यक आहे असें वाटतांच त्यांनीं तें तडकाफडकी आणि निःसंकोचपणें मान्य केलें. हें करण्याचें धाडस आणि आत्मविश्वास दुसऱ्या एखाद्या मराठी कॉंग्रेस पुढाऱ्याला दाखवतां आला असता असें वाटत नाहीं.

## आत्मविश्वासाचा प्रत्यय

पण यशवंतरावांचें वैशिष्ट्य यापेक्षांहि वेगळें आहे. द्विभाषिकाच्या विभाजनाची वाच्यता झाल्यापासून डांगच्या आणि गुजरातला आर्थिक मदत देण्याच्या प्रश्नावर विरोधी पक्षांनीं धुळवड सुरू केली. वस्तुतः डांग, गुजरातला आर्थिक मदत देणें या प्रश्नांना संयुक्त महाराष्ट्र समितीनेंच पूर्वीं या ना त्या स्वरूपांत तोंड फोडलें होतें. आणि त्या प्रश्नावर यशवंतरावांनीं तडजोड करतांच महाराष्ट्रावर अन्याय झाल्याच्या घोषणा समितीनें सुरू केल्या. पण त्यामुळें यशवंतराव विचलित झाले नाहींत. इतकेंच नव्हे तर समितिनेत्यांनींच ही तडजोड प्रथम सुचविली होती, स्वीकारली होती, याचा उल्लेख त्यांनीं चुकूनहि केला नाहीं. या तडजोडीची जबाबदारी त्यांनीं स्वतःवर घेतली. या निर्णयाच्या जबाबदारीचें खापर विरोधी नेत्यांच्या डोक्यावर फोडण्याचा मोह कोणालाहि झाला असता. पण तो मोह यशवंतरावांनीं कटाक्षानें टाळला. ही गोष्ट त्यांच्या आत्मविश्वासाची द्योतक आहे.

महाराष्ट्रावर अन्याय झाला आहे अशी अन्यायाची भावना, न्यूनगंडाची भावना, आपण काढून टाकली पाहिजे असें ते म्हणतात. आपल्यावर दुसरा अन्याय करतो असें मानण्यांत एक प्रकारची पराभूत वृत्ति निर्माण होते आणि ही वृत्ति कर्तृत्वाला खच्ची करणारी असते. हें आपल्या कर्तृत्वानें घडलें असें वाटलें तरच कर्तृत्व बहरून येतें. निर्णय घडविणारे आपण आहोंत अशा आत्मविश्वासानें यशवंरावांनीं हा प्रश्न हाताळला आहे; आणि मुंबई विधान परिषदेंत भाषण करतांना गुजराती नेते डॉ. जीवराज मेहता यांना द्विभाषिक विभाजनानें गुजरातवर अन्याय झाल्याची तक्रार करावी लागली. गुर्जर नेत्यांच्या बाबतींत ही भाषा नवी आहे. १९५६ सालचें चित्र १९६० सालीं उलटेंपालटें झाल्याचें हें दृश्य आहे. हा बदल यशवंतरावांच्या कर्तृत्वानें आणि आत्मविश्वासानें घडून आलेला आहे.

## यशवंतरावांचें नेतृत्व

### दिल्लीकडची झेंप

यशवंतराव गेल्या चार वर्षांत केवळ महाराष्ट्राचे नेते झालेले नाहीत. त्यांची गणना अखिल भारतीय नेत्यांत होऊं लागली आहे. त्यांच्या नेतृत्वाची झेंपच दिल्लीकडे आहे. मराठ्यांच्या राजधानीचा मोहरा पूर्वी उत्तरेकडे वळलेला असे आणि त्याला 'दिल्ली दरवाजा' म्हणत असत. यशवंतरावांच्या नेतृत्वाचा मोहराहि दिल्ली दरवाजाकडे वळलेला आहे. कांहीं वर्डी वृत्तपत्रें कांखोटीला मारून नेहरूंचा वारस ठरण्याचा उपद्व्याप त्यांनीं कधीं केला नाहीं. पं. नेहरूंच्या संभाव्य वारसांत त्यांची गणना लंडनमधील वृत्तपत्रांनीं केवळ त्यांचें कर्तृत्व न्याहाळून केली आहे.

पं. नेहरूंच्या नेतृत्वाशीं दुसऱ्या कोणत्याहि नेत्याच्या नेतृत्वाची तुलना करतां येणार नाहीं. कारण पं. नेहरू ज्या परिस्थितींत नेते झाले ती परिस्थिति यापुढें कोणालाहि लाभणार नाहीं. अखिल भारताचें एकमुखी नेतृत्व अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. पण कर्तृत्व हें स्वतःच्या शहाणपणावर आणि पराक्रमावर अवलंबून आहे. या शहाणपणाच्या आणि पराक्रमाच्या आत्मविश्वासानेंच महाराष्ट्र भारताचें 'प्रोग्रॅमॅटिक', कार्यक्रमाधिष्ठित नेतृत्व करूं शकेल असें यशवंतरावांनीं बोलून दाखविलें आहे. महाराष्ट्रांत प्रगतिशील असा एकसंधी समाज निर्माण करण्याचें फार मोठें कार्य यापुढें करावयाचें आहे. ज्याच्या कर्तृत्वाचा प्रकाश दिल्लींत पडेल तोच महाराष्ट्रांत हें कार्य करूं शकेल; आणि महाराष्ट्रांत हें कार्य जो यशस्वी करील तो दिल्लीच्या सिंहासनावर आपला प्रभाव पाडील. महाराष्ट्राच्या आणि भारताच्या इतिहासांत ही अपूर्व कामगिरी आपण पार पाडूं शकूं असा आत्मविश्वास श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं मराठी जनतेंत निर्माण केला आहे.

* * *

स्थलप्रत
दर्जा REFBK-0010853 ........
अनुक्रम नों: दि: ........